म. ग्रं. सं. ठाणें
विषय
क्र. नं.
सन - १८००

# हिंदुवा सूरज

अथवा

# बाप्पा रावळ चक्रवर्ती.

ठाणे

मुंब

म. ग्रं. सं. ठाणें
विषय .
लेखक ना. ह. गद्रे
सन
लय क्रमांक
१८
पुस्तकाचें नांव हिंदुवा सूरज अथवा बाप्पा रावळ चक्रवर्ती

इ. नं. ता. १९५३
४०५

ग्रंथ संग्रहालय
ठाणे

म. ग्रं. सं. ठाणे

ग्रंथ संग्रहालय
नं.
ठाणे

सं. क्र. ११८३

हिंदुवा सूरज

अथवा

# बाप्पा रावळ चक्रवर्ती.

(एक ऐतिहासिक कादंबरी)

नारायण कृष्ण गद्रे

(अक्षविपाक, व्याधाचा फर्जी वगैरे पुस्तकांचे कर्ते.)

यांनीं लिहिली

ती

शारदाक्रीडन छापखान्याचे मालक

यांनीं

प्रसिद्ध केली.

सर्व हक्क प्रकाशकानीं राखून ठेविले आहेत.

किंमत बारा आणे.

"शारदाक्रीडन" छापखान्यांत छापिलें.

# प्रस्तावना.

ही आठव्या शतकांतील उत्तर हिंदुस्थानांतील राजकीय धार्मिक व सामाजिक स्थिति दाखविणारी ऐतिहासिक गोष्ट महाराष्ट्र वाचकांस सादर–अर्पण केली आहे. इच्यांत जें कांहीं संग्राह्य असेल तें सर्व त्या 'हिंदुवा सूरज' सारख्या आपल्या पूज्य पूर्वजांचें पुण्यबल होय. जें कांहीं टाकाऊ असेल तें सर्व लेखकाचें अज्ञान आणि असली गोष्ट लिहिण्याची अपात्रता यांचेंच कडू फळ होय. वाचक प्रेमभावानें गोड करून घेतीलच.

ग्रंथकर्ता.

---

## विनंति.

भूत हें सचित्र वर्तमानपत्र आज सहा वर्षें मुंबईंत प्रसिद्ध होत आहे. सहा वर्षांत या पत्रानें लोकसेवा व देशसेवा कोणत्या प्रकारानें बजावली व जनमनरंजन कितपत केलें हें वाचकांस अवगत आहेच. ह्या पत्राच्या आयुष्यांतील पहिलीं दोन वर्षें चांगलीं गेलीं परंतु पुढें चार वर्षें ह्याला प्लेगच्या कंटक मार्गांतून मार्गक्रमणा करावी लागली. ह्या चार वर्षांत हिंदुस्थानांतील प्रत्येक धंद्याची कशी दुर्दशा उडाली आहे हें येथें सांगण्यास नकोच. भूत पत्रालाही प्लेगच्या पहिल्या दोन अडीच वर्षांपैकीं थोडे महिने निरुपायास्तव विश्रांति घ्यावी

लागली. परंतु गुदस्त सालीं बंद न राहतां त्यानें आपलें काम बिकट प्रसंगींही नेटानें चालविलें होतें, इतकेंच नव्हे, तर कांहीं महिने बंद असलेल्या बद्दलची भरपाई या पुस्तक रूपानें करण्यास तें समर्थ झालें आहे. याचें श्रेय या पत्राच्या उदार आश्रय दात्यांकडे आहे. अशाच रीतीनें आश्रय दात्यांकडून आश्रय मिळत गेल्यास ह्या पत्राला लोकसेवा बजावण्याची विशेष स्फूर्ति व सामर्थ्य येऊन ह्यांत विशेष सुधारणा होत जाईल. ह्याबद्दल आज पर्यंतच्या अनुभवानें आश्रय दात्यांची खातरी झाली असेलच. ज्या आश्रय दात्यांकडे बाकी राहिली आहे त्यांनीं ती त्वरित पाठवून या पुस्तकाचा लाभ घ्यावा व या सचित्र भूत पत्राला उत्तेजन द्यावें अशी त्यांस विनंति आहे.

शेवटीं ज्या सर्व शक्तिमान् परमेश्वराच्या कृपेनें हें काम शेवटास गेलें त्याचे, व ज्या आश्रय दात्यांनीं आपला आश्रय कायम ठेविला आहे व ज्यांनीं नवीन आश्रय दिला आहे त्यांचे आभार मानून, तसेंच त्यांनीं थोडीशी मेहनत घेऊन नवीन वर्गणीदार मिळवून देऊन आह्मांस आपलें पत्र अधीक मनोरम करण्यास उत्तेजन द्यावें अशी त्यांस विनंति करून वाचकांची रजा घेतों.

एडिटर

भूत.

श्रीशशिशेखरशिवपदिं ठेवी जो शीर्ष इच्छित पावे।
तो निज संतत संकटसमुहीं त्यालोगीं विजय करीं पावे॥ १॥

एकेनापि हि वीरेण पादाक्रान्तं महीतलम्॥

# हिंदुवा सूरज

## अथवा

## बाप्पा रावळ चक्रवर्ती.

### प्रकरण १ लें.

आमची गोष्ट फार फार लांबची आहे. कालही फार मागचा आणि देशही फार दूरचा. काळ आठवें शतक; स्थळ राजस्थान.

अमावास्येची मध्यरात्र; काळोख मी ह्मणतो; डोळ्यांत बोट घातलें तरीही दिसत नाहीं. नगरांत जिकडे तिकडे अगदीं सामसूम. नगररक्षक सुद्धां थंडीनें कुडकुडत घोंगट घालून बसलेले. कित्येकांस तर डुलक्याही येत होत्या. रात्रीचा किडा मात्र आपला किर्रर असा आवाज सारखा करीत होता. क्वचित् काजवेही चमकत होते. राजनगरी होती, तथापि, कां कोणास कळे, या काळरात्रीं तिला अशी कांहीं कळा आली होती कीं प्रत्यक्ष मसणवटीही इतकी भयंकर वाटली नसती. कांहींतरी दुर्धर, दुष्ट, दारुण-

प्रसंगाचीं दुश्चिन्हें मूर्तिमंत दिसत होतीं. झंझावातापूर्वी जसें अगदीं निवांत असतें त्यांतलीच आजची ही या नगरीची शान्तता होती. सर्व नगरस्थांस या वेळीं काळनिद्रेनें कंवटाळलें होतें. निद्रा ही मनुष्यमात्रास अत्यावश्यक आहे; आणि त्या निद्रेकरितां रात्रीची योजना आहे. तथापि असा नियमच दिसतो कीं पुष्कळांस सुखानें निद्रा येण्याकरितां कांहीं जणांनीं तरी त्याच रात्रीच्या वेळीं जागृत राहिलें पाहिजे. समाज बंधनांनीं वागणाऱ्या, जीवन कलहांत थोड्या फार अंशानें झगडणाऱ्या, कोणत्याहीं विवक्षित जनसमूहाला सुखानें निद्रारूप विश्रान्ति —श्रमपरिहारक व फिरून त्या जीवनकलहांतील पडेल तें काम करण्यास नवीन सामर्थ्य आणि उत्तेजन देणारें अत्यंत पौष्टिक औषध—घेण्यास सांपडणें ह्मणजेच त्यास जगण्यास सांपडणें होय. आणि हें जगणें जर सर्वांस हवें तर कांहीं लोकांनीं आपल्या निद्रेच्या काळांत इतरांहून फरक केला पाहिजे. पण तसें नेहमींच घडतें असें नाहीं. व याच अपवादास अनुसरून या ईडर नगरींत आजच्या रात्रीं पहारेकरी स्वकर्तव्यपराङ्मुख झाले होते; अथवा दुर्दैवानेंच त्यांस तसे बनवून सोडले होते.

मनुष्य स्वकर्तव्यपराङ्मुख झाला कीं पतन हें फळ त्याच्या वांट्यास ठेवलेलेंच आहे. आणि या नियमाचा प्रत्यय या नगररक्षकांस आलाच. त्यांच्यावर बाणांची अचानक वृष्टि होऊन त्यांस आपल्या पातकाचा मोबदला

मिळूं लागला. शहरांत जणूं काय एकदम भुताटकीचा व्यापारच सुरू झाला. चाही दिशांनीं एकदम भिल्लांचे थवेच्या थवे शहरांत शिरले. त्यांनीं वाटेंत जे जे त्यांना आडवे आले त्यांचीं त्यांचीं जागच्याजागीं प्रेतें पाडून आपल्या कर्तव्यपराङ्मुखतेबद्दल झालेल्या पश्चातापाच्या प्रखर तापांत कांहींना विह्वळत पाडून ते सर्व एकदम राजवाड्यावर चालून गेले.

राजवाड्याचीं द्वारें उघडीं नव्हतीं. तीं त्या मल्लभिल्लांनीं कुऱ्हाडीच्या घावांनीं उघडीं केलीं. वाड्यांत सर्व हाहाःकार झाला. राजा **गुहसेन** आपल्याकडून भिल्लांशीं युद्ध करण्याची पुष्कळ व्यवस्था करीत होता तथापि त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

शत्रु आपणांस आटपत नाहींत असें जेव्हां राजाला कळलें तेव्हां त्यानें आपल्या बायकोस व एकुलत्या मुलास एका विश्वासू चाकरा करवीं त्यांची इच्छा नसतांही केवळ वंशोच्छेद न व्हावा ह्मणून त्यांची चांगली समजूत करून गुप्त मार्गानें त्यांस बाहेर काढून लाविलें; आणि आपण लढाऊ पोषाख करून प्राणान्तपर्यंत त्या भिल्लांशीं लढला. झालें. नगरी भिल्लांच्या हस्तगत झाली. **गुहादित्य सिसोदे** वंशाचा राजा मारला गेला. राज्यक्रान्ति झाली. भिल्लांनीं आपल्यांतील एकास त्याच्या सिंहासनावर बसविलें. आणि आज सहा पिढ्या मोठ्या कष्टानें परकीयांच्या ॰

काहीं स्वकीयांच्या शत्रुत्वापासून रक्षण केलेली **सिसोदे**-वंशाची ही लहानशी शाखा उच्छिन्न झाली.

सूर्यकुलभूषण पहिला राजा **इक्ष्वाकु** त्याच्याच नांवानें पुढें हा वंश चालतां चालतां युगेंच्या युगें जाऊन त्रेतायुगाच्या अन्तीं **श्रीरामचंद्र दशरथाच्या** पोटीं आला. साक्षात् **श्रीविष्णूचा** अवतार अशा या **रामचंद्रांनीं** दशमुख **रावणाचा** त्याच्या सर्व दुष्ट राक्षसांसुद्धां वध करून पृथ्वीचा भार कमी केला; आणि 'एकवाणी, एकपत्नी, एकवचनी' अशी वर्तणूक ठेविली व जगास सद्वर्तनाचा अढळ दाखला दाखवून दिला. तेंव्हांपासून ह्यास **रामवंश** ह्मणत. तो **रामवंश** अयोध्येस अनेक हजार किंबहुना लक्ष वर्षें अकुतोभय नांदल्यावर चालू शकापूर्वी १६।१७ शें वर्षांपासून **अशीरगड** येथें प्रस्थापित झाला होता. तेथून ह्यास **शालिवाहन विक्रमादिकांनीं** हुसकल्यामुळें कांहीं वर्षें अज्ञातवासांत काढल्यावर दुसरें शकशतक चाललें असतां **कनकसेन भट्टारकानें** ह्या पवित्रतम सूर्यवंशाचा आपल्या बाहुबलानें उद्धार करून **वल्लभीपुरास** राज्यपीठाची स्थापना केली. तेथेंही तीनचार शतकें **भट्टारकाच्या** वंशजांनीं उत्तरोत्तर विशेष कीर्ति संपादन केल्यावर शेवटीं त्यांस सहाव्या शतकाच्या आरंभींच परचक्रानें घेरलें आणि **वल्लभीपुराचा** अंत झाला. तेंव्हां त्यांतील एका वंशजानें **ईडर** येथें येऊन नव्या दमानें राज्यस्थापनेचा खटाटोप केला. त्याच्याच वंशांतील **गुहसेन** हा ६ वा

C 171729

पुरुष होय. वल्लभीपुराच्या धाकट्या पातींतील एका पराक्रमी वीरानें काबूल कंदाहाराकडे जाऊन तिकडेही एक या सर्वव्यापी सूर्यवंशाचें राज्यपीठ स्थापन केलें होतें. असल्या या वीरवरांचाच ज्यांतून सारखा प्रवाह चालतो अशा ह्या वंशनदाचाच एक लहानसा पाट प्रतिकूल दैवरूपी अवर्षणानें ईडर येथें अगदीं कोरडा पडला. त्याला पुनः जीवन मिळालें किंवा नाहीं, मिळालें असल्यास केव्हां आणि कोठून, हें जाणण्याची आपणास जिज्ञासा उत्पन्न होणें साहजिकच आहे. आणि त्याकरितांच पुढील गोष्ट लिहिण्याचें आह्मीं मनांत आणिलें आहे.

---

## प्रकरण २ रें.

धन्विनां शस्त्रसंधाने भिषजां सान्निपातके ॥
कर्मणि व्यज्यते प्रज्ञा सुस्थे को वा न पण्डितः ॥

मनुष्याची खरी परीक्षा संकटांतच. वीराची समरांगणांत, वैद्याची संन्निपातासारखे दुस्साध्य रोग झाले ह्मणजे, पतिव्रतेची निराधार स्थितींत, आईची मुलाचा बाप मेल्यावर, बापाची मुलाची आई नाहींशी झाल्यावर, पण्डिताची प्रतिज्ञावादांत, अशी ज्याची त्याची परीक्षेची—खऱ्या कसोटीची—वेळ असते. बाकी सहजच सर्व सुरळीत चाललें असतांना वाटेल तो पंडितच आहे. शिळोप्याच्या युद्धकथा आणि रिकाम्या वेळचीं राज्यकारस्थानें काय

अंबिकेचें नांव घेऊन तिनें त्याचा शिरच्छेद करून आपल्या पतीस व पितरांस त्याच्या रक्तानें तर्पिलें व आपल्या वंशोद्धारक तीन वर्षांच्या अर्भकास घेऊन ती तेथून जी झटकली ती पार नाहींशी झाली. तिनें आपलें क्षात्रजन्म व वीरपत्नीत्व यांचें सार्थक करून दाखविलें. हें इतकें साहस तिनें कां केलें ? शीलासाठीं. तिला हें साहस करण्यास धैर्य कशानें आलें? वीरसू ह्मणवून घेण्याच्या इच्छेनें. आणि ही आशा तिच्याठायीं कशानें उत्पन्न झाली? आपल्या व आपल्या कुलाच्या शीलशुद्धतेनें. तात्पर्य काय, एक शीलाची चाड असली ह्मणजे तिच्यासंगतीं शौर्य, धैर्य, प्रसंगावधान, युक्ति व जय हीं सर्व सहजच येतात.

---

## प्रकरण ३ रें.

सूर्याला सोडून प्रभा, जीवनौघ सोडून मत्स्य, मेघाव्यतिरिक्त सौदामिनी, त्याचप्रमाणें पतीला सोडून पतिव्रता स्त्री ही कधींही राहूं शकत नाहींत. तथापि आशा ही एक विलक्षण शक्ति आहे. मायापाश हा एक महादुर्भेद्य दुर्ग आहे. त्या दुर्भेद्य दुर्गांत राहून आशेच्या सहाय्यानें पर्वतप्राय दुःखें सहन करण्याचें सामर्थ्य मनुष्यास प्राप्त होतें. याच नियमाला अनुसरून पोटच्या पोराची कांहीं तरी सुस्थिति होण्याच्या आशेनें राणी पुष्पगंधा डोंगरां-

तून, वनोपवनांतून, एकटी, उपाशीं, थंडी, वारा, ऊन हीं सहन करीत, मार्ग क्रमीत होती. वरचेवर तिला पतीची आठवण होऊन रडें कोसळत असे; तिला असें वाटे कीं 'स्वर्गाच्या वाटेंत पति आपली वाट पाहत असतील. ते खोळंबले असतील. आपण या मुलाला येथेंच वृक्षलतांच्या स्वाधीन करून त्यांस भेटण्याकरितां जावें.' परंतु फिरून तिचें तिलाच असें वाटे कीं 'आपलें व आपल्या पितरांचें तर्पण करण्यास अधिकारी असा जो हा आपला एकुलता एक पुत्र तो जर नाहींसा झाला तर परलोकीं आपली गति काय होईल? छेः याची कांहींतरी सुस्थिति झालीच पाहिजे. ती जर न होईल तर मग आपण सती जाऊन तरी काय मिळविणार?' असे दोन्ही तऱ्हेचे विचार तिला सारखे डंवचीत होते. दिवसा प्रवास, रात्रीं काळजी, मिळून निद्रा ही तिच्या कशी ती वांट्यासच येईना. शिवाय तहान, भूक यांचीही पीडा होतीच. तथापि तिची काळजी इतकी विलक्षण होती कीं तिला आपणास तहान भूक लागल्याची कित्येक वेळां दादही नसे. तथापि तिचा तो लहान राजबिंडा, त्याला काळजी व आपल्या मातोश्रीचा हा हृद्रोग यांची कल्पना तरी होती काय? कोठून असणार? त्यानें तहान किंवा भूक लागली कीं तिचीं हाडें घुसळावींत; परंतु ती तरी काय करिते बिचारी? त्याची ती पुष्कळ प्रकारें समजूत करीत असे. परंतु ती व्हावी कशी? त्याचाही तेथें नाइलाजच होता

कारण तो अजून अर्भक–अवघा तीन वर्षांचा–अज्ञानाचा आणि अल्लडहट्टीपणाचा केवळ पुतळाच होता. त्यानें तिला नाहीं नाहीं ते प्रश्न विचारून अगदीं भंडावून सोडावें; त्यानें तिला बापाची माहिती विचारावी; आपल्या वाड्याची माहिती विचारावी; त्याच्या नेहमींच्या परिचयाच्या परिजनांचीं, दासदासींचीं नावें घेऊन माहिती विचारावी; एक ना दोन, असे हजारों प्रश्न करावे. त्या बिचाऱ्या माउलीनें त्याला काय उत्तरें द्यावीं? एखाद्या ज्वालामुखीची ज्वाला शान्त करितां येईल; आकाशास गवसणी घालतां येईल; वाऱ्याची मोट बांधतां येईल; परंतु लहान मुलाची असल्या विषमकाळीं समजूत घालून जिज्ञासा पूर्ण करितां येणें हें काम अत्यंत दुर्घट आहे. त्याची कल्पना अनुभवावांचून व्हावयाची नाहीं. वांझेस प्रसववेदना जशा कधींही माहीत होणार नाहींत आणि त्यामुळें खरें अपत्यप्रेम व ' आंतडें तुटणें ' ह्मणून ज्याला ह्मणतात त्याचाही तिच्या ठिकाणीं अभावच असणार. तद्वतच वरील गोष्ट होय. त्या मुलाला तिनें काय सांगावें बरें ! धाकदपटशा दाखवून जर त्याची ती कटकट बंद करण्याचा प्रयत्न करावा तर त्याचा सर्वस्वी हिरमोड होऊन त्याच्या कोमल अंतःकरणावर भलताच परिणाम व्हावयाचा. व हें तर तिला अनिष्टच, कारण तिला आतां ह्या जगांत त्या मुलावांचून दुसरें कोणीही नव्हतें आणि त्यालाही आसरा काय तो ही त्याची अपत्यप्रेमाची केवळ मूर्तिच अशी आई.

नं.८ही ११८७



तेव्हां तिनें त्या वेड्यावांकड्या प्रश्नांचीं कशीबशी उत्तरें देऊन आणि त्याच्या त्या निसर्गविकसित मुखकमलाकडे पाहूनच ती आपलें वरचेवर उचंबळून येणारें दुःख गिळून काळाचे दिवस कंठीत होती. प्रवासानें तिचीं गात्रें विकळ झालीं होतीं. पोटास नीट अन्न न मिळाल्यानें शुष्क झालेल्या वेलीप्रमाणें तिची अवस्था झाली होती. दुःखाग्नीच्या प्रखर ज्वाळांनीं होळींत पुरलेल्या एरंडासारखी तिची स्थिति झाली होती असें ह्मणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. रानांत कधींकाळीं तिच्या हाताला येण्यासारखीं फळें वगैरे सांपडलीं तर तेवढीं तिला खावयाला मिळत. त्या मुलाकरितां तिला जें कांहीं करावें लागत असे तें तर विचारूंच नका. तथापि कुठून तरी त्याच्यापुरता अन्नाचा घांस ती मिळवून त्याला घालीत असे. अशा रीतीनें दिवसाचे दिवस व आठवडेही लोटले. तथापि तिचें तें भडकलेलें तारूं कोठेंच किनाऱ्याला लागेना. मग तें कधीं लागणार होतें किंवा नाहीं हें एक त्या परमेश्वरालाच माहित.

अनाथाचा वाली, दीनाचा कनवाळू, दयाघन परमेश्वर कधीं लांब असतो असें नाहीं. तो प्रत्येकाचा हृदयस्थ साक्षी होऊनच नेहमीं जागत बसलेला असतो. मात्र योग्य प्रसंगाची आणि कसोटीची वाट पहात असतो. एकदां कां त्याच्या कसास भक्त उतरला, त्याची अनन्य भावना आपल्या ठिकाणीं दृढ आहे, असें त्याच्या प्रत्ययाला आलें

कीं तो विघ्नविनाशक कोणत्याना कोणत्यातरी मिषानें आपल्या भक्ताची गांठ घेतो आणि त्याचें इच्छित पूर्ण करितो. एक दिवस हीं दोघेंही मायलेकरें पहाटेच्या सुमारास एका झाडाखालीं निजलीं होतीं. सृष्टि आपला प्रियमित्र मित्र उदयास येणार ह्मणून आनंदानें त्याची जणूं वर तोंड करून वाटच पाहत आहे; चंडोलपक्षी गाताहेत; इतर पक्षी हीं आपापल्या घरट्याच्या तोंडांशीं येऊन मंजुळ ध्वनि करीत आहेत; गरीब रानटी लोक लांकडें तोडण्याकरितां व गवत कापण्याकरितां आपापलीं हत्यारें घेऊन, खांद्यावर दोरखंडें टाकून, चालले आहेत; पारधी आपलीं जाळीं घेऊन रानाची टेहेळणी करीत आहेत; चोर, दरवडेखोर आपापल्या वांटण्या करून, आपले वांटे भूमिगत करून साव बनून फिरून त्या सत्यासत्यद्रष्ट्या स्वयंप्रकाश सूर्यास आपलीं पापी तोंडें दिसूं नयेत ह्मणून लगबगीनें आपापल्या झोंपड्यांकडे जात आहेत. अशा वेळस कोणी एक सत्वस्थ ब्राह्मण त्याच रानांतून मार्ग क्रमित होता. तो आपली प्रातःसंध्येची वेळ झाली असें मनांत आणून त्याच्या अंदाजाप्रमाणें जवळच असणाऱ्या जलसंचयाकडे जात होता. उद्देश काय कीं उदयकाळीं सूर्यास, आपल्या समंत्रक अर्घ्यांनीं, वाटेंत होणाऱ्या असुरांच्या अडथळ्यांतून मुक्त करावें ह्मणजे आपलें ब्राह्मणाचें नित्यकर्तव्य बजावल्लेंसें होऊन त्य सहस्ररश्मीच्या आरोग्यदायक व पुण्यफल अशा दर्शनानें

आपला दिवस सुखाचा जावा; आणि आपल्या परलोक मार्गाच्या सुखसाधानांत भर पडावी.

हीं मायलेंकरें जेथें निजलीं होतीं तेथून जलाशय फारसा लांब नव्हता. सूर्यानें आपला वंशांकुर ओळखूनच कीं काय आपल्या सुवर्णकरांनीं त्या मुलास व त्या स्त्रियेस ममतेनें कुरवाळण्याचा क्रम सुरू केला. थंडीमुळें रात्रभर दूर राहिलेली झोंप या वेळेस अगदीं पुरापूर त्यांच्या गळीं पडली. जों जों थंडी कमी होत गेली तों तों त्या दोघांही मायलेंकरांस ज्यास्त जास्तच गाढ झोंप लागत चालली. सूर्यानें आपले बालकिरण मुद्दामच त्यांजवर आपल्या कुलपक्षपातानें जास्त वेळ ठरूं दिले कीं काय कोण जाणे. इकडे त्या द्विजश्रेष्ठाचीं स्नानसंध्यादि कृत्यें आटोपत आलीं. प्रवासांत असल्यामुळें देवतार्चनादि गोष्टी त्याच्या मागें नव्हत्याच. स्नानविधि आटपून उगवत्या सूर्यास भक्तिपुरस्सर अर्घ्यदान करण्यापलीकडे जास्त कर्मकलाप त्यास या ठिकाणीं उरकावयाचा नव्हताच. माध्यान्हकालापूर्वी घरीं जाऊन फिरून गार्हस्थ्यास योग्य तीं सर्व ब्रह्मकर्मे स्वस्थपणानें आटोपण्यास त्यास सवड होती. यामुळें त्या श्रद्धाळू ब्राह्मणानें घटकाभर दिवस येण्यापूर्वीच आपलें प्रातरान्हिक आटोपलें व तो भूमातेस आणि सूर्यनारायणास प्रेमपूर्वक व आदरानें नमस्कार करून पुनः मार्गस्थ झाला. त्याचा रस्ता हीं दोन्हीं मायलेंकरें जेथें निजलीं होतीं तेथूनच होता.

पुष्पगंधेस झोंप लागली होती ह्मणून जरी आह्मीं ह्मटलें आहे, तथापि अशी स्वभावविरुद्ध गोष्ट होऊं नये अशी त्याच वेळीं आह्मांला शंका आली होती. आणि पुढें जो कांहीं प्रकार झाला त्यावरून आमची शंकाच खरी होती असें स्पष्ट आढळून आलें. ती झोपेंत नसून एक लांबलचक स्वप्न पाहत होती. त्यांत प्रथम मनोराज्याचाच भाग पुष्कळ होता. परंतु तिच्या त्या मनोराज्यापैकीं कांहीं गोष्टी ईश्वरास खरोखरच घडवून आणावयाच्या असल्यामुळें तिच्या त्या स्वप्नानंदांत भर घालून, शेवटीं त्याचा थोडा बहुत मासला तिला जागृतींतही, तिनें सोसलेल्या दुःखाचा शीण घालविण्या करितां, तिच्या अनुभवास आणून द्यावा ह्मणून त्या सर्वसाक्षी परमवत्सल परमेश्वरानें तिचें मनोराज्य सुखस्वप्नमय केलें होतें. मूळ काय अल्लडच. त्यानें उशीरापर्यंत झोंपेंत असावें हें सृष्टिनियमानुसारच होत. स्वप्नामध्यें पुष्पगंधेनें असें पाहिलें कीं आपण आपल्या प्रियपतीसह नंदनवनासारख्या रमणीय क्रीडोद्यानांत बसलें असून पतीस एक प्रकारचें वैराग्य उत्पन्न होऊन ह्या मर्त्यलोकास कंटाळल्याबद्दलचे त्याचे उद्गार निघताहेत. ते ऐकून आपण प्रेमानें व अत्यंत आदरानें त्याला इह जगींही प्रजापालनादि आपलीं राजकर्तव्यें उत्तम रीतीनें बजाविलीं असतां त्यांतही कांहीं स्वर्गीय सुखानंदापेक्षां कमी

आनंद आहे असें नाहीं, असा बुद्धिवाद करीत आहे, तथापि पतीस तें कांहीं एक रुचत नसेल राज्यकारभारांतील क्लेश तो आपणांस समजावून सांगत आहे, व पाण्याच्या बुडबुड्या प्रमाणें अत्यंत अस्थिरस्वभावाच्या पाळलेल्या शिंगाळू बोकडी प्रमाणें चिरडखोर व धन्यावर उलटून पडणाऱ्या व सर्पहृदयी अशा या मिळप्रजेचा, आपणांस केव्हां काय करतील व केव्हां काय न करतील या बद्दलचा मुळींच विश्वास येत नाहीं. तेव्हां आतां आपण आपला परलोक मार्गच साधावा हें उत्तम, अशा प्रकारें राजा आपल्याशीं उलट बुद्धिवाद करीत आहे. होतां होतां आपणांस जर तो मार्ग पसंत तर मलाही तोच आपल्या बरोबर स्वीकारणें आनंदाचें वाटतें. जेथें आपण तेथेंच मी. वस्तूस सोडून जशी सावली कधींही लांब राहूं शकत नाहीं तशीच आपणांस सोडून मीही दूर राहूं शकणार नाहीं. उलट दोन प्रहरच्या रखरखीत उन्हाप्रमाणें कडकडीत वैराग्यच जर आपणांस रुचेल तर मलाही सावलीच्या धर्माप्रमाणें आपणाशीं एकरूप होऊन गेलें पाहिजे. आदिमाया पार्वती ही श्रीशंकराची अर्धांगी होऊन राहिली आहे. असा त्यांचा वादप्रवाद चालला आहे—अर्थात् स्वप्नांतील—तोंच तो द्विजश्रेष्ठ या मायलेकरांच्या जवळ आला. त्याची दृष्टि प्रथम त्या स्त्रियेवर गेली. तो तिचें अनुपम सौंदर्य पाहून आणि तिची अशी

परिणाम झाला होता कीं जागृतींतही तिच्या तोंडांतून एकदम मोठ्यानें असे उद्गार निघाले कीं ' हे द्विजश्रेष्ठा ! तर मग घ्याच आतां ह्या माझ्या बाळाला आपण आपल्या पदरांत आणि सोडवा मला या मायाजाळांतून. हं आटपा! आतां उगीच विलंब नको. मला माझ्या पतीबरोबर त्यांच्या स्वर्गीय सुखाची वांटेकरीण होण्यास व तेथेंही त्यांची सेवा करण्यास जाऊं द्या. माझी येवढी विनंति मान्य कराच आपण. ते पहा माझ्या कारितां माझे प्राणेश खोळं-बले आहेत. मला लवकर मार्गस्थ करा. मी आपणांस शरण आल्यें आहें.' असें ह्मणून ती जी ताडकन् उठली ती, या मायलेकरांची चाहूल ऐकून, तिकडे त्याचें लक्ष असल्यामुळें, अर्ध्या वाटेंतच यांच्या बाजूस कांहींसें तोंड करून उभा असलेल्या त्या ब्राह्मणाच्या पायांवर डोकें ठेवण्यास निघाली. आणि ' मी आपल्या पायां पडतें, पदर पसरत्यें, मला येवढी आपण भिक्षा घालाच. मी आपली धर्म कन्या आहें ' असें ह्मणत कांहीं शुद्धींत कांहीं त्या स्वप्नांतच अशी ती महासाध्वी त्याच्या जवळ गेली आणि तो, नको नको! हां हां! हें काय ? असें ह्मणत असतांही तिनें त्यास साष्टांग नमस्कार घातला. इतक्यांत ती पुरती शुद्धीवर आली. आणि ' हे महासाध्वी तूं कोण आहेस! ह्या वनांत तूं अशी निराश्रित कशानें आलीस ' असे त्या ब्राह्मणाचे प्रश्न ऐकतांच त्याला उत्तर देण्याचेंही लज्जेनें व विस्मयानें तिला धैर्य होईना व सुचेनाही.

इतक्यांत तो मुलगाही पुरा जागा होऊन आप-ल्या आईच्या मागोमाग तेथें आला आणि त्या नवख्या गृहस्थास पाहून क्षणैक बुझल्यासारखा झाला. परंतु लगेच आईचा ओंचा धरून तो तिच्याशीं झोंबूं लागला. तेव्हां तो हृदयद्रावक देखावा पाहून त्या ब्राह्मणास मोठा गहिंवर आला आणि थोडेंसे कौतुकही वाटलें. असो शे-वटीं त्यानें त्या मायलेंकरांचीं योग्य ती सर्व चौकशी केली. आणि त्या बिचाऱ्या अनाथ अबलेला चांगला धीर दिला व ' आपण जर मजबरोबर माझ्या घरीं याल तर मी आपली आपल्या मनाप्रमाणें व माझ्या शक्ती-प्रमाणें योग्य ती व्यवस्था करीन. आपण या ब्राह्मणावर विश्वास ठेऊन तेथपर्यंत येण्याचे श्रम मात्र घेतले पा-हिजेत' अशा प्रकारें तिचें सांत्वन केलें व प्रसंगावर दृष्टि देऊन तीही त्याच्या बरोबर त्याच्या घरीं जाण्या-स सिद्ध झाली. चार ममतेचे शब्द बोलतांच त्या अल्लड मुलालाही या नवख्या गृहस्थाचा परिचय होऊन तोही सुखानें, चार पावलें आईचें बोट धरून, चार पावलें या ब्राह्मणाचें बोट धरून, चालूं लागला.

राणी पुष्पगंधेस तर उत्तरोत्तर या ब्राह्मणाबद्दल जास्तच आदरभाव वाटूं लागला; आणि आपणांस पडलेल्या स्व-प्नांतील आपल्या पतीचा अत्यंत विश्वासू व केवळ ईश्वर-रूपी साक्षात् वेदोनारायण जो ब्राह्मण तोच हा अशी तिची मनोदेवता तिला क्षणोक्षणीं निक्षून सांगूं लागली.

शेवटीं ईश्वरानें या ब्राह्मणाच्या रूपानें अवतीर्ण होऊन आपलें गाऱ्हाणें ऐकिलें. आतां आपणास प्राणप्रियास दिलेल्या वचनाप्रमाणें याच ब्राह्मणाच्या स्वाधीन आपल्या प्रियबालकास करून सहगमनाची व्यवस्था अवश्य केली पाहिजे. असे विचार करीत करीत, मधून मधून इह लोकासंबंधानें विरक्तीचीं वचनें तोंडा वाटे काढीत काढीत, ती साध्वी त्या ब्राह्मणाबरोबर मार्ग क्रमीत होती. अशीं तीं तिघेंही चाललीं आहेत तों सरासरी दहा घटका दिवस आला. उन्हाचाही ताप वाढत चालला. अजून त्यांस दीड दोन कोस जमिन तोडावयाची होती. भुकेनें व तान्हेनें त्या मायलेंकरांचे जीव अगदीं कासावीस होत होते. डोळ्यांपुढें अंधेरी यावयाला लागली. तोंडांतून फेंस येण्याची वेळ आली. घशाला कोरड पडली. मुलगा खाण्याकरितां खळखळ करूं लागला. त्या ब्राह्मणाच्यानें कांहीं ते त्यांचे हाल पहावेनात. त्याचाही नाइलाजच होता. परंतु त्यानें मग तेथें जवळच एक बाग होता तिकडे मार्ग काढून त्या दोघांही मायलेंकरांस कांहीं फळें खावयास घातलीं आणि मग त्या मुलास खांद्यावर घेऊन तो पुनः मार्गस्थ झाला.

---

## प्रकरण ४ थें.

### पुष्पगंधेचें सहगमन.

सुशर्मा ब्राह्मणाच्या घरीं आल्यावर पुष्पगंधेनें आपली इत्थंभूत हकीकत त्याला सांगितली. आधींच ब्राह्मणांत

अंतःकरण कोमल. त्यांतही ह्या सुशर्म्याचें विशेषच होतें. त्याला राणी पुष्पगंधेची गोष्ट ऐकून फारच वाईट वाटलें. त्याचें हृदय करुणेनें भरून गेलें. त्यानें अनेक तऱ्हेनें तिचें सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. ‘ असतील बाळ तर फेडतील काळ ’ हें वृद्ध वचन सांगून ‘ ईश्वराच्या कृपेनें आपणांस सोन्यासारखा उत्तम पुत्र आहे. त्याच्या-कडे आपण लक्ष दिलें पाहिजे. त्याला या जगांत आतां आपल्या वांचून मायेचें कोण आहे ? पुढें हाच मोठा झाला ह्मणजे कोणीं सांगावें कीं तो पुनः आपल्या वंशाचा उद्धार करणार नाहीं ह्मणून ! मला तर खचित वाटतें कीं हा आपला बालसूर्यासारखा तेजस्वी पुत्र आपल्या तारुण्यांत माध्यान्ह सूर्याप्रमाणें आपल्या पराक्रम चंडांशूंनीं त्रिभुवन व्यापील; आणि आपणांस जगाकडून वीरमाता ह्मणवील, व स्वतः जगदेकवीर ही पदवी पावेल. माझा असा आपणांस व या आपल्या बालकास पूर्ण आशीर्वाद आहे.’ अशा प्रकारें त्यानें तिला पुष्कळ धीर दिला. परंतु तिचें दुःख कांहीं केल्या कमी होईना. पतीचें व तिचें अत्यंत प्रेम असल्यानें त्याचा हा कायमचा विरह तिला सुखाची आशा ह्मणून मुळींच दाखवीना. ती त्या ब्राह्मणास हातां पायां पडून फिरून फिरून असें विनवूं लागली कीं ‘ महाराज आपण साक्षात् वेदोनारायण परमेश्वररूपीच मला भेटलां असें मी मानल्यें. तेव्हां आपल्या वचनाचा ह्मणजे मी अव्हेर करावा असें नाहीं. पण काय करूं ! माझा कांहीं उपायच

चालत नाहीं. मी आपल्या कडून पुष्कळ विवेक करित्यें पण कांहीं होत नाहीं. मला आपण ह्मणतां तें सर्व कळतें. आपल्या सारख्या ब्रह्मनिष्ठ सत्कर्मी द्विज-श्रेष्ठाचा आशीर्वाद असल्यावर माझा हा लहानगा खरोख-रच पुढें त्रिभुवन विजय करील या बद्दल, हे महाभागवता, मला मुळींच शंका वाटत नाहीं. आणि या करितांच माझी आपणांस आतां शेवटची एवढीच विनंति आहे कीं, आपण या माझ्या तान्हुल्यास एकदां आपल्या पदरांत घ्या. याला आपला ह्मणा. आणि मला सहगमनास आज्ञा द्या. आपण माझे धर्मपिते आहां. या मुलाचे आपण आजोबा झालां. आतां ह्या नातवंडास संभाळणें किंवा त्याचें वाटेल तें करणें आपणाकडे आहे. आपली व माझी जेव्हां आज प्रथम गांठ पडली तेव्हां मी निद्रिस्थ असून एक सुस्वप्न अनुभवीत होत्यें. मी आपल्या प्रिय पतीशीं परलोक यात्रेसंबंधीं प्रेमकलहांत गुंतल्यें होत्यें. त्यांनींच मला आज्ञा केली कीं पुत्रास मीं आपल्या स्वाधीन करावें; व त्यांच्या बरोबर परलोक यात्रेचा मार्ग स्वीकारावा. कारण त्यांनीं जें वर्णन केलें त्याप्रमाणेंच आपण आहां. तिळप्राय भेद ह्मणून नाहीं. स्वप्नांत हा बघ तोच महा ब्राह्मण इकडे येत आहे. असें ह्मणून त्यांनीं जी मूर्ति मला दाखविली व जी मूर्ति मी स्वप्नांतच परंतु चांगली पाहिली तेच आपण आहां. आणि मीही त्यांस वचन दिलें आहे कीं, आपल्या आज्ञे-

प्रमाणें मुलाला मी त्या महाब्राह्मणाच्या पदरांत घालित्यें व लवकर आपल्याबरोबर स्वर्गास येत्यें. इतकें होत आहे तोंच मला जागृती आली व मी कांहीं स्वप्नभरांत कांहीं जागृतींत अशी असतांच आपले पाय धरिले. तेव्हां हे भगवन् आतां विलंब नको, माझे पति वाट पाहात असतील. मला आज्ञा द्या. या बाळाला आपला ह्मणा आणि या आपल्या कन्येस दुःखांतून बाहेर काढा.

अशा प्रकारचें तिचें हें निर्वाणीचें भाषण ऐकून ब्राह्मणास मोठी चिंता प्राप्त झाली. त्याला तिचें मन सहगमनापासून कसें परावृत्त करावें हें कांहीं सुचेना. शिवाय केवळ-तीन वर्षांच्या त्या राजकुलोत्पन्न बालकाचें त्याच्या आईच्या मागें आपणांस संगोपन तरी कसें करतां येणार, असाही त्याला मोठा विचार पडला. पुत्रवतीस सहगमन अवश्य नाहीं इतकेंच नव्हे तर उलट शास्त्रें पुत्रवतीच्या सहगमनाचा निषेधच करितात. त्यांतून तो पुत्र लहान असल्यास सहगमन करणारी माता अधोगतिलाच जाते वगैरे पुष्कळ प्रकारें सांगून तिचा निषेध केला. त्याच प्रमाणें आपल्या हातून त्या बाळकाचा संभाळ होणार नाहीं अशा प्रकारें भीति घालूनही तिला आपल्या सहगमनाच्या निश्चयापासून परावृत करण्याचा त्यानें आपल्याकडून पराकाष्टेचा यत्न केला. परंतु त्या दृढनिश्चयी, निष्कलंक, पतिप्रेमबद्ध साध्वीचा संकेत मेरु पर्वताप्रमाणें अगदीं अचल राहिला. शेवटीं तिच्या

ह्मणण्यास त्याला रुकार देणें भाग पडलें. परंतु नवऱ्याचें क्रियाकर्मांतर करण्याची कांहीं तरी सुव्यवस्था करून पिष्टपिंडास समंत्रक अग्नि देऊन त्या बरोबर तिनें सहगमन करावें असें त्यानें ठरविलें. तिनेंही मग आपल्या बरोबर आपल्या मुलाचा संभाळ करण्याचा जो पत्कर घेईल त्याला देण्याकरितां ह्मणून पृथ्वीच्या मोलाचीं अशीं जीं कांहीं रत्नें संभाळून आणिलीं होतीं तीं त्या ब्राह्मणाच्या स्वाधीन केलीं. त्या ब्राह्मणानें तें द्रव्य शिवस्व समजून त्याचा विनियोग केवळ गुहादित्याच्या और्ध्वदेहिकाकडे व पुष्पगंधेच्या सहगमनविधिप्रीत्यर्थच करून उरलेल्या रत्नांचा राजपुत्राच्या अभ्युदयार्थच उपयोग करावयाचा असा संकल्पकरून स्वीकार केला. झालें. सर्व गोष्टी ठरल्याप्रमाणें योग्य दिवशीं योग्य वेळेस घडून आल्या. राजपुत्रास आई नाहींशी झाली. या जगांत तो केवळ आकाशांतून पडला व धरणीनें सांवरला असा निराधार पोरका झाला. हर! हर! काय हा दुर्धर प्रसंग! राजकुलांत उत्पन्न होऊन ही दशा. तेव्हां पूर्व संचिताचा तडाखाच विलक्षण. राणी पुष्पगंधा तरी कोण धैर्याची बायको ह्मणावी! काय तिचा दृढ निश्चय! केवढी पतिनिष्ठा! सतीचें वाण घेतांना व जिवंतपणीं प्रत्यक्ष अग्नीशीं संगति करतांना तिला यत्किंचित् तरी कंप किंवा भीति शिवावयाची होती; छेः, तें नांव सुद्धां नको. मोठ्या आनंदांत जशी लग्न समयीं बोहोल्यावर तशी ती या समयीं

चितेवर चढली. मायापाश मोठा विकट ह्मणून ह्मणतात. मोठमोठे योगीही हा मायापाश तोडण्याच्या कामांत अपजय पावतात. श्रीमदाचार्यांसारख्यांस सुद्धां मातृमायापाशानें विकार करण्यास सोडलें नाहीं. परंतु आमच्या ब्राह्मण व क्षत्रियांच्या स्त्रिया पतिमरणोत्तर हा मायापाश कसा एका झटक्यासरसा पार तोडून टाकीत आल्या आहेत याचा जर कोणी इतिहासांत पडताळा पाहील तर खरोखरच उत्तर मीमांसा वगैरे गहनशास्त्रांच्या अभ्यासानेंही न होणारा उत्तम संस्कार मनावर होऊन अत्यंत दुर्जय असा हा मायापाश तोडणें ह्मणजे एक अगदींच यःकश्चित् कर्म असें वाटूं लागेल. या भरतवर्षांत अशा हजारों लाखों स्त्रियांनी पतिमरणोत्तर सती जाऊन अमर अशी कीर्ति मिळविली आहे. आणि अशांच्याच पोटीं आलेल्यांनीं वरचेवर या भारतभूमीचा पांग फेडून 'दुर्लभं भारते जन्म' हें तिचें वर्णन आपल्या उत्तम गुणांनीं सार्थ केलें आहे. असलीं नरनारीरत्नें ज्या या भारतभूमींत उत्पन्न होत होतीं तिजबद्दलच स्वर्गाहूनही या 'भारतवर्ष' नामक पुण्यकर्मभूमींत वास होणें हें देवांसही अत्यंत प्रिय वाटतें असा धन्योद्गार पुराणांतरीं आढळतो. अस्तु! आपण आतां येथेंच थांबूं.

---

## प्रकरण ९ वें.

### यावेळच्या भारतेतिहासाचें थोडेंसें दिग्दर्शन.

**बाप्पा** ( हें त्या राजपुत्राचें नांव ). हा त्या ब्राह्मणाच्या घरीं शुक्लपक्षींच्या चंद्राप्रमाणें वाढत होता. प्रथम

मातृवियोगानें कांहीं कालपर्यंत तो अगदीं झुरणीस लागत चालला. तथापि कालांतरानें व बाळपणाच्या वाढत्या जिज्ञासेनें त्याला लवकरच आईचा विसर पाडला; व तो आपल्या मायभूमीचे निसर्गसुंदर चमत्कार पाहण्यांत व तिच्या पृष्ठभागावर खेळण्या बागण्डयांत दंग झाला. त्याचें हें अगदींच अल्लडपणाचें वय संपून त्याचा आयुष्य-क्रम आपणांस मनोहर वाटण्याची वेळ येई तोंपर्यंत आपण त्याला तसाच सोडून देऊं; आणि मध्यंतरीं या वेळचा व जरा पूर्वींचा आपल्या मायभूमीचा व तिच्या सहोदर व सापत्न भगिनींचा सामाजिक राजकीय व धार्मिक संबंध कसा काय होता त्याचा थोडासा वैमानिक देखावा पाहून येऊं.

बाप्पाच्या बाळपणाचा काळ ह्मणजे शकशतक पांचव्याचा अंत व सहाव्याचा आरंभ होय. यावेळीं जगावर एक नवीन धर्म आपल्या ऐन अमदानींत होता. द्वादशी-षोडशीच्या अवसरांतील अत्यंत हूड अडदांड व चपल मुलाप्रमाणें त्या धर्माच्या लोकांचा धुडावा सर्व मध्य एशिया-भर चालू होता. त्यांचा धुडगूस सर्व प्राचीन शान्तता-प्रिय राष्ट्रांस फार जाचूं लागला. या आडदांड चेवलेल्या नव्या उमेदीच्या हेकट लोकांबरोबर वयोवृद्ध ज्ञानवृद्ध अशा इतर सनातन धर्माच्या लोकांस झुंजण्याचें फार कठीण जाऊं लागलें. तेही युद्ध प्रसंगांत कसलेले आणि मुरलेले होते. परंतु शान्तीच्या अतिपरिचयानें व तज्जन्य

प्रेमातिशयानें बद्ध झाल्यामुळें त्यांस युद्ध प्रसंग अत्यंत तिरस्करणीय वाटत असे; व तो होतां होईल तों टाळण्यांतच आपण आपलें कर्तव्य बजावीत आहों असें वाटण्यासारखी त्यांच्या मनाची प्रवृत्ति बनली होती. आतां येथें कोणी असें ह्मणतील कीं, भारतीय युद्धासारखीं युद्धें जरी यावेळीं या आमच्या देशांत झाल्याचें कोठें ऐकण्यांत किंवा वाचण्यांत नाहीं, तथापि आपापसांतील कलह, क्षुल्लक कारणावरून होणारे राजकुलांचे समूळ नाश वगैरे गोष्टी ह्मणजे अगदीं रोजच्या परिचयाच्याच होऊन गेल्या होत्या आणि यामुळेंच तर आमचें राष्ट्र अगदीं निःसत्व व निर्बल झालें असा आरोप सर्व आधुनिक इतिहासकार मोठ्या शोधक बुद्धीनें मिळविलेल्या माहितीच्या आधारें आमच्यावर करितात, मग वरील विधानास व यास मेळ कसा? गोष्ट सत्य आहे. शंका अगदीं बरोबर आहे. आणि त्याचें उत्तरही सणसणीत व अगदीं उघड असें आमच्या जवळ आहे. तें येवढेंच कीं आपसांतील लढायांत लागणारे युद्धावेशादि गुण आणि एकंदर योद्धयांचा संबंध, आणि विधर्मी, विदेशी व एकजूट अशा आणि दारिद्र्यानें व्यापलेल्या, लुटीस हपापलेल्या व घरादारांवर, बायकापोरांवर, तुळशीपत्र ठेवून परदेशांत आलेल्या सैन्यसंघाबरोबर झगडा चालवून विजयी होण्यास लागणारा युद्धावेश व इतर साधनसमूह, ह्यां मध्यें फार अंतर आहे. आपापसांत भांडणाऱ्या राजकुळांच्या लढायांत प्रजेचा फारच

थोडा; किंबहुना मुळींच नाहीं; असा संबंध पोंचत असे. आणि धर्म, शास्त्र, समाज, व्यवहार, नीति, एतद्विषयक बंधनें हीं चिरस्थायी, व सर्वसंमत अशीं अनेक शतकें चालत आलेलीं असल्याकारणानें राजे लोकांच्या कधीं काळीं घडणाऱ्या, अथवा आधुनिकांच्या ह्मणण्याप्रमाणें हरघडी होणाऱ्या, भांडणांनीं आणि क्रांत्यांनीं राष्ट्रांतील एकंदर प्रजेच्या स्वास्थ्यास यत्किंचित्‌ही धक्का बसत नसे. लोकांस ह्या क्रांत्यांची वार्ताही कळत नसे. व ती कळावी असें वाटतही नसे. कारण ग्रामसंस्था, पंचाईत, जमिनीची सुपीकता, समाधानवृत्ति; जगावरील कोणत्याही देशापेक्षां कलाकौशल्यादि हरएक प्रकारच्या औद्योगिक सुधारणेंत अग्रेसरत्व, चातुर्वर्ण्यव्यवस्थेनें प्रत्येकाच्या ऐहिक सुखसंबंधी व उद्योगबाहुल्यासंबंधी महत्वाकांक्षेस आलेलें मर्यादित स्वरूप, इत्यादि सर्व गोष्टींचा असा काहीं विलक्षण परिणाम झाला होता कीं समाजांतील उच्चप्रतीच्या लोकांतील मत्सरामुळें होण्याऱ्या कलहांचा खालच्या प्रतीच्या लोकांवर मुळींच परिणाम घडेनासा झाला होता. महासागराप्रमाणें अत्यंत गंभीर असणारा आमचा हिंदुसमाज, राजकुळांतील वगैरे लोकांच्या मानापमान व ईर्षा यांच्यामुळें होणाऱ्या कसल्याही ढवळाढवळींनीं खवळणें शक्यच नव्हतें. उदाहरणार्थ एकच गोष्ट पुरे. हिमालयापासून तों कन्याकुमारीपर्यंत कोठल्याही एका टोंकाकडील राजा कोठल्याही दुसऱ्या टोंकाकडील प्रदेशाच्या

राजाच्या जागीं आला तरी त्याचे व पूर्वीच्या राजाचे प्रजापालनाचे अथवा शासनाचे सर्व नियम सर्वमान्य अशा मन्वादिस्मृतिकारांनीं घालून दिलेलेच असत. राज्यक्रांतीनें राजाचे कांहीं आप्त व अत्यंत जवळचे मानकरी, मंत्री, सचिव, सेनाधिकारी वगैरे लोकांना तिचें सुखदुःख भोगावें लागे. इतरांचा त्या क्रांतीशीं अर्थाअर्थीं कांहींएक संबंध नसे. आणि अशा स्थितीमुळेच ह्या काळचा राजकीय इतिहासही, राजांचीं कांहीं नांवें, व त्यांचीं धर्मसंबंधीं विशेष महत्वाचीं कृत्यें, या शिवाय कांहींएक उपलब्ध नाहीं. तोच धार्मिक इतिहास प्रत्येक धर्ममताभिमान्यांकडून इतका साभिमान व विस्तृत लिहिलेला आढळतो कीं, त्याजकडे पाहिलें ह्मणजे मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. असो. अशी आपल्या या भरतखंडाची स्थिति असल्यामुळें प्रथम सांगितलेल्या द्वादशी-षोडशींतील अल्लड पोरांप्रमाणें आडदांड धर्ममताच्या दांडग्या लोकांशीं झगडण्यास आपले भारतीय लोक जरा कमी पडत असत. टीचभर पात्राच्या ओढ्याच्या पावसाळ्यांतील पुरापुढें पोहण्याच्या कामांत अत्यंत पटाईत व बलिष्ठ अशा हत्तीसारख्याचीही डाळ शिजत नाहीं. तीच दशा त्यावेळीं आमची होती. त्यावरून ह्मणजे आह्मांस अशक्त, पोहतां न येणारे असें ह्मणण्याचा कोणाला अधिकार पोंचतो, असें थोडेंच आहे. पैगंबरी धर्माच्या पावसाळ्यांत महापूर आलेल्या ओढ्याच्या लोटाप्रमाणें येणाऱ्या

लोटांनीं तिकडे यूरोपीच्या सरहद्दीस तसाच इकडे आमच्याही देशाच्या वायव्य सीमेस चांगलाच धक्का दिला होता. सिंध, पंजाब, पर्यंतचा प्रान्त दोन चार वेळां या टोळधाडींनीं उध्वस्त केला होता. आणि क्वचित ते पुढेंही कधीं कधीं डोकावत असत. यावेळीं **उत्तर खलीफा** नांवाचा पहिला खलीफा पैगंबरी साम्राज्याचा अधिपति होता. यानें तैग्रिस नदीवर बसोरा हें शहर बांधलें होतें. याच सुमारास तुर्कस्थानांतील एक सरदार **अबुलआस** यानें जंगी फौजेनिशीं गुजराथेपर्यंत मजल मारिली होती. परंतु त्याला आरोर येथें जी जंगी लढाई झाली त्यांत क्षत्रिय राजांनीं चांगला चोप दिला आणि त्याच्याच सैन्याचा चक्काचूर उडवून टाकिला. ह्या लढाईंतील नाशाचा शोध करण्यास पुढें **उस्मान खलीफा** यानें प्रथम कांहीं जासूद हिंदुस्थानांत पाठविले; व मागून स्वतः खासास्वारी मोठ्या सैन्यानिशीं हिंदुस्थानावर येण्याच्या तयारींत होती. परंतु त्याचा तो बेत फसला. पुढें **उस्मानाचा** हेतु **खलीफा अली** यानें शेवटास नेला. त्याच्या फौजेनें प्रथम सिंधप्रांत काबीज केला. पण तो फार दिवस त्याच्या ताब्यांत राहिला नाहीं. चार दोन वर्षांतच त्याच्या लोकांना तेथून आपला पाय काढावा लागला. पुढें **अबदुल खलीफाच्या** कारकीर्दींत खुरासानच्या यजीदानें पुष्कळदां हिंदुस्थानच्या सरहद्दीशीं टक्करा दिल्या, परंतु थोड्याशा लुटीवांचून त्याला त्यांत कांहीं एक लाभलें नाहीं.

अशा प्रकारच्या धामधुमी चालत असतां ख्रिस्ती धर्माला आपलें ठाणें आशियांतून हालवावें लागलें होतें, आणि अजूनही त्याचा तेथें पुन्हा जम धर्म या नात्यानें फारसा बसलेला नाहीं. यूरोपांतही या पैगंबरी धर्माच्या गर्जनेनें ख्रिस्ती धर्मास सुखाची झोंप मिळेनाशी झाली होती.

'**हिंदूवा सूरज**'च्या उदयकालीं वरील प्रमाणें राजकीय, सामाजिक व धार्मिक वातावरणाची स्थिति होती. या गाढ अंधःकारांतून व दाट धुक्यांतून या आमच्या '**हिंदूवा सूरज**'च्या कोमल किरणांस आपला माग काढावयाचा होता.

---

## प्रकरण ६ वें.

### आवाडाव व स्थलान्तर.

**बाप्पा** आतां ८।९ वर्षांचा झाला होता. तो आपल्या आईचें दुःख पार विसरला होता. तथापि त्याला आपण राजपुत्र आहों, आपलीं मातापितरें मोठीं करारी माणसें होतीं, आपला वंश '**यावदार्यकुलदिवाकर.**' असा महान् पराक्रमी आहे, याकरितां आपल्या पूर्वजांच्या कीर्तीला साजेल असें कांहीं तरी आपल्या हातून घडलें पाहिजे, तरच आपण जन्मास येण्याचें सार्थक, असें वाटत असे त्याला **सुशर्म्यानें** फावल्यावेळीं मागील इतिहास व पुराणें यांतील कथा सांगाव्या, रामायणांतल्या व महाभारतांतल्या सूर्य चंद्रवंशीय अनेक पराक्रमी राजांच्या

अत्यंत रसभरित गोष्टी सांगाव्या. त्याचप्रमाणें आपल्या धर्माची वगैरे माहितीही सांगावी, आपद्धर्म, राजधर्म इत्यादिकांचीं तत्वें त्याच्या मनावर ठसविण्याकरितां पंचतंत्रांतील आख्यायिका सांगाव्या, आणि त्या **बाप्पा**नेंही मोठ्या कौतुकानें आणि अत्यंत आदरपूर्वक ऐकाव्या असा त्याचा शिक्षण प्रकार होता. जात्या अत्यंत हूड असल्यामुळें गुरूजींस आपल्या या शिष्यास व कृतक पुत्रास कित्येक वेळां रागें भरण्याचाही प्रसंग येत असे. **सुशर्मा** या क्षत्रियशिशूचा नैसर्गिक हूडपणा पुष्कळ वेळां आपल्या ब्राह्मण्यास उचित अशा क्षमेनें चालूं देत असे. कारण त्याच्या हूडपणाचा समूळ उच्छेद होणें हें तर असंभवनीयच होतें. बरें तो अगदींच कमजोर करून ठेवणेंही श्रेयस्कर नव्हतें. क्षत्रिय या नात्यानें क्षात्र तेजाची जिकडून या आपल्या शिष्यामध्यें वृद्धि होईल तिकडून ती करणें हें आपलें उलट कर्तव्यच आहे असें **सुशर्मा** समजत असे. त्यामुळें **बाप्पा**चा नैसर्गिक हूडपणा व महत्वाकांक्षा हीं सारखीं वाढत चाललीं. तो काय तो एक या आपल्या गुरूस व गुरुपत्नीस थोडा फार भीत असे. गुरूजींचा अथवा गुरुपत्नीचा त्यानें कधींही अनादर केला नाहीं किंवा त्यांच्या उत्तरास प्रत्युत्तरही दिलें नाहीं. बाकी सर्वत्र कोणी **अरे** ह्मणण्याचा अवकाश, **बाप्पा**चें कारे ह्मणून लगेच उत्तर तयारच.

वडनगर हा गांव लहानच होता, तरी त्यांत वस्ति बरीच होती. पंचवीस तीस ब्राह्मणांचीं घरें होतीं. रजपूत

जमीनदार व खेडवळ मिळून शें सवाशें दुपरीं घरें होतीं. व वाणी उदमी कारागीर वगैरे लोकांचीं पांच पन्नास होतीं. शिवाय रानांतून वगैरे भिल्लांची वस्ति बरीच असून त्यांचा सर्व ओढा ईडरच्या नव्या भिल्ल राजाकडे होता. त्याच्या पाठबळावर ते भोंतालच्या प्रदेशांत वाटेल तसा धुंडावा करीत. लूट करणें हा तर त्यांचा पिढीजाद धंदाच. त्यांत त्यांस थोडा फार राजसत्तेचा आधार मिळालेला, मग काय? ‘आधींच उल्हास त्यांत फाल्गुन मास’ अशांतलीच त्यांची स्थिति झाली. शिवाय त्यांच्या राजानें ज्या गुहादित्यास मारून त्याची गादी बळकाविली होती, त्याची स्त्री व पुत्र त्याच्या हातीं लागलीं नाहींत म्हणून तो जरा भीतच असे. कारण त्यास असें वाटत असे कीं राजपुत्र मोठा झाल्यावर न जाणों कदाचित् तो आपल्यावर गर्दी करील आणि आपल्या सत्तेस धक्का आणील. या-साठीं राजपुत्र हातीं लागल्यास त्याला मारून टाकून आपल्या मार्गांतील कंटक काढून टाकण्यास तो फार टपून होता. राजपुत्रास धरून आणणारास त्यानें मोठें बक्षीस देखील देण्याचें ठरविलें होतें. त्यामुळें त्या प्रदेशांतील साहसी भिल्लांनीं या राजपुत्राच्या शोधार्थ विलक्षण प्रयत्न चालविले होते.

इकडे बाप्पाचा खोडकरपणाही उत्तरोत्तर वाढत चालला होता. तीरकामठा घेऊन तो इतर लहान मोठ्या तरुणां-बरोबर रानांवनांत जाऊं लागला. तेथें हरिणभेकरांची

शिकारही तो त्यांजबरोबर कधीं कधीं मारीत असे. थोडक्यांतच तो आपल्या त्या बरोबरीच्या मंडळींत अग्रगण्य बनला. रानामध्यें भिल्ल वगैरेंच्या पोरांबरोबर कधीं कधीं त्यांतच चुरस उत्पन्न होऊन मार रणें मानावयाचीं. परंतु बाप्पानें त्यांची अशी हुर्रेवडी उडवावी कीं त्यांनीं फिरून कधीं त्याच्या वाटेस जावयाचें नाहीं अशी शपथच घ्यावी. इकडे हे शिकारीचे वगैरे बाप्पाचे ढंग जों जों वाढत चालले तों तों सुशर्म्यास त्याला वागविणें फारच जड जाऊं लागलें. सुशर्म्याच्या घरीं बाप्पास मिळणारा आहार म्हणजे शुद्ध ब्राह्मणी थाटाचा. परंतु त्याचे हे शिकारी सोबती त्याला आतां मोठ्या आदरानें त्यास हरिणाच्या मांसाचे वगैरे पदार्थ देत असत. क्वचित आपल्या घरींही त्यास सग मुद्दाम जेवावयास बोलावीत. बाप्पास घरीं येण्यास कित्येक वेळां मनस्वी उशीर होई. कित्येक वेळां त्याच्याबद्दल इतर मुलांच्या आईबापांच्या वारंवार कागाळ्याही कानावर येत. एकंदरींत बाप्पाला आतां आपल्या घरीं वागविणें सुशर्म्यास फार जड वाटूं लागून याची दुसरीकडे कोठेंतरी तजवीज लावावी या विवंचनेंत तो व त्याची स्त्री हीं पडलीं होतीं. बाप्पाचा त्या दोघांसही फार लळा लागला होता. शिवाय पुष्पगंधेस त्यांनीं वचन दिलेलें होतें कीं बाप्पाचें पोटच्या पोराप्रमाणें संगोपन करून आपण त्यास जगांत त्याच्या क्षात्रकुलास योग्य अशा मार्गास लावूं. तात्पर्य बाप्पाचे

रहाण्या संबंधें काय तजवीज करावी हें एक सुशर्म्यास गूढच पडलें होतें. बाप्पानें आपलें व आपल्या आईबापांचें नांव गांव वगैरे कधींही कोणाला सांगूं नये अशी त्याला सुशर्म्याची सक्त ताकीद असे. त्यानें त्याला सुदेव असें नांव ठेविलें होतें. त्याच नांवानें त्याचे सोबतीही त्याला हाका मारीत. तथापि त्याच्या सोबत्यांस व गांवांतील इतर रजपूत क्षत्रिय जमीनदारांस बाप्पा हा क्षत्रिय असून राजपुत्र आहे अशी बातमी होती.

एके दिवशीं बाप्पाची स्वारी रानांत एका हरिणाच्या मागें लागली असतां आपले सोबत्यांस सोडून बरीच लांब डोंगरांत गेली. त्याच्या सोबत्यांपैकीं एक दोघांनीं बराच वेळ त्याची पाठ राखली होती. परंतु त्या हरिणानेंही अशा हुशीवर हुशी बाप्पास दिल्या कीं, आपले सोबती मागें राहिल्याचें त्यास भान देखील राहिलें नाहीं. व तो ईर्षेनें त्याच्या मागें तसाच पळत चालला. इतक्यांत कर्मधर्मसंयोग असा झाला कीं त्याच डोंगरांत एका ठाकूर पुत्रानें एक वाघाचें जोडें हुसकलें होतें आणि तो आपल्या तीन चार तिरंदाज मित्रांसह त्या वाघांस मारावयास पहात होता. ज्या गुहेंतून त्यांनीं त्या जोडप्यास हुसकलें होतें त्या गुहेंत त्यांचीं दोन पिलें होतीं. हीं पिलें बरीच मोठीं होतीं; आणि आठ पंधरा दिवसांत आईबापांस सोडून स्वतंत्र रहाण्याजोगीं झालीं असतीं. बाप्पानें रोखलेलें हरिण यापैकीं एका वाघानें स्वाहा केलें आणि तो ओझ-

रता बाप्पास दिसलाही. त्या पंचाननाचें तें उग्र स्वरूप पाहून बाप्पालाही पण भीतिच वाटली. कारण त्यानें अजून वाघाची शिकार कधीं केली नव्हती. त्यानें मागें पुढें आपल्या सोबत्यांपैकीं कोणी असेल ह्मणून मोठ्या आशेनें पाहिलें; चार पांच आरोळयाही ठोकल्या. परंतु आसपास कोणी नव्हताच. तेव्हां दिसतो कोण अथवा ओ तरी देतो कोण? खऱ्या क्षात्रतेजाच्या कसोटीची वेळ येऊन ठेपली. बाप्पानें आपला कामठा घेऊन त्याला तीर लावला आणि घारी प्रमाणें चारी बाजूला पहात तो चालला. इतक्यांत तीं वाघ चीं दोन्ही पिलें जुटीनें बाप्पाच्या अंगावर चालून आलीं. बाप्पानेंही आपलें शरसंधान असें अचूक चालविलें कीं दोन बाणांत तीं दोन्हींही पिलें त्यानें घायाळ केलीं. नंतर जवळ जाऊन त्यानें त्या पिलांच्या मानेस आपल्या शेल्याचा फांस घालून त्यांस घेऊन तो परतला. चार दोन पावलें गेला नाहीं तोंच त्याच्या सोबत्यांपैकीं दोन जाणते इसम त्याला हुडकीत असलेले त्यास भेटले. मग काय त्याला विशेषच उत्साह आला. त्यानें आपल्या सोबत्यांस आपल्यास वाघ कसा दिसला वगैरे सर्व हकीकत सांगितली आणि मोठ्या दिमाखांत तो आपल्या इतर खेळगड्यांस जाऊन मिळाला. तों त्यांनींही एक दोन भेकरें मारून आणिलीं होतीं. नंतर सर्व मिळून त्या वाघांच्या पिलाशीं खेळत असतां त्यांतील एकानें एका जमीनदाराच्या पोराच्या पायाचा असा लचका घेतला कीं

तो विव्हळतच पडला मग काय त्या वाघांच्या पिलांना मारून टाकावें ह्मणून बाप्पाखेरीज सर्वांचा आग्रह पडला. परंतु बाप्पा त्यांचें कांहीं केल्या ऐकेना, त्यानें तीं दोन्ही पिलें आपल्या हातांनीं धरलीं आणि तो त्यांस घेऊन त्या मुलांस सोडून दूर जाऊं लागला. इतक्यांत दिवस जरी पावसाळ्याचे नव्हते तरी अचानक आकाशांत ढगें आलीं आणि थोडक्यांतच जोराचा पाऊस येणार असा रंग स्पष्ट दिसूं लागला. जोराचा वारा सुटून धुळीनें अगदीं प्रळय मांडला सर्वांच्या डोळ्यांत धूळ शिरून जो तो चांचपडूं लागला. बाप्पानें त्या सर्वांस मोठ्या कळकळीनें हाका मारून सांगितलें कीं, गडे हो तुह्मी जर असे चौत्रे चार दिशांला फांकून जाल तर आपला या वादळांत निभाव लागावयाचा नाहीं. आपण सर्व मिळून कोठेंतरी एकच निवाऱ्याची जागा पाहून बसूं. आज आपणांस अजून न्याहारीही करण्यास फुरसत मिळाली नाहीं. हो ना करितां करितां बहुतेकांनीं बाप्पाच्या ह्मणण्यास रुकार दिल्यावर त्याच्यावर अत्यंत रुसलेले त्याचे सोबती ही त्यास येऊन मिळाले, व हा छोट्या वीरांचा तांडा जवळच असलेल्या एका दगडाच्या मोठ्या कपारी खालीं बसला. ही जागा चांगली निवाऱ्याची असून त्यांच्या डोक्या-वरील खडकाची कपारीही काळ्या पक्क्या फत्तराची व भली जंगी होती. त्या कपारीच्या बाजूनेंच एक ओढा वाहत असून दहापांच हातांवरच त्याचा एक लहानसा

धबधबा झाला होता. त्या धबधब्यांत बरेंच जीवंत पाणी होतें. वादळ चालूच होतें. वारा विरुद्ध दिशेच्या असल्यानें यांच्यावर धुळीचा किंवा पुढें सुरू झाल्यास पावसाचा मारा होण्याची मुळींच भीति नव्हती. तेथें गेल्यावर बाप्पानें आपल्या त्या लाडक्या वाघाच्या पिलांस एका मोठ्या शिळेस बांधून ठेविलें; आणि नंतर सर्वांनीं मिळून त्या वाघ चावलेल्या मुलाच्या जखमेची व्यवस्था करण्याचा विचार चालविला. त्याची जखम बांधून त्यावर सारखी पाण्याची पट्टी ठेवण्याची तजवीज झाल्यावर सर्वांनीं आपापल्या शिदोऱ्या बाहेर काढल्या आणि वनभोजनास सुरुवात केली.

इतक्यांत विजा चमकूं लागल्या व मोठा गडगडाट होऊन वळीवाचा जोराचा पाऊस सुरू झाला. वारा बंद होऊन नुसत्या पावसाचाच आवाज कानठाळ्या बसविण्यासारखा होऊं लागला. अर्ध घटकेंत डोंगरावरून पाण्याचे लोंढेच्या लोंढे धोधो करीत खालीं उड्या टाकावयास लागले. त्यांतच कांहीं सुटलेले मोठमोठे धोंडेही वाहून येऊं लागले. असला हा सृष्टींतील पंचमहाभूतांपैकीं वारापाण्यांसारखा अत्यंत वेगवान व स्थूल भूतांशीं झगडण्याचा बाप्पास व त्याच्या मित्रमंडळास हा पहिलाच प्रसंग होता. त्यानें त्यांस खाणेंही सुचेना. कांहीं भ्याडांची तर हबेलंडीच उडून गेली. विजांचा चकचकाट ढगांचा गडगडाट, त्यांत गारांचा वर्षाव, असला हा

देखावा ऐन रानांत आणि डोंगर कथाडीला कौतुकानें पाहण्यास चांगलेंच धैर्य पाहिजे. तें सर्वांपाशींच असतें असें नाहीं. किंबहुना फारच थोड्यांना तसल्या प्रकारचें धैर्य असूं शकतें. बाप्पा जरी वयानें केवळ दहाच वर्षांचा होता तरी त्याला हें धैर्य पुरें होतें. परंतु इतरांना तें नसल्यानें भीतीनें त्यांना कांपरें भरलें. कित्येकांस वाटे कीं आपण ज्या कपारीखालीं बसलों आहों ती पाण्याच्या लोंढ्या बरोबर कोसळायाची तर नाहीं ? परंतु त्या सर्वांस बाप्पानें धीर देऊन बरेंच धीट केले. तेंव्हां ते थोडे फार खाऊं लागले; व हळू हळू कित्येक जरा पुढें जाऊन गाराही वेंचून आणूं लागले. गारा वेंचण्याचेंही उदाहरण बाप्पानेंच त्यांस घालून दिलें होतें.

इकडे पाऊस सुरू व्हावयाच्या अगोदरच धुळीनें दाही दिशा धुंद झाल्या असतां डोळ्यांत धूळ शिरून सैरावैरा फिरूं लागलेल्या त्या चावाघी मागें सांगितलेल्या ठाकुरपुत्रानें शिकार साधली. तो व त्याची मित्रमंडळी वावास घेऊन तेथून कोठें निवाऱ्याची जागा पाहणार तों पाऊस सुरू झाला. त्यामुळें त्यांना आपली शिकार जागच्या जागींच टाकून जवळच निवारा सोधावा लागला. परंतु त्यांस तो नीटसा लाभला नाहीं. त्यामुळें त्यांची फार दुर्दशा झाली. त्यांचे सर्व कपडे भिजून चिंब झाले. त्यांना गारांचा असा चोप खावा लागला कीं हाड न हाड ठेंचलें गेलें. आणि थंडीनें कुडकुडत त्यांस खालीं सांचलेल्या व वरून पडणाऱ्या पाण्यांतच बसून वेळ काढणें भाग पडलें.

वळीवाचाच पाऊस तो! थांबला एक घंटाभर पडून. पाऊस थांबतांच ग्रहण सुटल्याप्रमाणें एकदम जिकडे तिकडे एक क्षणार्धांत लख्ख ऊन पडलें. झालें पाऊस होता का नव्हता अशी व्यवस्था झाली.

ठाकुरपुत्र व त्याची मंडळी ऊन पडतांच आपले कपडे वगैरे पिळून वाळविण्याच्या तयारीस लागली. इकडे **बाप्पा**-मंडळ चैनींत खाऊन पिऊन ताजें तवानें झालें व आपल्या शिकारी घेऊन घरीं जाण्याच्या विचारास लागलें.

तिकडे आपलीं पोरें नेलेलीं पाहून व नवराही कोठें सांपडत नाहीं असें पाहून बिथरलेली वाघीण—**बाप्पानें** पकडलेल्या पोरांची आई—वेड्यासारखी डुरक्या फोडीत त्या डोंगरांतून फिरूं लागली. तिच्या डुरकण्यांनीं व त्यांच्या प्रतिध्वनींनीं तें रान अगदीं दुमदुमून गेलें. शिकारीच्या कामांत अनुभवलेल्या ठाकुरपुत्राच्या मित्रांना त्या डुरकण्या ऐकतांक्षणींच पुढें येणाऱ्या संकटाची तेव्हांच ओळख पटली. त्यांनीं आपलीं धनुष्यें उचललीं व मोठ्या सावधागिरीनें ते मार्ग क्रमूं लागले. धनुष्यांच्या दोऱ्या पावसानें भिजून अगदींच कमजोर झाल्या होत्या. त्यांना ताण कसा तो मुळींच राहिला नव्हता. हें लक्षांत येतांच त्यांचा अगदींच धीर सुटला. तथापि त्यांनीं धनुष्यें पाठीला बांधून आपल्या तलवारी नग्न करून प्रसंग आल्यास पटाईशीं दोन हात करण्याच्या तयारीनें ते चालूं लागले.

**बाप्याचें मंडळ** बहुतेक पायथ्याशींच होतें. त्यांचीही वाघिणीच्या त्या डुरकण्यावर डुरकण्या ऐकून

अगदीं गाळण उडून गेली. तों इतक्यांत ती बया अर्ध्या डोंगरांतून चवताळून, किरणावर किरणें ठोकीत येतांना त्यांना चांगली दिसली ही. तेव्हां त्यांनीं झाडां-वर चढून आपला बचाव करण्याची युक्ति काढली. त्या-प्रमाणें प्रथम मित्री व लहान लहान मंडळी झाडावर चढली; व नंतर बाकीच्यांनीं कांसा कसल्या. बाप्पाही अजून खालींच होता. त्याला या प्रसंगीं मोठेंच अव-सान आलें होतें. शेवटीं तो व उरलेले दोघे टग्गे तरुण हे एकाच मोठ्या झाडावर चांगल्या जागीं जाऊन बसले. सर्वांजवळ तीरकामठे व बाण होते. शिवाय कित्ये-कांजवळ लहान लहान तलवारीही होत्या.

पटईनें आपल्या नराचें प्रेत पाहून तर फारच आकांत केला. तिनें शेपूट आपटून आपल्या खालची भूमि दणा-णून सोडली, व चवताळून ती झपाट्यानें इकडे तिकडे धावूं लागली. तों तिला माणसांची चाहूल समजतांच त्या धोरणानें ती ठाकुरपुत्राच्या बाजूला आली व त्याची तिची दृष्टादृष्ट झाली. ठाकुरपुत्र व त्याची मित्रमंडळी तें तिचें उग्र स्वरूप पाहून व आपलीं धनुष्यें त्यांच्या दोऱ्या निकामी झाल्यामुळें निरुपयोगी आहेत हें जाणून ‘ पुढें कसें करावें ’ अशा विचारांत पडली. तथापि त्यांनीं तिला पायथ्याकडे झुलवीत नेऊन खुल्या जागेंत गांठून सामना करण्याचें ठरविलें; आणि त्या प्रमाणें त्यांनीं आ-पला हुलकावण्या दाखविण्याचा क्रम सुरू केला. ती ही

किरणांवर किरणें ठोकीत त्यांच्याच रोखानें पाठलाग करीत चालली. ठाकुरपुत्राचा उद्देश सुदैवानें बराच सफल झाला. तथापि तो पुरता पायथ्याशीं पोंचण्यापूर्वीच तिच्या अगदीं कचाट्यांत सांपडला. दोघांमध्यें आतां अंतर काय तें वीस पंचवीस हातांचें राहिलें होतें; व तो ज्या ठिकाणीं उभा होता तेथून पळण्यास सोईचा मार्ग नसल्यानें तें अंतर वाढविणें शक्य नव्हतें. शिवाय इतक्या धोक्याचें काम होतें तरी त्या वाघिणीची शिकार फत्ते केल्यावांचून परत जाणें हें भागूबाईचें काम करण्याला त्याचें मन घेईना. कारण क्षत्रियाचा बच्चा अंगावर आलेली शिकार टाकून गेला ही गोष्ट कालत्रयींही होऊं नये, असें त्याचें मन त्याला सांगत होतें. ठाकुरपुत्र उभा होता तेथून बाप्पा व त्याची मित्रमंडळी ज्या झाडांवर बसली होती तो झाडांचा घोळका तीस चाळीस हातांपेक्षां जास्त अंतरावर नव्हता. त्यांना आतां हा सर्व प्रकार चांगला दिसत होता. त्यांत बाप्पाला तर विशेषच कौतुक वाटत होतें आणि उत्साह चढला होता. त्यानें आपलें धनुष्य बाण लावून अगदीं सज्ज केलें होतें; आणि प्रत्येक क्षणीं ती वाघीण आपल्या नेमाच्या तडाक्यांत यावी व आपण तिला चीत करावी असें तो इच्छित होता.

वाघिणीला चौघांनीं चारी बाजूनें रोखून मध्यें घोंटाळण्यास लावावी व मग बेताबातानें चेपीत चेपीत तिला अंगावर घेऊन चीत करावी असा ठाकुरपुत्राच्या मंड-

ळाचा संकेत होऊन त्याप्रमाणें त्यांनीं आपले पवित्रे बदलविले. वाघीणही कांहीं वेळ जरा गांगरली. तथापि तिनें मोठ्यानें एक डुरकणी फोडून नीट किरण साधून त्यां पैकीं एकावर अशी अचानक झडप घातली कीं, त्याला तें किरण चुकविण्यास वेळ न सांपडतां तो तिच्या चांगल्याच तडाक्यांत सांपडला. ठाकुरपुत्रानें व त्याच्या उरलेल्या मंडळींनें लगट केली. त्यानेंही त्यांतल्यात्यांत त्या वाघिणीला एक झटक्यासरसा पोटाखालून वार करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याचा वार निसटता लागल्यामुळें तिला थोडीशी जखम मात्र झाली. एवढें बरें झालें कीं, त्याचें मुंडकें पटईच्या हातांत सांपडलें नव्हतें. तो उरावर रक्तबंबाळ झाला. इतक्यांत या तिघांची लगट पाहून त्या वाघिणीनें त्याला सोडिलें. व फिरून किरण बांधून ती ठाकुरपुत्राच्या अंगावर धांवली. ठाकुरपुत्रानेंही अणीबाणीचा वेळ जाणून मोठ्या धैर्यानें तिच्याशीं मल्लाप्रमाणें सामना देण्याचें योजून आपल्या जागेवरून यत्किंचित्‌ही न हालतां तिला समोरून अंगावर घेतलें. तिनेंही अशा धोरणानें किरण धरलें होतें कीं ती नेमकी त्याच्या पट्याच्या हातावरच आपल्या सर्व शक्तीनिशीं जाऊन आदळली. त्यामुळें झालें काय कीं त्याची तरवार लांब जाऊन पडली व त्याला तिचे पंजे मात्र हातांनीं धरावयास सांपडले. झालें. दोघांची झुंज सुरू झाली. साथीदारांसही तिच्या अंगावर चालून जाण्याचा धीर होईना. शिवाय त्या

झुंजींत तीं दोघेंही होलपडत अशीं जोरानें वाटेल तिकडे जात होतीं कीं एक क्षणभरही एका जागीं ठरत नसत. त्यामुळें नेमकें अवसान धरून वाघिणीस वार करितां येण्याची मोठी पंचाईतच होती. तेव्हां तिला फक्त भेवडावण्यावांचून साथीदारांच्या कौशल्याचा या वेळीं कांहीं एक उपयोग नव्हता. ठाकुर पुत्रानें अजून चांगलाच धीर धरला होता. त्याच्या दंडांतून ऊरांतून वगैरे सारखें रक्त चाललें असतांही त्यानें आपलें मुंडकें तिच्या तडाक्यांतून शाबूत ठेवलें होतें. परंतु हें असें फार वेळ निभावण्यासारखें नव्हतें.

बाप्पाच्या मंडळीनें झाडांवरून त्या वाघिणीस भिवडावण्याकरितां खूप जोरानें ओरड केली. त्या ओरडीचा परिणाम जीवावर उदार झालेल्या त्या वाघिणीवर कांहीं एक न होतां ती जास्तच चिडली. तिला भिवविण्याचा ठाकुर पुत्राच्या साथिदारांनीं पुष्कळ प्रयत्न केला; पण व्यर्थ. रक्तस्रावानें ठाकुरपुत्राची शक्ति नाहींशी होत चालली. त्याला आतां आपल्या जिवाची आशा फारच थोडी थोडी होती. होलपडत होलपडत तो व ती वाघीण आतां बाप्पा बसला होता त्या झाडापासून दहा बारा हातांच्या अंतरावर येऊन थडकली. तेव्हां बाप्पाच्या मनांत शरसंधान चालवावेंसें आलें. परंतु तीं दोघेंही इतकीं लवकर लवकर कोलमडत होतीं कीं प्रत्येक क्षणीं त्यांच्या बाजू बदलत. त्यामुळें शरसंधान चालवून ठाकुर पुत्राचा बचाव होईलच असें

वाटेना. त्याच्या मित्रमंडळीपैकींही दोन इसम अगदीं बाण मारण्याच्या बेतांत होते. त्यांना बाप्पानें आवरलें आणि ह्मटलें कीं 'जर खरें शौर्य दाखविण्याची एखादी वेळ असेल तर हीच आहे. खालीं उतरून तरवारीनेंच ह्या पटईचा समाचार घेतला पाहिजे. तरच ठाकुरपुत्र बच-ण्याचा संभव आहे.' हें ऐकून 'छेरे बाबा तसें करणें ह्मणजे मरणाला बोलावणेंच होय' असें त्यानीं उत्तर दिलें तेव्हांच बाप्पा ह्मणाला 'मी तर झाडावरून उतरून या माझ्या लहानग्या तरवारीनें त्या पटईचा समाचार घेऊन ठाकुर पुत्राचा जीव बचावणार. मग जें होणें असेल तें होईल. असल्या पटईशीं लढणाऱ्या योद्ध्यास जर आपण येथें असून वेळेवर साह्य न केलें तर आपलें जिणें व्यर्थ. पहा, दहा वर्षांचा केवळ बाळ असा तो बाप्पा झाडावरून खालीं उतरला; आणि त्याचे सोबती त्याला निवारीत असतांही त्यानें तडक परंतु लपत लपत त्या वाघि-णीच्या पिछाडीवर हल्ला केला; इतक्यांत ऐन बार कर-ण्याच्या सुमारास त्या वाघिणीस याची चाहूल लागली व तिनें आपल्याशीं मल्लयुद्ध चालवीत असलेल्या शत्रूसकट आपया मोहरा फिरविण्याची लगट केली. तथापि बाप्पानें मोठ्यानें ओरडून ठाकूरपुत्रास सांगितलें कीं वीर पुरुषा! भिऊं नको, धीर धर. हें पहा मी हिला चीत केलेंच समज. मात्र आपण तिची अघाडी सोडूं नये' इतकें ह्मणून त्यानें त्यां पटईच्या पुठ्ठ्यावर असा सफाईचा वार केला कीं

चाहल्यारे. लगेच तिनेंही अशा आवेशानें ठाकुरपुत्रास एक हिसका दिला कीं त्याचाही नाइलाज होऊन त्याला तिचा पंजा सोडावा लागला. त्याला होलपाडून ती बाप्पा-कडे वळली. परंतु तितक्या अवकाशांत बाप्पानें मोठ्या चप-ळाईनें दुसरा एक अत्यंत भयंकर वार करून तिला अगदीं घायाळ पाडलें. ठाकुरपुत्रानें ही संधी फुकट दवडली नाहीं. त्यानेंही लगेच त्याच्यांत जरी अगदीं अवसान उरलें नव्हतें तरी एका हातानेंच आपल्या कमरेचा बिचवा काढून तिचें ऊर भोंसकलें. बाप्पानें या वेळच्या तिच्या कोलमडण्याचा चांगलाच उपयोग करून घेतला. ठाकुरपु-त्राला भोंसकलेला बिचवा काढून घेण्याचीही ताकद नव्हती. व रक्त फार गेल्यानें त्याला मूर्च्छाही आली. मात्र तो आतां वाघिणीच्या हातांतून बहुतेक मोकळाच होता. परंतु याचें सुद्धां त्याला भान उरलें नाहीं. बाप्पानें शेवटच्या वारानें त्या पटाईचें शिर छेदिलें; आणि अजून ठाकुरपुत्र काय करितो आहे! लांब कां झाला नाहीं, ह्मणून पाहतो तों तोही जवळच जबर मूर्च्छा येऊन पडला आहे असें त्याला दिसलें. बाप्पाची मंडळी आतां बहुतेक झाडाखालीं उतरली होती, ती इकडे येऊं लागली. बाप्पानें ठाकुरपुत्रास सांव-रण्याचा व शुद्धीवर आणण्याचा यत्न चालविला. इतक्यांत ठाकुरपुत्राचे सोबतीही त्यांच्यांतील पहिल्याच तडाख्यास घायाळ झालेल्या इसमास घेऊन तेथें आले. हलके हलके ठाकुरपुत्र शुद्धीवर येऊं लागला. ईश्वरकृपेनें सर्व कांहीं

नीट होण्याचा सुमार स्पष्ट दिसूं लागला. यथावकाशानें बाप्पाच्या साहसाची व आपल्या बचावाची परस्पर संबद्ध अशी हकीगत ठाकुरपुत्रास समजल्यावर त्याची बाप्पा-बद्दल अत्यंत आदरबुद्धि झाली. बाप्पाला हा पहिलाच प्रसंग उत्तम धब्याप्रमाणेंच झाला. त्यांच्या ठिकाणीं महत्वाकांक्षा उत्पन्न झाली. त्याची स्वतांच्या शक्तीबद्दल व पराक्रमाबद्दल चांगलीच खात्री झाली. तात्पर्य, या प्रसं-गाच्या योगानें बाप्पाच्या आयुष्यक्रमास एक नवीनच वळण लागलें. तें काय व कसें वगैरे मनोरम वृत्तांत आतां पुढल्या भागावर टाकूं.

---

## प्रकरण ७ वें.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ठाकुरपुत्राची व बाप्पाची मैत्री झाली. याचा परिणाम असा झाला कीं सामरसी ( हें त्या ठाकुरपुत्राचें नांव ) स्वतः आपल्या सरंजामासह सुशर्म्याच्या घरीं आला, आणि एकमे-कांच्या ओळखीदेखी होऊन योग्य तो पाहुणचार व प्राथमिक शिष्टाचाराच्या गोष्टी झाल्यावर त्यानें बाप्पाची सुशर्म्याजवळ फार स्तुति केली, आणि 'आपण परवा-नगी द्याल तर मी या आपल्या प्रिय मित्रास आमच्या घरींच राहावयास घेऊन जाईन ह्मणून विनंति करण्यास मुद्दाम आलों आहें' असें सांगितलें. सुशर्म्यास ठा-

कुरपुत्राचें बोलणें ऐकून कसेंसेंच झालें. त्याला एकदां वाटे कीं आपण त्याच्या विनंतीस रुकार द्यावा. फिरून असेंही मनांत येई कीं तसें करण्यांत धोका आहे. अशा परस्पर विरूद्ध विचारानीं त्याचें अंतःकरण क्षुब्ध झाल्या-मुळें त्यानें बाप्पाकडे साशंक मुद्रेनें पाहिलें तों बाप्पानेंही अशी कांहीं मुद्रा केली कीं सुशर्म्याच्या मनांतील घोंटाळा कमी न होतां उलट वाढलाच. शेवटीं त्यानें ठाकुरपुत्रास असें उत्तर दिलें कीं "आपणासारख्यांच्या विनंतीस नाहीं ह्मणणें हें शिष्टाचाराचें लक्षण नव्हे. शिवाय आपल्या घरीं या राजपिंड्याची माझ्या येथल्या पेक्षांही चांगली जोपासना होईल हेंही मी जाणतों. आपलें तर या मुलावर निष्कपट प्रेम जडलें आहे आणि तसें प्रेम सारखें वाडतही जाईल या बद्दल मला शंका घेण्याचें कांहीं कारण नाहीं. कारण आपण या सुदेवास आपला प्राणदाता समजत आहां. इतक्या सगळ्या गोष्टी खऱ्या. परंतु हें मूल फारच हूड आहे. अजून त्याला जगाचा कांहीं एक अनुभव नाहीं. त्याचें वयही नाहीं तसा अनुभव असण्याचें. हें त्याला दहावें वर्ष कुठें ठेकलें नुकतें. याच्या आईनें हा तीन वर्षांचा बाल माझ्या पदरांत घातला व आपण पतीच्या पिष्टपिंडाबरोबर सती गेली. त्या साध्वीस मी वचन दिलें आहे कीं, हा मोठा होईतों मी याचें पालन करीन. त्या वचनास बाध येईल ह्मणन मला भीति वाटते; दुसरें कांहीं नाहीं."

यावर **सामरसीनें** सुशर्म्याची पुष्कळ प्रकारें खात्री केल्यावर व 'आपणही आमच्या तेथेंच चलाना. तेथें मी आपलीही सर्व व्यवस्था करितों. खुशाल अग्निहोत्र चालवून रहा कसे. योगक्षेमाची आपणास बिलकुल काळजी नको' असें जेव्हां अगदीं कळकळीनें व आग्रह-पूर्वक सांगितलें तेव्हां **सुशर्म्या**चा अगदीं नाइलाज झाला. तथापि त्या मानी ब्राह्मणानें आपला निस्पृहपणा दाखवा-वयाचा तो तर दाखविलाच. त्यानें **सामरसीस बाप्पाला** केवळ एक आठवडावर घेऊन जाण्याची परवानगी दिली. व 'मला अग्निनारायणानें येथेंही कांहीं कमी केलें नाहीं. आणि घरच्या घरीं जें वडीलांच्या पुण्याईनें मिळत आहे त्यापेक्षां जास्तीची आपणांस मुळींच इच्छा नाहीं' असें स्पष्ट सांगितलें. ठाकुरपुत्रानें मुकाट्यानें **सुशर्म्याचें** ह्मणणें मान्य केलें. आणि **बाप्पाला** घेऊन तो आपल्या घरीं ह्मणजे **भंडेरगडावर** गेला.

**वीरसी--सामरसीचा** बाप हा भंडेरगड व भोंवताल-च्या २०—२५ कोस प्रदेशाचा धनी होता. तो जातीनें यदुवंशीय क्षत्रिय होता; आणि त्यानें आपल्या वंशाचें मुख्य कर्तव्य जें गोपालन तें उत्तम प्रकारें चाल-विलें होतें. त्याच्या गोशाळेंत हजारों गाई असत. आपल्या मुलाच्या या नवीन दोस्ताच्या एकंदर ऐटीवरून तो महान् पराक्रमी व भाग्यवान् निपजेल अशी **वीरसीची** तेव्हांच अटकळ धांवली. **बाप्पा** व **सामरसी** नेहमीं

जिथें तिथें बरोबर वागत व एक मोठा व एक अगदीं लहान अशी ती त्यांची विलग जोडी गडावरील सर्व लोकांस मोठी कौतुकास्पद वाटे. **सामरसी** वाढ पुरी झालेला गडी आणि **बाप्पा** अगदीं अल्लड पोर. एक लहानपणापासून सर्व प्रकारच्या स्वतंत्र राज्यैश्वर्यांत वाढलेला व दुसरा धर्माच्या आईबापांच्या शुष्क ब्राह्मणी अन्नानें पोसलेला. अशा प्रकारच्या त्या दोघांच्या परिस्थितींत जरी मोठा फरक होता तरी पाहणारांच्या मनांवर त्या दोघांबद्दल जो ग्रह उत्पन्न होत असे त्यांत या फरकाला मुळींच जागा मिळत नसे इतकेंच नव्हे, तर कित्येक वेळां या फरकाच्या अगदीं विरुद्ध प्रकार मात्र घडत असे. कारण दोन तीन दिवस झाले नाहींत तोंच गडावरील लोक **सामरसी**पेक्षांही **बाप्पाचें** कौतुक करण्यांत जास्त गुंग होऊं लागले. त्यानें रोज इतक्या नवीन नवीन अशा कांहीं धाडसाच्या व चतुराईच्या गोष्टी कराव्या कीं सर्वांनीं आश्चर्यानें थक्क होऊन जावें. मल्लविद्या, शस्त्रविद्या, अश्वारोहण वगैरे क्षत्रियांस अवश्य अशा कोणत्याही कलेचें शिक्षण त्याला मार्गानें असें मिळालेलें नव्हतें. घोड्यावर बसण्याचा तर त्याला गडावर आल्यावर पहिलाच प्रसंग. भिल्लांच्या मुलांच्या संगतीनें त्याला बाण मात्र उत्तम मारतां येत असे. त्याची लहानशी तलवार त्याला शिक्षणावांचूनच पण चांगली वागवितां व वापरतां येत असे. पण गडावर आल्यावर

मल्लशाळा, अश्वशाळा, शास्त्रागार वगैरे जेथें जेथें ह्मणून **सामरसी** आपल्या या छोट्या प्राणदात्या मित्रास नेत असे तेथें तेथें प्रथम कौतुकानें व नंतर स्वभावसिद्ध महत्त्वाकांक्षेनें **बाप्पानें** त्या त्या गोष्टीचें आपलें ज्ञान वाढविण्याची इतकी उत्कट इच्छा दाखविली कीं, त्याचे मार्मिक प्रश्न ऐकून सर्वांनीं त्याचें कौतुकच करावें. **सामरसीनें** बाप्पाच्या प्रश्नांचीं उत्तरें शक्य तितकीं सप्रयोग देण्याच्याकामीं कुचराई केली नाहीं. सुतानें स्वर्गास जाणाऱ्या **बाप्पाला** तेवढें पुरें झालें. त्यानें तेथल्या तेथेंच लगेच कांहीं पाहिलेल्या गोष्टींचें इतकें बेमालूम अनुकरण करून दाखवावें कीं, सगळ्यांनीं तोंडांत बोटेंच घालावीं. एकंदरींत गडावर घालविलेल्या आठ दिवसांत **बाप्पानें** सामान्य मनुष्यास आठ वर्षांतही शिकतां येणार नाहींत इतक्या कलांचा बहुतेक परिपूर्ण अभ्यास केला असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. ठाकूर **वीरसी** तर **बाप्पाच्या** एकंदर चेष्टानीं इतका वेडावला होता कीं, तो त्याला आपला धाकटा मुलगाच मानण्याच्या विचारांत होता. शेवटीं **बाप्पाला सुशर्म्याकडे** परत पोंचविण्याची वेळ येऊन ठेपली. ती वेळ गडावरील सर्व लोकांस इतकी वाईट वाटली कीं जणूं त्यांचें सुखसर्वस्वच त्यांना सोडून जात होतें. **वीरसी** व **सामरसी** यांना काय वाटत होतें तें शब्दांनीं व्यक्त करतां येत नाहीं. तथापि ब्राह्मणास दिलेलें वचन मोडणें हें त्यांच्या शक्ती-

बाहेर होतें. ब्रह्मकोप! छेः कल्पनाच दुस्सह ती! मग तसल्या ब्रह्मकोपाचे अग्नीपेक्षांही अत्यंत दाहक असे परिणाम प्रत्यक्ष अनुभविण्याचें धाडस कोणता समंजस मनुष्य करील? **बाप्पाला सुशर्म्या**कडे पोंचविणेंच भाग होतें. **बाप्पा**लाही परत **सुशर्म्या**च्या घरीं जाण्यांत मोठासा आनंद होता असें नाहीं. त्याला गडावर अनेक प्रकारचें सुख अनुभविण्यास मिळालें होतें. त्याला आपल्या पुढील वयांत आपणास काय करितां येईल याचा अंदाज आला होता, व त्याच्या ठिकाणीं असलेली मुग्धमहत्वाकांक्षाही विकास पावली होती. यामुळें, तसेंच **वीरसी सामरसी** वगैरेबद्दल सहवासजन्य प्रेमानें व त्यांनीं त्यास वागवितांना दाखविलेल्या अत्यंत आप्तभावानें त्याच्या मनांत उत्पन्न झालेल्या सस्नेह आदरानें गड व गडावरील माणसें सोडून जाणें **बाप्पा**स फार कठीण वाटत होतें. परंतु गुरुजीबद्दलचा त्याचा पूज्य भाव आणि गुरुपत्नीबद्दलचें त्याचें मातृप्रेम हीं त्यास दुसरीकडे विशेष जोरानें ओढीत होतीं. शेवटीं **बाप्पा**स उत्तम पोषाख व अलंकार वगैरेंनीं खरोखर राजपुत्राप्रमाणें सजवून मोठ्या इतमामानें परत पोंचता करण्याची तयारी झाली. **वीरसी** व **सामरसी** दोघेही त्याच्या बरोबर घोड्यावर स्वार होऊन तयार झाले; व हे त्रिवर्ग परिवारावांचून सडेच वडनगराकडे चालले. त्यावेळीं तिसरा प्रहर उलटून गेला होता.

इकडे सुशर्माही 'बाप्पाला जाऊन आज आठ दिवस झाले. उद्यां सकाळीं तरी तो परत आलाच पाहिजे. तो जर तसा परत न आला तर आपणांस त्याला परत आणण्यास गेलें पाहिजे, अशा प्रकारचे विचार करीत आपला नित्य-क्रम चालवीत होता. तों त्याच्या मनाला, कां कुणास कळे, फारच हुरहुर वाटुं लागली. त्याचा वामनेत्र व वामबाहु स्फुरण पावूं लागले. आज हीं दुःश्चिन्हें काय सुचवितात बरें? बाप्पाच्या जिवाला तर कांहीं अपाय नाहीं ना? अथवा कांहीं अदृष्ट संकट मजवरच तर येणार नाहीं ना ?' अशा अनेक भयप्रदकल्पनांनीं त्याचें मन उद्विग्न झालें. त्याला काम धंदा कांहीं एक सुचेना. शेवटीं विवेकानें त्यानें आपल्या मनाचें समाधान केलें व उद्ईक भंडेरगडाचा हेलपटा घेण्याचा प्रसंगच आला तर पहांटे जरा लवकर आन्हिक आटोपून मार्गस्थ व्हावयाचें असा आपला संकेत आपल्या पत्नीस कळवून तो अंथरुणावर आडवा झाला.

इतक्यांत सुमारें वीस एकवीस वर्षांच्या वयाचा एक तरुण गृहस्थ घोड्यावर बसलेला असा वडनगरांतून चालला होता. त्याच्या मुद्रेवरून तो या प्रांतांत अगदीं नवखा असावा असें स्पष्ट दिसत होतें. रात्रीची वेळ आणि कृष्ण-पक्ष असल्यामुळें अगदीं गुडुप अंधार होता. या नवीन गृहस्थास आपण कुठें उतरावें याबद्दल मोठा विचार पडला होता. होतां होतां तो सहजीं सुशर्म्याच्या घरापुढें थांबला, आणि घोड्याखालीं उतरून त्यानें दारावर थाप मारली, व

'घरांत कोणी आहे का,' ह्मणून विचारिलें. सुशर्म्याचा नुकता कोठें डोळा लागत होता. तोंच त्याच्या कानावर या गृहस्थाची हाक गेली. 'कोण आहे'? 'एक वाटसरू' अशीं प्रश्नोत्तरें होतां होतांच सुशर्म्यानें उठून दार उघडलें. 'महाराज' मी एक अत्यंत संकटांत सांपडलेला क्षत्रिय आहें. मला प्रवासाच्या श्रमानें अतिशय थकवा आला आहे, व चार दिवस कोठें तरी स्वस्थ राहण्यास जागा पाहिजे आहे. आज चार महिने निर्जन अरण्यें व दाट जंगलें यांतून मिळेल तें खाऊन या माझ्या जिवलग मुक्या मित्रासह मी सारखा प्रवास करीत आहें. आज अपरात्र झाली तरी मी या गांवांत आलों, याचें कारण मला विश्रांतीची फार जरुरी आहे. आपण भूदेव सर्व वर्णांचे गुरु व साक्षात् अग्निनारायण आहां. तेव्हां कृपा करून मला आपल्या वरदकृपाछत्राखालीं घेऊन कृतार्थ करा, येवढीच विनंति आहे. अशा प्रकारचे त्या तरुण क्षत्रियाचे दीन बोल ऐकून सुशर्म्यानें त्याला 'या, सध्या आंत तर या' ह्मणून आंत घेतलें आणि 'आपला घोडा त्या तिथें बांधा' असें ह्मणून अंगणांतील एका कोपऱ्याकडे बोट दाखविलें. प्रवाशानें घोडा आंत आणल्यावर सुशर्म्यानें पुनः दार लाविलें.

ही वेळ ह्मणजे एकंदर उत्तर हिंदुस्थानांत मोठी चळवळीची होती. प्रत्येक राज्यपीठ अन्तःकोपानें व मुसलमानी धर्माच्या टोळधाडीनें, भुंग्यानें कोरलेल्या मंचकाप्रमाणें अगदीं कोरम झालें होतें. उत्तरेकडे सिंधप्रांत तर खली-

फाच्या सरदारानीं बहुतेक उध्वस्त करून टाकिला होता. दाहिरसिंधचा राजा आज कित्येक वर्षें या इमामदांडग्यांशीं खूप शर्तीनें लढत होता. परंतु शेवटीं **महमद बिन कासिम** यानें त्याला पराजित करून त्याच्या दोन मुलींसुद्धां सर्व राणीवसा कैद करून नेला होता. त्याच्या तरुण मुलानें आपल्या बापाच्या शत्रूचा सूड उगविण्याकरितां बरीच धडपड केली; परंतु व्यर्थ. शेवटीं आपला आतां देशीं निभाव लागत नाहीं असें पाहून तो अज्ञातवासांत परदेश कंठीत होता. गुजराथ, काठेवाड वगैरे कडेही वनराज चावडा आपलें गेलेलें राज्य फिरून मिळविण्याच्या तयारींत होता. अजमीरच्या राज्यावर मुसलमानांचा हल्ला होऊन त्याच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडालेल्या होत्या. आणि **माणिकराय** व त्याचा मुलगा या दोघांनींही शत्रूची पिच्छा पुरविण्यांत आपल्या व आपल्या अत्यंत शूर लोकांच्या प्राणांचे बळी दिले होते. या **चव्हाण** वंशांतील लोकांनीं गुजराथच्या पश्चिम किनाऱ्यापर्यंत मुसलमान बंडखोरांचा पिच्छा पुरविला. तिकडे कनोजचा **हरचंद**ही या जबरदस्त शत्रूशीं प्रत्यहीं सामना करण्याची सिद्धता करण्यांत रात्रंदिवस गुंतला होता. त्याच्या प्रदेशासही बाजू बाजूनें **महमद** बिन **कासिमा**च्या आडदांड शिपायांनीं फार त्रास दिला होता. **दाहिर** राजाच्या ज्या दोन मुली या **महमदा**नें धरून नेल्या होत्या त्या अत्यंत रूपवती असून उपवर होत्या. त्या

मुलींस खलीफाला नजर कराव्या ह्मणून त्यानें नेल्या होत्या. तथापि त्या कन्यांनीं आपल्या डोळ्यां देखत आपल्या कुलाच्या शत्रूचा प्राण घेण्याचा व आपलें शुद्ध शरीर जीवंतपणीं तरी विधर्मी पुरुषाच्या कामानलांत होरपळूं न देण्याचा निश्चय केला होता तो त्यानीं मोठ्या चतुराईनें पारही पाडला. **महमदानें** या दोन मुली खलीफास नजर पाठविल्या. त्याप्रमाणें खलीफाच्या तख्तासमोर त्यांस उभें करण्यांत आलें. त्यांनीं तेथें खलीफाच्या बोलण्याचा वगैरे यत्किंचित्‌ही तिटकारा न दाखवितां आपण त्याच्या दरबारीं अत्यंत खुष आहों असें दाखविलें, व त्याच्या कामेच्छेस आपल्या कटाक्षादि चेष्टांनीं पूर्ण ज्वलित करून त्यास आपल्याशीं मोठ्या विश्वासानें व प्रेमांधपणानें भाषण करण्यास प्रवृत्त केलें. नंतर योग्य समय जाणून "**महमदानें** आमचा देह विटाळला असल्यानें आपल्यासारख्या धर्माध्यक्षाच्या उपभोगास तो आतां मुळींच पात्र नाहीं येवढ्याबद्दल आह्मांस फार दिलगिरी वाटते" असें मोठ्या दीनवाण्या शब्दांनीं व डोळ्यांत आसवें आणून त्यांनीं सांगितलें. झालें. खलीफाची स्वारी संतापानें लाल झाली; आणि लागलीच त्यानें महमदास दरबारांत आणवून तेथल्या तेथें त्याचा शिरच्छेद करविला. तोंच इकडे या दोघीही मुलींनीं एकमेकींस खंजीर खुपसून आपल्या प्राणांचा अंत करून घेतला. धन्य! धन्य त्या वीर बाला! त्यानीं आपलें

क्षात्रकुलजत्व, आणि भारतधर्मीयत्व गाजविलें खरें. वरील प्रकारच्या शोकपर्यवसायी परंतु भारतीयांच्या उज्वल कीर्तिदीपास तैलरूपी जीवन पुरविणाऱ्या गोष्टी या काळीं या हिंदुस्थानांत प्रत्यहीं घडून येत असत. जशी अन्यदेशीय व विधर्मी लोकांच्या त्रासानें तशीच स्वदेशीय परंतु भिन्नधर्मपंथी लोकांच्या आपापसांतील भांडणांनीं आह्मा भारतीयांची या वेळीं अत्यंत दैना उडून गेली होती. आमच्या अंतस्थ कलहाचें मूळ जितकें व्यक्तिनिष्ठ, लोभमूलक • महत्वाकांक्षेंत आहे तितकेंच तें अत्रस्थ धर्मपंथांतील परस्पर विरोधांत आहे. या वेळेस **जैनधर्म** व **अद्वैतानंद**दायक सनातन **भारतधर्म** यांचा, त्याचप्रमाणें **शाक्त, शैव, वैष्णव, गाणपत्य** आणि **सूर्योपासक** व इतरही अनेक विशिष्ट देवताभिमानी धर्मपंथांचा अव्याहत झगडा चालत होता. धर्माच्या बाबतींत एकच एक गीर्वाण भाषा या काळच्या पूर्वकालापर्यंत जी चालू होती व त्यायोगानें द्विजातीयांचा अभ्यास त्याच एका भाषेच्या द्वारें जो होत होता तें सर्व गाडें बदलून आतां प्राकृत भाषा नव्यानेंच पुढें येऊं लागल्या होत्या. त्यामुळें धर्मग्रंथ व इतर शास्त्रकलांचे ग्रंथ जे आजपर्यंत एकट्या संस्कृतभाषेंतच लिहिले जात असत, व संस्कृत जाणणारांकडूनच वाचले व सुधारले जात असत, ते आतां सर्वच प्रसंगीं नाहीं तरी कांहीं प्रसंगीं अनधिकारी नीच वर्णांतील अदूरदृष्टि अहंमन्य लोकांकडून प्राकृतांतून लिहि-

ले वाचले जाऊं लागल्यामुळें सनातन आर्यधर्माचा मूळ-पाया व या काळांत त्यावर उठली जाणारी इमारत यांचा मेळ बसेनासा होऊन एकंदर सर्वच रचना डळमळूं लागली. त्यामुळें भूकंपाप्रमाणें हा अध्यात्मज्ञानकंप भारतीयांच्या मनास जबरदस्त धक्का देत असे, व त्यास अहर्निश अस्वस्थ करून सोडीत असे. तात्पर्य काय, कीं भारतीयुद्धापासून हा काळपर्यंत जवळ जवळ चार हजार वर्षें सांपडलेल्या अव्याहत स्वास्थ्यानें, साम्राज्यानें, श्रौत स्मार्त औपनिषद ज्ञानानंदानें व बौद्ध जैन इत्यादि आचारविचारबंधनें शिथिल करणाऱ्या धार्मिक बऱ्या वाईट चळवळींनीं आणि शेवटीं श्रीमदाचार्यांच्या अद्वैत सिद्धांतानें पुनरपि प्राप्त झालेल्या आनंदाच्या पूर्णभरानें भारतीयांची स्थिति राष्ट्र या नात्यानें निरिच्छ योग्यासारखी झाली होती. स्वयंतुष्ट व पूर्णसमाधानी अशी वृत्ति साहजिकच बनल्यावर बाहेरच्या उठाठेवी करण्याची कोण काळजी करतो? त्यामुळें शक्ति वगैरे असूनही केवळ, अनभ्यासे विषं विद्या या न्यायानें, नवीन जोमाच्या उलट्या काळजाच्या महंमदी धर्ममदांध व राज्यलोभी लोकांशीं झगडतांना अवश्य लागणाऱ्या कुटिलनीतीचा वगैरे उपयोग भारतीयांस योग्य वेळीं मुळींच करितां येऊं नये यांत विशेष आश्चर्य तें कसलें! शहाणा म्हणजे लुच्चा ही अलीकडील नीति त्यांच्या मनास स्पर्शही करीत नसे. त्याचप्रमाणें शहाणा म्हणजे लुच्चेगिरी समजणारा अशा अर्थाची व्याप्ति

त्यांच्या शहाण्याच्या व्याख्येंत जरी होती तरी तो अर्थ नुसता लक्षांत ठेवण्याची सुद्धां त्यांना हजारों वर्षांत पाळी न आल्यानें शहाणपणाचें तें गौण अंगही स्मरणांतून पार निघून गेलें होतें. शहाणा ह्मणजे सरळ वर्तनाचा, ज्ञानसंपन्न, नीतिमान्, शास्त्रकला जाणणारा व स्वधर्मरत इतकीच काय ती त्यांची शहाणपणाची व्याख्या आतां कायम उरली होती. आणि त्यांत कधीं काळीं कां होईना, परंतु अवश्य असणारी भर त्यांना पाडतां यावी ह्मणूनच त्यांजवर ह्या नूतन धर्मीयांच्या धाडीचा ईश्वरानें प्रयोग केला असल्यास नकळे.

वरील प्रकारचे आशयाचाच नवीन आलेला तरुण प्रवासी व **सुशर्मा** यांजमध्यें संवाद चालला होता. तोच विस्तारभयास्तव सर्व साधारण पद्धतीनें सध्यांच्या विचारसरणीस अनुरूप असा मी थोडक्यांत दिला आहे. असो. आतां येथेंच या विषयाची रजा घेऊन वाचकांची व या नवीन प्रवाशाची.ओळख पुढल्या प्रकरणांत करून देऊं.

---

## प्रकरण ८ वें.

'कर्मणो गहना गतिः' ह्मणतात तें कांहीं खोटें नाहीं. **वीरसी सामरसी** आणि **बाप्पा** हे तिघे संध्याकाळच्या प्रहर दिवसास आपल्या मार्गास लागल्यावर बोलत चालत जात होते. ऊन कोवळें झालें असून सृष्टिसौंदर्य मोठें

नयनमनोहर होतें. दिवस भाद्रपदाचे, वास्तवीक पाऊस संपत आला होता. तथापि हे किल्ला सोडून दोन तीन कोस गेले नाहींत तोंच आकाशाचा रंग फिरला. हे यावेळीं ऐन खिंडींत होते. हां हां ह्मणतां सर्व आकाश मेघाच्छादित होऊन विजा चमकुं लागल्या. त्यांनीं आपल्या घोड्यास टांचा देऊन पाऊस सुरू होण्याच्या अगोदर निदान खिंडपार व्हावें असा विचार केला. पण यांच्या विचारास विश्वाच्या कारभारांत कितीसा थारा मिळणार ? यांचा विचार यांच्याजवळ राहिला; आणि पाऊस एकदम धूम धडाक्यानें सुरू झाला. नानू कांकूं करतात तों खिंडींतून पाण्याचे लोटच्या लोट सुरू झाले. दगडाचे गोटे पाण्याच्या लोटासरसे गडगडत खालीं येऊं लागले. घोड्यांची पावलें जमिनीवर ठरेनात. एकंदरींत या प्रवाश्यांची अगदीं त्रेधा उडून गेली. वर जातां येईना. मागें येतां येईना. तिघांनींही आपले घोडे थांबवले आणि खुशाल पाऊस थांबण्याची वाट पहात खिंडीच्या एका कडेला उभे राहिले.

पाऊस आतां थांबेल मग थांबेल ह्मणतां ह्मणतां तिनसांजा झाल्या तरी त्याला खळ ह्मणून पडेना. शेवटीं तीन घटका रात्रपर्यंत पाऊस थांबला नाहीं. घोडे व वरील स्वार गारठून गेले. **वीरसी** व **सामरसी** यांस एकदां वाटे कीं परत गडावर जावें; फिरून ब्राह्मणाच्या कोपास पात्र होण्याची ही भीति त्यांच्या पुढें दत्त ह्मणून

उभी राही. वडनगर अजून चांगलें सहा सात कोस लांब होतें. शेवटीं त्रिवर्ग खिंडीखालीं तर उतरले. तेथें त्यांनीं आपलीं वस्त्रें पिळून घेतलीं व मोठ्या वेगानें पुढें चालले. कोस अर्धा कोस चालून गेले नाहींत तों रात्रीच्या अंधारानें त्यांस असें चकविलें कीं, ते अचानक एका ओढ्यांत येऊन ठेपले. ओढ्यास नुकतेंच पाणी चढत होतें. परंतु पाण्याला ओढ फार होती. ओढ्याचें पात्र लहानच होतें तथापि आपण ह्या ओढ्यांत आलों इतकें भान येऊन ते जों पुढें कसें करावयाचें वगैरे विचार करतात तों मागून घोंघों पाण्याचा पर्वतप्राय लोंढा येत असल्याची त्यांस अटकळ झाली. चारी बाजूला पाहून त्रिवर्गांनींही आपले घोडे दहाबारा हातांवर एक उंचवटा दिसत होता त्याकडे वळविले. ते त्या उंचवट्याजवळ येऊन आपले घोडे ओढ्यांतून बाहेर काढण्याच्या बेतांत आहेत तोंच पाण्याचा लोंढा त्या जागीं येऊन पोंचला आणि घोड्यांचे पाय जागीं न ठरून तिघेही घोड्यांसकट त्या लोंढ्याबरोबर गटंगळ्या खाऊं लागले. शेवटीं घोडे एकीकडे व आपण एकीकडे अशी स्थिति होते कीं काय अशी भीति पडून त्याचें धाबें गडबडलें. तो लोंढा येतांच ओढा व त्याच्या तासावरील आजूबाजूची माळजमीन दुतर्फा सर्व पाण्यानें भरून गेली व जमीनीवर असतांही समुद्रांत असल्याचा त्यांस भास झाला. शेवटीं एकमेकांपासून जवळ असण्याची त्यांची सर्व खटपट वायां जाऊन तिघे तीहींकडे झाले.

मग त्या त्यांच्या धांदलीस आणि घोटाळ्यास काय पारावार? कांहीं वेळ ते एकमेकांस हाका देत होते. पण त्याही पुढें एकमेकांस ऐकूं येईनाशा झाल्या आणि कोण जाणें ती काळरात्र त्या तिघांचाही बळी घेण्याच्यात्र विचारांत नव्हती. म्हणून!

कर्मधर्मसंयोग असा झाला कीं या सुमारास **ईडरच्या** भिल्लराजास आपल्या शत्रूच्या मुलाची बातमी लागली व तो इतका अल्पवयी आहे तरी मोठा शूर व पराक्रमी आहे असें ही कळलें, ह्मणून त्यानें लगेच आपले विश्वासू असे पांच चार असामी प्रत्येकाबरोबर वीस पंचवीस लोक देऊन त्यांस रानांत वगैरे एकटा गांठून पकडून आणण्याकरितां पाठविले. त्यांपैकीं एकजण त्यास रानावगैरेंत गांठण्याच्या भरीस न पडतां अचानक वडनगरांतील **सुशर्म्याच्या** घरास पहांटेचा चालून आला. सकाळीं उठून ब्राह्मण जों दार उघडतो तों त्याच्यापुढें एक अडदांड भिल्ल सशस्त्र उभा. त्यानें अंगावर उंचीं वस्त्रें परिधान केलीं होतीं व तो कोणा क्षत्रिय राजाचा सरदार असावा असें त्याच्या थाटावरून दिसे. त्यानें **सुशर्म्या**स प्रणिपातपूर्वक 'आपणाकडे माझें कांहीं काम आहे; आपण तेवढें कराल तर आमच्या महाराजांकडून आपणांस मी मोठें बक्षीस देववीन' अशाप्रकारें बोलण्यास सुरवात केली; आणि उत्तराचीही वाट न पाहतां तो आंत घुसला. 'राजाजवळ अपणांस कांहीं एक मागावयाचें नसून आपण राजकार्य करण्यास कोणत्याही प्रकारें

बांधलेले नाहीं' असा जबाब देऊन सुशर्मा त्या भिल्लाकडे पहात व आपल्या वामनेत्र व वामबाहुस्फुरणाचाच हा प्रत्यय आला असें मानीत स्तब्ध उभा राहिला. इतक्यांत रात्रीचा क्षत्रिय प्रवासी जागा झाला व सुशर्म्याशेजारीं आश्चर्ययुक्त मुद्रेनें उभा राहिला. थोडक्याच अवकाशांत त्या भिल्लानें आपल्या बोलण्याचा सवन वाढविला व ब्राह्मणाचाही क्रोधाग्नि प्रज्वलित होऊं लागला. कारण आडचौकशीनें काम भागत नाहीं असें पाहून 'गुहादित्याचा मुलगा आमच्या महाराजांचा वैरी तूं लपविला आहेस तो आमच्या स्वाधीन कर' असें ह्मणून तो भिल्ल सरळ मुद्यावर आला. तों इतक्या अवधींत त्याचे बहुतेक अनुचर तेथें जमले. आपणांस गुहादित्याचा मुलगा मुळींच माहीत नाहीं. तुह्मी येथें दंगा करूं नका. आल्या वाटेनें चालते व्हा मुकाट्यानें. अशा रीतीचा सुशर्म्यानें ठासून जबाब दिला, व तो तरुण क्षत्रियाकडे विलक्षण मुद्रेनें पाहूं लागला. हाच तर गुहादित्याचा मुलगा नसेल ना ? असें त्या भिल्लास वाटून 'हा कोण आहे ? याच्या चेहऱ्यावरून हा राजपुत्र असावा असें दिसतें. पकडा याला बघतां काय ?' अशाप्रकारें तो अडदांड भिल्ल गर्जावयास लागला. तोंच त्या तरुणानेंही चपळाई करून आपलें धनुष्यबाण व खड्ग घेतलें आणि 'हा काय दंगा माजविला आहे तुह्मी निरपराधी ब्राह्मणाच्या घरीं ? चला अगोदर, बाहेर व्हा. येथें गुहादित्याचा मुलगा वगैरे कोणी नाहीं.'

असें दरडावीत त्यानें आपला विद्युल्लतेप्रमाणें चकाकणारा खड्ग पडताळला हें पाहतांच सुरम्याला काय वाटलें याचा अंदाज करणें फार कठीण आहे. "आज हा तरुण राजपुत्र आपल्यासाठीं बळी पडला तर तें पाप आपण कुठें फेडूं ? याला निवारून भिल्लांस खरी खरी हकीगत सांगूं काय ? छे. तसेंही करितां येत नाहीं. तर काय, मी स्वतः ह्यांच्या स्वाधीन होऊं ? हो असेंच बरें. पण माझ्याशीं त्यांना काय करावयाचें आहे ? मी स्वाधीन झालों तरी सुदेवाला आणून दे ह्मणून ते माझा छळ करणारच. अरे देवा काय हा प्रसंग ! सुदेव येथें नाहीं पण हा तरुण राजपुत्र याच वेळेस कां बरें येथें या संकटांत पडण्यास अचानक धाडलास ?" इतक्यांत त्यास एक नवीन विचार सुचला व तो त्या भिल्लांस उद्देशून ह्मणाला, "अहो, या तरुण गृहस्थांनीं आपलें काय केलें आहे ? हें पहा, यांचें वय लक्षांत आणा. हे आतां चांगले अठरा वर्षांचे गडी आहेत. आणि गुहादित्याचा मुलगा मला जी आठवण आहे तीवरून या वेळीं फार तर दहा वर्षांचा असावयाचा. आपल्या राजानें आपणांस काय सांगितलें आहे ? उगाच सांपडेल त्या क्षत्रिय पुत्रास धरून आणावयास तर नाहीं सांगितलें. तसें सांगितलें असेल तर मग चालूंद्या हवें तसें. परंतु हें पक्कें समजा कीं, अशा अन्यायानें आपला राजा त्रिमासही राज्यावर टिकणार नाहीं. हा या ब्राह्मणाचा शाप कधींही

खोटा होणार नाहीं. तुह्माला माझा वहीम ना ? हा मी तुमच्या बरोबर तुमच्या राजाकडे येण्यास सिद्ध आहें. चला !" **सुशर्म्या**च्या वरील भाषणाचा चांगलाच परिणाम झाला; व हो ना करितां करितां त्या भिल्लांनीं **सुशर्म्या**चें सर्व घर शोधून आपली तूर्तातूर्त खात्री करून घेऊन तेथून पाय काढला. या येवढ्या वेळांत त्या तरुण क्षत्रियाची व त्यांची चकमक उडण्याचा प्रसंग शंभरदां आला. परंतु प्रत्येक वेळेस **सुशर्म्या**नें आपल्या ब्राह्मणोचित अशा शान्ति व क्षमा यांनीं त्या तरुण क्षत्रियास माघार घेण्यास लावावें. हें इतकें होते आहे तों प्रहर दिवस आला. 'फिरून, **सुदेव** अजून कां आला नाहीं' ही काळजी आपली ब्राह्मणाला डचवूं लागली. हा सहवासजन्य ममतेचा परिणाम. त्या ममतेच्या पाशांत मन गुंतलें कीं **सुदेव** जर यावेळीं ठरल्याप्रमाणें घरीं आलेला असता तर केवढा अनर्थ गुदरला असता याचेंही भान ह्या त्याच्या धर्मपित्यास नाहींसें होई. लगेच 'आपला **सुदेव** सुस्थळीं आहे.' ईश्वरानेंच ठाकुरपुत्रास त्याला जास्त दिवस तेथें ठेऊन घेण्याची बुद्धि दिली, हा केवढा त्याचा आपल्यावर उपकार' असें वाटून त्या ब्राह्मणश्रेष्ठाचें हृदय भरून येई. लगेच इकडे आपल्या तरुण पाहुण्याकडे पाहून त्याच्यानें असेंही ह्मटल्यावांचून राहवत नसे कीं 'आपण वनवासास त्रासून माझ्या घरीं विश्रांतीसाठीं उतरलांत पण मी पापी, माझ्या संगतीनें आपणावर आज केवढा प्रसंग गुदरला.'

यावर ' छेः छेः ' आपण असें मानण्याचें कांहीं एक कारण नाहीं. हा माझाच खडतर पायगुण आपणास भोंवला आणि त्याबद्दल मला अत्यंत वाईट वाटत आहे. तथापि माझाही नाइलाज आहे. ईश्वर या अभाग्यास कधीं स्वकुलोचित असें स्वशत्रूशीं लढतांना मरण देईल त्या दिवसाची वाट पहात मी आपलें राहिलेले आयुष्याचे दिवस कंठीत आहें. तो दिवस लवकर येईल असा आपण दयानिधे द्विजश्रेष्ठा मला आशीर्वाद द्या ह्मणजे मी कृतार्थ आहें.' अशाप्रकारें त्या क्षत्रिय पुत्रानें भाषण केलें आणि शेवटीं ' महाराज हें काय गूढ आहे ? हे भिल्ल येथें कां आले होते व आपणावरच त्यांचा वहीम कां इत्यादि प्रकार जर आपण मला सांगण्यासारखे असतील तर कृपा करून सांगावे.' अशी त्याची विनंति केली. तीस मान देऊन **सुशर्म्यानें**ही त्यास **बाप्पा**बद्दल सर्व हकीगत निवेदन केली.

आतां मागील कथेचें अनुसंधान पाहिलें पाहिजे. पण तें कसें पाहणार ? **वीरसी सामरसी** आणि **बाप्पा** हे तीन तिहींकडे झालेले असल्यामुळें त्यांच्या मागें आपण कसे जाऊं शकणार ? कोणाची तरी एकाचीच पाठ धरावी ह्मटलें तरी तो एक तरी अमक्याच ठिकाणीं आहे अथवा अमुकच दिशेस गेलें असतां सांपडेल असा काय नियम ? या अफाट रानांत आणि दऱ्या खोऱ्यांत कुठें कुठें ह्मणून त्यांचा शोध करावयाचा ? छेः आपल्याला हें काम

होणें कठीण दिसतें. तथापि स्वस्थ बसून तरी काय उपयोग! प्रयत्न हे केलेच पाहिजेत. मग फळ ईश्वराधीन. तर मग चला, धुंडूं तर खरें, आपले पाय चालतील तोंपर्यंत. या त्रिवर्गीपैकीं प्रत्येक आपापल्या ठिकाणीं काहींसे अशाच प्रकारचे विचार करीत रानांत सैरावैरा हिंडत होते. परंतु दुर्दैवाचा क्रम नेहमीं वांकडाच असावयाचा एकमेकांस हुडकून काढण्याकरितां ते जों जों धडपड करीत तों तों ते एकमेकांपासून दूर दूरच होत. मन चिन्तीतें वैरीही चिंतीत नाहीं; याप्रमाणें त्यांचे परस्परांविषयींचे तर्कही विलक्षणच चालत.

आतां आपण जरा दुसरीकडे दृष्टि फेंकूं. ठाकुर **वीरसी** व **सामरसी** ठरल्याप्रमाणें परत आले नाहींत ह्मणून गडावरील त्यांच्या कारभाऱ्यानें त्यांच्या शोधार्थ लोक पाठविले होते ते ह्या सुमारास खिंड उतरून खालीं आले होते. ते पुढें कांहीं अंतर चालून जातात तों त्यांस **वीरसी**चा घोडा मोकळाच इकडे तिकडे कावराबावरा फिरतांना दिसला. त्यास पाहून त्यांचें धाबें गडबडलें व आपल्या यजमानास कांहीं तरी अपघात घडला असावा अशी त्यांची खात्री झाली. तेव्हां त्यांनीं त्या घोड्यास पकडलें व पुढें काय करावें याचा विचार चालविला. तों पुढें कांहीं अंतरावर दुसरा एक घोडा तसाच सैरावैरा फिरतांना त्यांच्या नजरेस पडला. जवळ जाऊन पाहतात तों तो घोडा आपल्या छोट्या यजमानाचा आहे

असें त्यांस आढळलें. मग काय विचारतां ! त्यांच्या त्या घाबरगुंडीस पारावारच उरला नाहीं. शेवटीं त्यांपैकीं एकानें **वडनगरास** जाऊन **बाप्पा** तरी ब्राह्मणाच्या घरीं पोंचला आहे किंवा नाहीं याचा शोध घ्यावा व तेथेंच लागल्यास कांहीं जास्त शोधही करावा आणि एकानें परत गडावर जाऊन आणिक शंपन्नास लोक घेऊन यावें व बाकीच्यांनीं त्या जंगलांतच घोडे सांपडले त्याच्या आ-सपास चतुःसीमेंत आपल्या धन्यांचा शोध चालवावा असें ठरून त्याप्रमाणें लगेच व्यवस्थाही झाली.

इकडे रात्रीच्या प्राणघातक संकटांशी झुंजतां झुंजतां तिघांचीही तिरपिटी उडाली व प्रत्येक क्षणीं आपण मृत्यु मुखांत सांपडतों कीं काय अशी त्यांस भीति पडूं लागली. शेवटीं रात्र निवळत चालली. ओढ्याचें पाणी ओसरत चाललें. ओढ कमी कमी होत चालली. आणि पाय जरा तरी जमीनीला टेंकला असतां तेथें ठरूं लागला. तेव्हां पुनः नसताच जोर व आशा बांधून **बाप्पाची** स्वारी कसें तरी त्या ओढ्याच्या बाहेर पडावें ह्मणून धडपडूं लागली. परंतु अंगांत ताकद मुळींच नसल्यानें व थंडीनें हात पाय आंखडून त्यांतून कळा निघत असल्या-मुळें त्याचा कांहीं इलाज चालेना. **वीरसी** व **साम-रसी** यांचीही वाट तीच झाली. शेवटीं निराशेनें त्यांनीं सर्व प्रयत्न सोडून दिले आणि ईश्वरावर हवाला ठेवून जिकडे वाहवत जाऊं तिकडे जाऊ ह्मणून त्रिवर्गही पा-

ण्याच्या वरती कसें तरीं मुंडकें राहील इतक्या व्यवस्थेनें वाहत चालले. हा ओढा **बनास** नदीस तिच्या उगमा पासून जवळच मिळत होता. ते दोघेही पहांटेसच ओढ्याच्या मुखाजवळील दलदलींत दोघे दोन दिशांस अडकले व तेथून मोठ्या कष्टानें कसे तरी बाहेर पडले.

**बाप्पाला** वरचेवर असा हिसळा येत असे कीं प्रत्येक वारीस तो ओढ्याच्या बाहेर पडण्यास भगीरथ प्रयत्न करी. असें होतां होतां ज्या **पाराशर** वनांतून हा ओढा जात होता त्या वनांतच एका ठिकाणीं पहांटेच्या तीन चार घटका रात्रीं **बाप्पा** ओढ्यांतून बाहेर पडला. बाहेर येतांच पुढें एक पाऊलही न टाकतां तो मूर्च्छा येऊन निश्चेष्ट जमीनीवर पडला. ओढ्यांतून वाहत असतां शेंकडो गटांगळ्या खाऊन त्याच्या नाकातोंडांतून पाणी शिरलें होतें. प्राणाची आशा आणि लोकोत्तर धैर्य यांनीं केवळ त्याला जिता बाहेर काढला. नाहींतर केव्हांच मरावयाचा. शिवाय तारत्या पुढें मारत्याचें काय चालणार ह्मणून जें ह्मणतात त्याचाच हा एक मासला होता. **बाप्पा** ज्या ठिकाणीं पडला होता तेथून जवळच **हारीत** ऋषींचा भूमिगत आश्रम होता. त्यांच्या नित्यक्रमाप्रमाणें ते पहांटे ब्राह्म मुहूर्तावर उठून शौच विधीस निघाले होते. शौचविधि आटोपून मुखमार्जन व दंतधावनाकरितां ह्मणून स्वारी त्याच ओढ्याच्या कांठीं आपल्या नेहमींच्या सांप्रदायाप्रमाणें आली. तों त्यांस ओढ्याच्या वरतीही बराच

गाळ वगैरे लागला त्यावरून रात्रीं ओढ्यास पुष्कळ पाणी आलें असावें असा त्यांचा तर्क धांवला. त्या गाळांतून ठेंचाळत ठेंचाळत स्वारी जी चालली ती बाप्पा ज्या लहानशा खडकावर बेशुद्ध होऊन पडला होता त्यावर येतांच त्यांच्या पायांस त्याचें शरीर लागलें व लगेच चपापून जरा न्याहाळून व जास्त चांचपून पाहतात तों धुगधुगी आहे नाहीं अशा स्थितींत पडलेलें हें कोणा तरी तरुणाचें शरीर आहे असें त्यांच्या ध्यानांत आलें. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' ह्या पैकीं हे एक असल्यामुळें त्यांनीं लगेच त्याला शुद्धीवर आणण्याचा इलाज चालविला. आपल्या आश्रमांतून भस्म आणून त्यांनीं तें त्याच्या अंगास खूप जोरानें चोळचोळून फांसलें व हळू हळू त्या भस्माच्या उबाऱ्यानें तो शुद्धीवर येऊं लागतांच ते आपल्या दंतधावनादिविधीस लागले मुनिप्रसादानें बाप्पा त्या मृत्युप्रद मूर्च्छेच्या तडाक्यांतून सुटून, गाढ सुखनिद्रेंतून जसें कोणी सुस्वप्न अनुभवण्यास लागावें तसा, आपणास कोणी महान तपस्वी प्रसन्न होऊन 'चक्रवर्तीभव' असा आशीर्वाद देत आहेत, अशा प्रकारचें सुस्वप्न अनुभवूं लागला. आणि त्या स्वप्नानंदाच्या भरांतच तो पूर्ण जागा होऊन इकडे तिकडे पाहूं लागला तों मुनिराज चटकन त्याच्या दृष्टि आड झाले आणि आपल्या आश्रमास चालते झाले. असें करण्यांत त्यांचा काय हेतु असेल तो असो! अथवा दुसरा काय हेतु असणार! या कलियुगांत

जीवनकलहाच्या तडाक्यांत गुरफटून अहर्निश पाप कर्मे करणाऱ्या जनांच्या नजरेस पडून उगीच बसतां उपाधि कुणीं मागें लावून घ्यावा ? असाच विचार हे असले महात्मे करीत असावेत व त्या मुळच ते सामान्य जनसमूहाच्या नजरे आड राहत असावेत. इकडे तिकडे पाहून कोणीच दिसत नाहीं असें कळतांच बाप्पा विस्मयातिशयानें वेडाच झाला. त्याला स्वप्नांतील मुनींची भव्य पुण्यशील आणि तेजस्वी मूर्ति अजून ही त्याच्या मनोमय दृष्टी समोर दिसत होती. त्या प्रसन्नवदन, शान्त, गंभीर ऋषीच्या दर्शनानें झालेला आनंद त्याच्या मनाला चांगलाच भासत होता. त्याच प्रमाणें 'चक्रवर्ती भव' असा त्या "कर्तुमकर्तु" समर्थ मुनिवर्याच्या तोंडांतून आपणास उद्देशून निघालेला आशीर्वाद त्याला अजून आपल्या कानांत गुणगुणतो आहे असेंच वाटत होतें. शिवाय आपल्या अंगास असलेल्या भस्माकडे पाहून तर त्याची अशीच खात्री पटे कीं मी पाहिलें तें स्वप्न नसून खरी खरीच गोष्ट होय. परंतु फिरून तीच मूर्ति प्रत्यक्ष पाहावयास पाहिजे असें जें बाप्पाला वाटत होतें तेवढें मात्र कठीण होतें. कारण मुनिवर्य आपल्या आश्रमास निघून गेले होते हें सांगितलेंच आहे. आणि तो आश्रमही भूम्यन्तर्गत असल्यानें सहजी एखाद्यास सांपडण्या सारखा नव्हता. शिवाय बाप्पाला प्रत्यक्ष एव्हाशींच दर्शन द्यावयाचें त्या ब्राम्हणश्रेष्ठाच्या मनांतच नव्हतें मग तें कसें

घडणार? बाकी असल्या महात्म्यांच्या सर्व कृति जगाच्या कल्याणाकरितांच असावयाच्या. त्यांना स्वता करितां कांहीं एक कर्तव्यच उरलेलें नसतें. ते निस्पृह व निरिच्छ असल्यानें वाटेल तसें वागण्यास स्वतंत्र असतात. म्हणच आहे कीं 'निस्पृहस्य तृणं जगत्'. कसें ही असो ! बाप्पाच्याही मनानें, आपणास स्वप्नांत पाहावयास सांपडलेली मूर्ति फिरून दिसलीच पाहिजे, तरच सार्थक, नाहीं तर सर्व व्यवहार व्यर्थ होत, आणि ते करावयाचेंहीं नाहींत, असा हट्ट घेतला.

असो ! आतां उजाडावयाचा सुमार झाला होता. कृष्णपक्षांतील १४ चा दिवस असल्यानें नुकतीच उगवलेली चंद्रकोर लवकरच उदयास येण्याऱ्या बालरविच्या तेजापुढें आपलें तेज अगदींच लपून जाईल या भीतीनेंच कीं काय उदयपावल्या बरोबरच अस्ताचा मार्ग धरीत आहे; व त्यामुळें कुमुदिनींस आपल्या नाथाचें निंबलोण करण्यासही पुरता वेळ सांपडत नाहीं असें वाटून त्या जणूं दुःखाश्रूच ढाळीत आहेत असें दिसत होतें. इकडे पद्मिनी आपला नाथ उदयास येणार ह्मणून आळस टाकून मोठ्या आनंदानें माना वर करून व कमलरूपी आपले नेत्र उघडून पतीचे दर्शनाविषयीं उत्सुक झालेल्या अशा दिसत होत्या. चारी बाजूस लहान मोठे डोंगर होते, आणि ते सर्व या दिवसांत हिरवेचार असल्यानें फार मनोहर दिसत त्यांतच चित्रविचित्र रंगांच्या पुष्पवल्ली असल्यानें

जिकडे तिकडे काश्मिरी शाली व गालिचेच पसरले आहेत कीं काय असा भास होई. पक्षी सुस्वर शब्द करीत आपापल्या घरट्यांच्या तोंडाशीं येऊन त्या स्वयंप्रकाश विश्वाधार रवीचें आदरातिथ्य करण्यासाठीं सज्ज होऊन राहिले होते. चंडोलपक्षी तर उदयाचलावर आरोहण करणाऱ्या सूर्याचे भाटच बनले होते. एकंदरींत ही वेळ ह्मणजे प्राणिमात्रांस आनंददायक होती. सृष्टीचें सर्व वैभव यावेळीं सूर्याच्या सोनेरी किरणांनीं खुलून दिसावयाचें, व त्या बरोबरच विश्वाचा उत्पादक चालक व पालक असा जो परमेश्वर त्याचें अगाध चातुर्य जननेत्रांसमोर येऊन त्याजबद्दल पूज्य बुद्धि उत्पन्न होण्याची अमूल्य संधि ह्मणजे असला प्रातःसंध्यासमयच होय. त्या जगन्नियंत्याचें अनन्य भावानें चिंतन करण्यास व त्याचे अनंत गुण आठवून त्याला शरण जाण्यास दुसरी योग्य वेळ ती कोणती असणार ! पक्ष्यादिक निर्बुद्ध प्राणीसुद्धां यावेळेस मूर्तिमंत ईश्वरजो सूर्य त्याच्या द्वारें त्या परमात्म्याचें आदरातिथ्य करण्याकरितां कसे बिनचूक तयार असतात ! परंतु आह्मी प्रबुद्ध मानव यावेळीं काय करीत असतों ? छे तो विचारच नको. फिरून सन्मार्गानें कर्तव्य बजावण्यास नवी हुशारी यावी ह्मणून अवश्य असणाऱ्या सुखनिद्रेचा समय जी शान्त रात्र ती अनन्वित पापाचरणांत घालवून सूर्योदयाच्या वेळीं, आपलीं लज्जेनें काळीं झालेलीं मुखें त्याला दाखविण्यास भिऊनच कीं काय, आह्मी गाढ झोपेंत

निमग्न होतों. आणि हें तरी न कळून किंवा कोणी खरा मार्ग दाखविणारा नसल्यामुळें कीं काय ! छे छे ! तर जाणून बुजून आह्मी असे खाड्यांत पडतों. कारण ऋषींनीं 'बाबारे संध्यासमय ईश्वरचिंतनास अत्यंत योग्य आहे' असें श्रुतिस्मृति पुराणांतून हजारों, लाखों वेळां सांगितलें असूनही आह्मी आपले कोरेच्या कोरेच. असो !

तथापि लोकांस सन्मार्गास लावण्या करितांच ज्यांचा अवतार असले जे हारीत ऋषीसारखे पुरुष ते मात्र यावेळेस परमेश्वराच्या ध्यानावांचून कांहीं एक करणार नाहींत. ध्यान, धारणा, जप, तप, सच्छास्त्राचा अभ्यास, आणि सत्पक्षाचा जय व असत्पक्षाचा नाश, हीं साधण्या-करितां देशकालवर्तमानास अनुसरून उपायचिंतन, ह्या गोष्टी प्रातःकाळींच करावयाच्या असतात. तेव्हां असल्या वेळीं जगत्कल्याण हेंच ज्यांचें ब्रीद असा पुरुष आपला एकांत सोडून भलत्या ठिकाणीं सांपडावयाचाच नाहीं. बाप्पाला अजून गायत्र्युपदेश झाला नसल्यानें त्याला ह्या संध्यासमयाचा योग्य उपयोग चांगलासा कळला नव्हता. तथापि भोंवतालचें सृष्टिसौंदर्य पाहून व आपल्यावर आ-लेलें प्राणघातक संकट ईश्वरकृपेनेंच पार पडलें अशा वि-चारानें त्याच्या मनांत जी ईश्वराच्या अगाधकर्तृत्वाब-द्दल पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती तिचा साहजीकच प-रिणाम असा झाला कीं तोही कांहीं काल ईश्वर चिंतनांत निमग्न झाला. तेव्हां अशा स्थितींत त्याच्या मागें लाग-

ण्यांत आपले श्रम व्यर्थ होणार आहेत. ह्मणून आपणही एखादी सुंदर जलाशययुक्त जागा पाहून तेथें शुचिर्भूत होऊन कांहीं काळ स्नानसंध्यादि नित्य कर्मांत घालवूं.

## प्रकरण ९ वें.

चांगला दहा घटका दिवस आला होता. ऊन बरेंच तापत होतें. प्रवासी लोकांची मुक्काम करण्याची वेळ होत आली होती. पण आमचा बाप्पा थोडाच इतर प्रवाशासारखा होता. त्याचें वय काय? त्याच्यावर प्रसंग काय? पण त्याला त्याची दाद कोठें होती? आपण कोठें आहों, काय करीत आहों, आपल्याला जायचें कोठें, आपल्यास मार्ग कसा सांपडेल, हे या घोरजंगलांत इतस्ततः स्वैर फिरणारे हिंस्र पशू आपणांस कांहीं इजा करितील कीं काय या प्रकारें वास्तवीक हजारों प्रश्न त्याच्या मनाला डवचीत असावयास पाहिजे होते. परंतु त्याचे मनाला 'आपणास त्या सत्पुरुषाचें दर्शन कसें होईल' या एका प्रश्नावांचून दुसरा प्रश्नच शिवत नव्हता. त्याचें मन त्या सत्पुरुषाच्या ध्यानांत मग्न झालें होतें. बाह्यतः तोही कोठें तरी जात होता. पण अमूक एक दिशेनेंच तो मार्ग क्रमीत होता असें नसून केवळ वेड्यासारखा दश दिशांस भ्रमत होता. क्षणैक चार पावलें एका दिशेस तर लगेच शेंपन्नास पावलें दुसऱ्याच दिशेनें आणि फिरून

पांचपंचवीस पावलें मधूनच कुठून तरी, या प्रमाणें त्याच्या त्या भटकण्यास कांहीं धरबंधच नव्हता. चमत्काराची गोष्ट इतकीच कीं त्याला ठेंच लागली नाहीं किंवा त्याचे पायांत कांटाखुंटा मोडला नाहीं. जसजसें ऊन जास्त होत चाललें तसतसें तें भयाण जंगल जास्तच भयंकर दिसूं लागलें. पारध्यांनीं हरिणांकरितां जाळीं पसरलेलीं होतीं. त्यांत क्वचित् एखाददुसरें भक्ष्य सांपडतही होतें. त्यांचीं कुत्रीं भोंकत होतीं. व्याघ्रादिकांची शिकार करणारे त्यांस हुसकावण्याकरितां डोंगराच्या थडींतून मेघगर्जनेप्रमाणें भयंकर आणि कानटाळ्या बसविणाऱ्या अशा आरोळ्या ठोकीत होते. जंगलांतील लांकूडतोड्ये कुऱ्हाडीच्या घायांनीं मोठमोठीं झाडें पाडीत तेव्हां त्यांतून कडाड असा मोठा आवाज होत असे. असे नानाविध गडबडींचे प्रकार निरनिराळ्या ठिकाणीं चालू होते. त्या प्रत्येकासंनिध, धूमकेतूप्रमाणें अत्यंत अनियमित कक्षेत फिरणारा परंतु तेजस्वी असा हा बाष्पारूप तारा एक अथवा अनेक वेळां येत असे. पण त्याच्या त्या भ्रमणांत कांहीं तरी फरक व्हावयाचा होता! तो उगाच केव्हां दचकावयाचा तरी होता! छे! नांव नको. दृढनिश्चयाच्या प्रेरणेनें साधुदर्शनाच्या उत्कट इच्छेशीं तो इतकें तादात्म्य पावला होता कीं त्याला देहव्यापाराची यत्किंचितही स्मृति होती असें दिसत नव्हतें. त्या मुनिवर्यास आपल्या दर्शनार्थ आतुर असलेल्या ह्या मुक्कु-

मार बालवीराची कांहीं आठवण असेल काय ? का तोही आपल्या अत्यंत आवडत्या ब्रह्मविचारांत लीन झाल्यामुळें या जंगम जगाचें त्याला भानही नसेल ? बहुतेक करून हाच अंदाज खरा. असले महात्मे त्रिकालज्ञानी असतात. अंतर्दृष्टीनें त्यांस बसल्या जागीं सर्व विश्वाचे व्यापार जाणण्याची शक्ति असते. पण ते भानावर असून तशी इच्छा करतील तेव्हां? असल्या स्थितींत मग आमच्या या लहानग्या वीराची काय वाट होणार आहे बरें? असाच भ्रमन्ती करीत तो तहान भूक व शीण यांच्या मारानें मातीस मिळणार काय? छे! असली कल्पना करणें म्हणजे अत्यंत वेडगळपणा होय. कारण जो सर्वसाक्षी करुणासागर प्रभु कीडामुंगीचीही उपेक्षा करीत नाहीं तो भूभारहरणार्थच या पृथ्वीवर निमार्ण झालेल्या सूर्यकुलाच्या शुद्ध व सरळ कोंबास या असल्याही संकटरूपी कुऱ्हाडीच्या कचाट्यांतून संभाळून विशेष जोमास लावल्यावांचून सोडणार नाहीं हें खचित. आणि ईश्वराच्या चांगुलपणाबद्दलची दृढ श्रद्धाच मनुष्यास संकट पार करते. तशा प्रकारची ईश्वराच्या ठिकाणीं उत्तम श्रद्धा **बाप्पाच्या** रक्तामांसांतच भिनलेली होती. असो !

**बाप्पा** इकडे या प्रमाणें भटकत असतां तिकडे ठाकुर **वीरसी** व **सामरसी** हे ही रात्रीं ज्या ओढ्यांतून ते वाहवत आले होते त्याच्याच दोहीं तीरांनीं **बाप्पाचा** शोध काढीत उलट वर येत होते. तेथें त्यांस अजून

खुणेचें असें कांहींच न सांपडून त्यांची अगदीं निराशा झाली होती. तरी बाप्पाची काय वाट झाली असावी याबद्दल त्यांचा कांहीं एक तर्क चालत नसल्यानें त्यांस आपला मार्ग सोडतां येईना. त्यांस सुशर्मा गडावर जाऊन बाप्पाची चौकशी करील कीं काय ह्मणून ही फार भीति वाटत होती. बाप्पाला शोधण्याच्या कामीं तहान भूक किंवा शीण यांची त्यांनीं मुळींच पर्वा केली नाहीं. शेवटीं आधींच रात्रींच्या प्राणघातक संकटांशीं झुंजतां झुंजतां हाडें खिळखिळीं झालीं असल्यानें त्यांचे पाय पुढें पडतनासे झाले. उन्हाचा ताप असह्य होऊं लागला. सांवल्या पावलांतल्या पावलांतच घोंटाळूं लागल्या व सूर्य अगदीं डोक्यावर आला तेव्हां दोन प्रहर उलटण्याचा सुमार झाला असें जाणून ते दोघेही बापलेंक पुढें काय करावयाचें ह्मणून विचार करूं लागले. पण अशा स्थितींत विचार तरी काय ठरणार ! शरीरकष्टांनीं आणि उन्हाच्या तापानें त्यांना घेऱ्या येऊं लागल्या, डोळ्यांपुढें दिसेनासें झालें व निरुपाय होऊन ते एका ठिकाणीं थोडीशी सांवली पाहून बसले. भुकेनें व ताहानेनें त्यांचे प्राण व्याकूळ झाले होते. परंतु शरीरांत व मनांत दोहींत ही कांहीं त्राण राहिलें नसल्यानें कांहीं काळ ते दोघेही जागच्याजागीं मूर्च्छिताप्रमाणें पडून राहिले.

इकडे गडाखालच्या क्षत्रिय वतनदारांपैकीं कांहीं लोक व गडावरील ठाकुर वीरसींचे सैनिक हे यावेळीं ठाकुर-

नांचा शोध करीत असतां थकून विश्रांतीकरितां पाणवठ्याकडे चालले होते. त्यांपैकीं कांहीं जण अचानक **वीरसी** व **सामरसी** हे जेथें पडले होते तेथेंच येऊन थडकले. आपल्या धन्यांस त्यांनीं ओळखलें; आणि त्या सर्वांनीं त्या दोघांस हळूच जागें करून त्यांची योग्य ती शुश्रूषा केली; त्यांस खाऊं पिऊं घातलें. एकीकडे त्यांची सर्व हकीकत ही ऐकून घेतली. **बाप्पाबद्दलची** त्यांची काळजी दूरकरणें जरी त्यांच्या स्वाधीन नव्हतें तरी 'आह्मीं त्रिखंड शोधून त्याला हुडकून काढूं. आपण त्याबद्दल यत्किंचित्‌ही चिंता बाळगूं नये. ईश्वरकृपेनें आपणांस जसें बचावलें आहे तसेंच त्याला ही बचावलें असेल' अशा अनेक प्रकारच्या समाधानाच्या गोष्टी सांगून तिसराप्रहर होऊन ऊन कलतांच ती सर्व मंडळी परत भंडेरगडाकडे निघाली.

आतां आपण थोडेसे **सुशर्म्याकडे** वळूं. **सुशर्मा** आपलें माध्यान्हकर्म आटोपून वैश्वदेव करून काकवळी टाकावयास बाहेर आला होता; व कोणी अतिथि असेल तर पहावा ह्मणून वाट पहात उभा होता. तोंच भंडेरगडावरून शोधास निघालेल्या ठाकुरसैनिकांपैकीं **सुशर्म्या**कडे शोध घेण्यास जो पुढें आला होता तो तेथें येऊन थडकला. त्यानें **सुशर्म्यासच** 'येथें **सुशर्मा** या नांवाचे पंडित कुठें राहतात' ह्मणून प्रश्न केला. **सुशर्म्यास** सकाळच्या अनुभवानें याला काय उत्तर द्यावें हें सुचेना.

त्याला एकदम भीति वाटली. परंतु असत्य भाषण करणें ह्मणजे महापातक आहे असें त्याला त्याचें ब्राह्मण्य सांगत असल्यानें सत्य गोष्ट त्या सैनिकास सांगितल्यावांचून त्याच्यानें राहवेना. **सुशर्मा** आपल्या प्रश्नास लवकर उत्तर देत नाहीं असें पाहून त्या सैनिकानेंही 'महाराज मी ठाकुर **वीरसी**चा मनुष्य आहें. माझें **सुशर्मा** पंडिताकडे कांहीं विशेष महत्वाचें काम आहे तेव्हां कृपा-करून आपणांस जर त्यांचें घर माहीत असेल तर सांगा, नसेल तर तसें सांगा, मी आणिक कुणापाशीं चौकशीं करीन' असें त्यास ह्मटलें. ठाकुर **वीरसी**चें नांव ऐकतांच 'भंडेरगडकर काय' ह्मणून **सुशर्म्यानें** मोठ्या उत्सुकतेनें त्याला उलट प्रश्न केला व 'होय महाराज तेच' असें त्याचें प्रत्युतर येतांच 'मीच तो **सुशर्मा**. काय काम आहे तुझें मजकडे? बरें पण मला आधीं असें सांग कीं माझा **सुदेव** कुशल आहेना गडावर? त्याला ठाकुर-जीचे चिरंजीव **सामरसी** हे आठ दिवसांच्या बोलीनें आपल्या येथें पाहुणचारास घेऊन गेल्यास आज नऊ दिवस झाले. त्यांनीं त्यास परत पोंचविलें नाहीं. तेव्हां तूं त्यांनीं त्याला आणखी चार आठ दिवस तेथेंच राहून घे-तलें आहे म्हणून निरोप सांगायाला आला असशील. ये आंत ये असा. दुपारची वेळ आहे. खा, पी, जरा वि-श्रांति घे आणि मग जा बरें परत गडावर. कळवायला आ-लास फार चांगलें केलेंस, नाहीं तर माझा जीव उगाच

टांगणीला लागला असता. माझी कांहीं हरकत नाहीं बरें, त्यांनीं सुदेवाला तेथें ठेऊन घेतला तर. तो अमळ हूड आहे. आवाडाव फार करील म्हणून मी आपला म्हणत होतों त्याला परत इकडे पोंचवा असें. तिथें जर नीट वागत असला आणि त्यांना तो आवडत असला तर चांगलेंच तें.' अशा प्रकारें त्यानें मोठ्या आनंदानें त्याच्या पुढें आपलें गुऱ्हाळ चालू केलें. 'या ब्राम्हणाला काय करावें आतां' असें आपल्याशींच ह्मणत तो सैनिक आंत तर शिरलाच. परंतु 'याला खरी गोष्ट सांगावी का ! छेः ! तो मूर्खपणाच होणार आहे. बरें आतां याला याच्या मनाप्रमाणेंच सर्व आहे असें सांगितलें आणि पुढेंमागें खरोखरच सुदेव जर दुर्दैवानें बळी घेतला असला तर तें किती दिवस छपलें जाईल. ह्याला खरी गोष्ट कळवावीच लागेल. मग ब्राह्मणाच्या क्रोधाग्नीस आहुती कोणी पडावें. ' अशा प्रकारें त्या सैनिकाचें मन द्विधा झालें. शेवटीं त्यानें सध्याच या ब्राह्मणाला कांहीं सुगावा देऊं नये. त्याला त्याचा सुदेव खुशाल आहे व त्याला ठाकुरजींनीं मोठ्या प्रेमानें राहून घेतलें आहे ' असें सांगावें असें ठरवून त्याप्रमाणेंच केलें; व आपण थोडेंसें खाल्लें प्यालेंसें करून फिरून 'लवकर परतलें पाहिजे' ह्मणून तेथून माघारा फिरला. वरील प्रकारचा बहाणा करण्याची जी त्याला बुद्धि झाली ती त्याची स्वताची नसून त्याच्या नाइकानेंच त्याला सांगून ठेवली होती.

आतां फिरून आपणांस आपल्या नायकाची काय स्थिति आहे हें पाहिलें पाहिजे.

इतका वेळ झाला तरी बाप्पाला अजून कोणीही ओळखीचा असा माणूस भेटलाच नाहीं. तो आपला सारखा फिरत होता. मधून मधून केव्हां उन्हांतच तर केव्हां सावलींत असा तो बसतही असे. फिरून उठे चाले, फिरुन बसे. पण हे त्याचे व्यापार बुद्धिपुरस्सर मुळींच नसत. असें करितां करितां अकस्मात् तो एका अशा स्थळीं आला कीं त्याला तेथून हालावेंसेंच वाटेना. ह्या ठिकाणाच्या भोंवतालची जागा चारीबाजूंस दहापांच हात उंच अशी असून मध्येंच हा एक चाळीस पन्नास हात लांब व पंधरा वीस हात रुंद असा खाडा होता. हाही एकदम खोल नसून होत होत खोल झाला होता. मध्यभागची सपाट जमीन साठ पाऊणशें हात चौरस असेल नसेल इतकीच. ह्या खाड्याच्या भोंवतीं व आंतही इतकी दाट झाडी होती व आंतलें गवत व झाडें झुडपेंही अशीं माजलीं होतीं कीं येथें खाडा असेल अशी कल्पनाही होणें कठीण. आंत कांठा कांठानें गुरें चरावयास जात. तथापि ही जागा कोणत्याही पायरस्त्यापासून अगर मोठ्या रहदारीच्या मार्गापासून लांब व भलत्याच दिशेस होती कीं सहसा तेथें माणसाचें पाऊल क्वचित्च लागत असे. गुरें तरी चुकून माकूनच येणारीं असावयाचीं. कधीं कधीं वाघोबांची स्वारी अथवा भुजं-

गाची स्वारी मात्र गारठ्याला येथें येऊन बसण्याचा संभव असे. शिकारी लोक शिकारी मार्गे लागून मार्ग चुकून असे कधीं या बाजूला एकटे दुकटे वळले तर वळावयाचे. अशा निर्जन स्थळीं हें सुकुमार बाळ सरासरी चार सहा घटका दिवस असण्याच्या सुमारास येऊन दाखल झालें. त्याच्या शिणलेल्या शरीरास हें स्थान मानवलें व तें तेथें रेंवलें. मन शरीराला सोडून कधींच गेलें होतें. तें त्या मुनिवर्यांच्या सन्मुख जाऊन उभें होतें. परिसाच्या संगतीनें जसें लोहाचें सोनें बनतें तसें ब्रह्मध्यानैकमग्न अशा त्या ऋषींच्या ध्यानानें बाप्पाचें मन ही आपला नैसर्गिक चंचलपणा सोडून मेरूसारखें अत्यंत स्थिर झालें होतें. सत्संगतीचा प्रभाव कांहीं विलक्षण आहे. या ठिकाणीं येऊन बाप्पा निर्विकल्प समाधींत असणाऱ्या एकाद्या योग्याप्रमाणें अगदीं हाल चाल रहित असा बसला. त्याच्या डोळ्यांस भोंवतालचें अनुपम सृष्टिसौंदर्य पहावें असें वाटे, परंतु काल संध्याकाळपासूनची तारकळ आणि खाण्या पिण्यावांचून जवळ जवळ आठ प्रहर गेल्यामुळें व त्यांतही अतोनात श्रम झाल्यामुळें आलेला थकवा त्यांना तसें करूं देईना. ते पापण्यांच्या आंतच लपून राहिले. कान ऐकेनात. अशी सर्व अवयवांची स्थिति झाली. कारण त्यांच्या कामाचें वेतन त्यांना न मिळाल्यानें तीं सर्व रुसलीं होतीं. बाप्पा ह्या ठिकाणी येऊन अशा योगसमाधींत बसून घटका दीड घटका झाली

नाहीं तोंच एकाएकीं बाप्पाचें ध्यान ढांसळलें व फिरून त्याला अस्वस्थता प्राप्त झाली. त्याला त्या ठिकाणीं काहीं तरी विलक्षण प्रकार असावा असें वाटूं लागलें. तो इकडे तिकडे धडपडत फिरूं लागला. तों त्याला धूपाचा घ्राणें-द्रियास गार करून सोडणारा असा सुगंध आला. व त्या पासून त्याच्या मनाला अपूर्व आनंद झाला व त्याचीं सर्व गात्रें एकदम आराम पावलीं. सकाळीं आपल्या अंगास असलेल्या भस्माच्या वासासारखाही एक प्रकारचा वास त्याला तेथें मधून मधून येऊं लागला. त्याचें हृदय मुग्ध आनंदानें उडूं लागलें. आपण आपल्या इच्छित मनो-रथाच्या अगदीं सिद्धीजवळ आलों असें त्याचें मन त्याला सांगूं लागलें. परंतु मध्येंच त्याला भीतिही वाटे. ही भीति आपणास कां वाटावी हें मात्र त्याला कळेना ; आणि आनंद तरी कां होत आहे हें तरी त्याला कोठें कळत होतें ! अशा स्थितींत तो एक एक पाऊल हळू हळू न्या-हाळून आणि काळजीपूर्वक त्या खाड्याच्या मध्याकडे टाकीत होता.

हारीतऋषीचा भूमिगत आश्रम याच ठिकाणीं होता. ही वेळ समाधि उतरून लहर लागल्यास क्वचित उपहार करण्याची व फिरून सायंस्नानाच्या तयारींत असण्याची असे. धूप वगैरे तेथें नेहमींच जळत असे. क्वचित् त्या सुगंधास मोहित होऊन त्यांच्या आश्रमद्वाराशीं भुजंगही फडा काढून बसलेले असत, आणि यामुळेंच एकादे वेळीं

जर कोणी चुकून त्या खाड्यांत आलाच तर ह्या भुजंगांच्या भीतीनें तो तेथें टिकत नसे. त्या वासाचा माग काढीत काढीत **बाप्पा** अगदीं आश्रमाच्या दाराशीं गेला. त्याच्या सुदैवानें तेथें ते यमस्वरूपी भुजंग त्या दिवशीं मुळींच नव्हते. आश्रमाच्या द्वाराशीं गेल्यावर त्याला फारच भीति वाटूं लागली. त्याचें हृदय धम् धम् उडूं लागलें. अंगास थरकांप सुटला. आश्रमाचें द्वार ह्मणजे एक दोन हात रुंदीचें व चार हात उंचीचें असें भोंक होतें. त्यांतून **बाप्पा** आंत डोकाऊं लागला तों काळाकुट्ट अंधार. एकदां आंत डोकवावें फिरून बाहेर डोकें काढावें. एक पाऊल आंत सोडावें फिरून चटकन् तें काढून घ्यावें. पुढें सरावें, मागें सरावें असा क्रम **बाप्पानें** चालविला होता. आंत उतरण्याचाही धीर होईना; तेथून परत फिरण्याचा ही निश्चय ठरेना; असें होतां होतां सूर्यास्ताचा सुमार आला. तो खाडा जास्तच भयंकर दिसूं लागला. कारण त्यांत तर केव्हांच रात्र झाली होती. शेवटीं त्या दाराशींच मुकाट्यानें बसून राहावयाचें असें **बाप्पानें** आपल्याशींच ठरविलें व तो तेथेंच बसला. ईश्वरानें या लहान मुलाची मोठी खडतर परीक्षा चालविली होती ह्मणावयाची. तथापि ‘ भावेन देवः ’ हें वचन कांहीं खोटें व्हावयाचें नाहीं. तो भाव मात्र पुऱ्या कसोटीला लागल्यावांचून देव कधीं भक्ताधीन होत नसतो. **बाप्पाची** ही दृढभक्ति लक्षांत आणून ईश्वरानें त्या ऋषिवर्याच्या मनांत प्रेरणा कां

बरें केली नाहीं ? नाहीं कशावरून. ते ऋषि स्वतां काय कमी आहेत काय. अंतर्दृष्टीनें ते तेव्हांच जाणतील कीं आपणाकरितां एक सुकुमार बालक इतकें कष्टत आहे. आणि असेंच झालें. त्यांनीं सहज आपणांस आतां स्नानास जावयाचें ह्मणून जातांना वाटेंत काय काय असेल, कांहीं आपल्याला प्रतिकूळ तर नसेल, ह्मणून ते विचार करितात तों त्यांस सकाळच्या बालकाची स्मृति होऊन आपल्या शोधांत तें कदाचित् अजूनही येथेंच कुठें तरी फिरत असेल असें वाटलें. ह्मणून त्यांनीं प्रयत्नपूर्वक फिरून अंतर्दृष्टीनें खरा प्रकार जाणण्याकरितां तात्कालिक समाधि लावली व पाहिलें तों बालक आपल्या द्वाराशीं येऊन पोंचल्याचें त्यांस कळलें व त्यांचें हृदयही वत्सलभावानें ओतप्रोत भरून आलें. ते लगेच गुहेच्या बाहेर येण्याच्या तयारीस लागले व आपलें स्नानाचें सामान घेऊन बाहेर येण्याचा जिना चढूं लागले. त्यांच्या पायांत खडावा होत्या. त्यांचा आवाज **बाप्पास** ऐकूं येऊं लागला. तों तों त्याच्या मनांत भीति, उत्सुकता, आनंद वगैरे अनेक परस्पर विरुद्ध विकारांची जंगी लढाई सुरू झाली. शेवटीं गुहेच्या द्वाराबाहेर जों **हारीत** मुनींची स्वारी पडते आहे तों मोठ्या धैर्यानें **बाप्पानें** त्यांच्याकडे एकदां आपल्या नेत्रांनीं पाहून आपल्या मनोमय मूर्तीचेंच हें खरें स्वरूप अशी त्याची खात्री पटतांच त्यानें त्यांचे पाय घट्ट धरिले व आपल्या अश्रूंनीं त्या पादुकांस स्नान घातलें. साधू ह्मणजे

दयेचे केवळ समुद्र, अत्यंत कोमळ हृदयाचे, लोण्यापेक्षांही मृदु, तेव्हां त्यांसही या एवढ्याशा मुलाची ही दृढभक्ति आणि दृढतर विश्वास पाहून अगदीं भडभडून आलें. सकाळीं ज्यास आपण भस्मलेपनानें मृत्युच्या दाढेंतून काढलें तोच हा क्षत्रिय बालक हें त्यांनीं जाणलेंच. त्यामुळें ' ऊठ ! वत्सा ऊठ ! फार श्रमलास ' असें ह्मणत त्यांनीं त्याला उचलूनच घेतलें व त्याच्या तोंडावरून व सर्वांगावरून हात फिरवून त्यांनीं त्याचे फार धन्यवाद केले. " महाराज आज सकाळीं प्राणदान करून ' चक्रवर्ती भव ' ह्मणून आपण जो मला मी अर्धवट जागा अर्धवट झोपेंत असतांना आशीर्वाद दिलात तो माझ्या कानांत आपला अमृताहूनही गोड असा आवाज अजून दुमदुमतो आहे. आणि आपली जी पूज्य मूर्ति मला त्यावेळीं दिसली ती ही त्यावेळेपासून एक क्षणभरही मजपुढून नाहींशी झाली नाहीं. आपण केवळ ईश्वरच मला भेटलांत, परंतु वेळेवर आपले पाय धरण्याचें मज निर्बुद्धास सुचलें नाहीं, अथवा मला त्यावेळीं शक्तिही नव्हती, याचा फार खेद वाटून आपलें प्रत्यक्ष दर्शन व अनुग्रह झाल्यावांचून अन्न ही घ्यावयाचें नाहीं असा माझा निश्चय झाला. मला माझ्या श्रमाचें व दृढनिश्चयाचें फळ फार लवकर मिळालें. आपण अत्यंत दयाळू ह्मणूनच हें असें झालें. आतां मला कृतार्थ करा; आणि पुढचा मार्ग दाखवा " अशी बाप्पानें त्यांची फिरून विनवणी केल्यावर " ठीक आहे. बाळा

आजपासून तुझीं सर्व दुःखें संपलीं समज. चल आतां मजबरोबर. आपण दोघेही स्नान करूं व नंतर परत आश्रमास आल्यावर मी तुला सर्व काय तें सांगेन. तुला मी जो आज सकाळीं ' चक्रवर्ती भव ' ह्मणून आशीर्वाद दिला आहे असें तूं ह्मणतोस तो खरोखरच तुझा भास होय. परंतु मी आतां तुला प्रत्यक्ष तसा आशीर्वाद मोठ्या खुशीनें देतों " असें ह्मणून त्यांनीं त्याच्या डोक्यावर हात ठेविला व फिरून त्यास तसा आशीर्वाद दिला; आणि हे सद्गुरु व सच्छिष्य सायंस्नानास चालले.

---

## प्रकरण १० वें.

---

ईश्वराचे त्याचप्रमाणें ईश्वरभक्तांचे हेतू अगम्य असतात. त्यांचा विचार नेहमीं जिकडून अखिल विश्वाचें कल्याण साधेल तिकडून यत्न करण्याचा असतो. तेव्हां ते आपल्या मनाप्रमाणें विश्वाचा व्यापार चालवीत असतात. साधू, योगी वगैरे लोक ईश्वराचे या जगत्कल्याण करण्याच्या बाबतींत हस्तक होत. सामान्य मनुष्यांच्या बुद्धीस विशेष प्रकारचें वळण लावून त्यांचे हातूनच जगांतील व्यापारास इष्ट वळण द्यावयाचें असतें. तें वळण ईश्वराच्या हेतूस अनुसरून असें हे साधू लोक योग्य मनुष्यास देतात. याच नियमास अनुसरून **बाप्पा** हा या वेळीं **हारीतऋषींच्या** कक्षेंत आला होता. या **हारीतऋषींनीं** '**बाप्पा** हा अजून

लहान असल्यामुळें इतक्यांतच त्याजवर विशेष भरंवसा ठेऊन कोणत्याही गूढ मार्गास त्याला आपणास लावतां कामा नये' असा विचार करून या प्रसंगीं त्याला आपल्या बरोबर ते स्नानास घेऊन गेले होते. तेथेंच त्यांनीं त्यास शिवपंचाक्षरी मंत्राचा उपदेश करून व कांहीं प्रसाद भक्षावयास देऊन एका निराळ्याच मार्गानें अरण्या बाहेर लावून दिलें. दोघांची ताटातूट होण्याच्यावेळीं बाप्पास फार गहिंवर आला, आणि 'महाराज मला आपल्या चरणापाशींच रहावेंसें वाटतें' ह्मणून त्यानें त्यांची विनंति केली. परंतु त्यांनीं त्यास 'क्षत्रिय शिशूस हा मार्ग कामाचा नाहीं. त्यानें जगांत आपल्या बाहुबळानें कीर्ति संपादन करणेंच श्रेयस्कर. त्याअर्थीं मी जें तुला सांगतों इकडे लक्ष देऊन तूं निमूटपणें जा' असें सांगितलें. तेव्हां **बाप्पा** फिरून त्यांच्या पांयांवर डोकें ठेऊन ह्मणाला "महाराज आपली आज्ञा मला शिरसा वंद्य आहे. परंतु मला या जगांत कांहींच आधार नाहीं हें आपण जाणतांच. शिवाय या अंधेऱ्या रात्रीं मी एकटा कोणीकडे जाऊं! मला रस्ता कसा सांपडेल? ठाकुर **वीरसी** व प्रिय मित्र **सामरसी** त्याचप्रमाणें माझे धर्म पिते व गुरुजी **सुशर्मा** पंडित यांची माझी गांठ कशी पडेल? ते माझ्या करितां त्रिखंड शोधीत असतील." त्यावर त्या ऋषीवर्यांनीं त्याचें सांत्वन केलें. व 'सर्व कांहीं ठीक होईल हा माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे. हें बघ उत्तरेच्या बाजूस कोश अर्ध

कोशावर तुला एक जीर्ण देवालय लागेल. त्यांत रात्र काढून सकाळीं सुप्रभात उठून पूर्वाभिमुख तूं आपल्या मार्गास लाग. कांहीं पुढें गेला नाहींस तों तुला दोन तरुण क्षत्रिय भिल्ल भेटतील. त्यांस तूं पुढचा मार्ग विचार. ते तुला तुझ्या इच्छित स्थळीं नेऊन पोंचवतील. जा, कांहीं अवघड वाटूं देऊं नको बरें ? " असें ह्मणून त्याच्या पाठीवरून हात फिरवून त्याला त्यांनीं वाटेस लाविलें; व आपण तेथल्या तेथेंच दोन चार पावलें मागें हटल्या सारखें करून अदृश्य झाले. बाप्पाला तें पाहून अत्यंत आश्चर्य वाटलें व अभागीच आपण ह्मणून आपणास या योगिश्रेष्ठानें थारा दिला नाहीं असें वाटून त्याला फार खेद झाला. तथापि त्याची श्रद्धा त्यायोगानें जास्तच दृढ झाली. शेवटीं एक मोठा सुस्कारा टाकून तो आपल्या मार्गास लागला.

इकडे ठाकुर **वीरसी** व **सामरसी** गडावर जाऊन पोंहोंचले होते त्यांनीं लगेच वीस पंचवीस लोकांच्या अशा सात आठ टोळ्या **बाप्पाचा** शोध करण्या करितां ह्मणून अष्ट दिशांस पाठविल्या. त्यांना **सुशर्म्याच्या** घरीं **बाप्पास** शोधण्याकरितां भिल्लांची टोळी आली असल्याची बातमी लागली होती. त्यावरून प्रसंगीं **बाप्पा** जर त्या भिल्लांच्या हातीं लागला असला तर काय करावें असा विचार करून त्याचा पुरता शोध आणण्याकरितां एक दोन चतुर हेर ही ईडरकडे पाठविले; आणि तसाच जर कांहीं प्रकार असेल

अथवा मध्यंतरीच तो एखाद्या भिल्लांच्या टोळीच्या हातांत असेल तर त्यांशीं लढाई देऊनही सोडवितां यावें ह्मणून सर्व तऱ्हेची कडेकोट तयारी केली. त्याप्रमाणें सर्व गोष्टी लगेच एक एक घडावयासही लागल्या. परंतु **बाप्पाचा** कांहीं ठिकाण लागेना. शेवटीं आश्विन शुक्ल पंचमीच्या दिवशीं स्वतः खासा स्वारी दोन तीनशें लोक घेऊन **बाप्पाच्या** शोधार्थ गडाखालीं उतरली; आणि ईडरपासून गडापर्यंतच्या **पाराशर** अरण्यासुद्धां सर्व प्रांतांत त्रिकुट, व्याघ्रशृंग या डोंगरांत व दऱ्यांतही त्याचा शोध करावयाचा त्यांनीं सपाटा चालविला. इतकी चहूंकडून उचल झाली तरी दैवाची वक्रगति कोणाचेंच कांहीं चालूं देईना.

**सुशर्म्याच्या** घरचा पाहुणाही चार पांच दिवस राहून आपल्या मार्गास लागला. तेव्हां **सुशर्म्यास** करमेनासें होऊन तो त्रिकूट पर्वतावरील देवीच्या दर्शनार्थ आपल्या बायकोसह गेला. दिवस नवरात्राचे होते. अष्टमीचा होम झाल्यावर तेथून परतावयाचें असा विचार करून **सुशर्मा** तेथें गेला होता.

इकडे ऋषींनीं सांगितल्याप्रमाणें **बाप्पाला** सर्व अनुभव आला त्याला त्या **देव** आणि **बाळो** या दोन क्षात्र भिल्ल तरुणांनीं फारच ममतेनें वागविलें, व त्याच्या बरोबर ते **सुशर्म्याच्या** घरींही आले. तों **सुशर्म्याचा** तेथें कांहींच शोध लागेना. शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं तो अमुक अमुक दिवसपर्यंत आह्मी पाहिला होता इतकेंच सांगितलें; व

त्यांतील कांहींनीं त्याच्या घरावर आलेल्या भिल्लांच्या हल्ल्या-ची वार्ता सांगितली, आणि बाप्पाला त्या गावांत एक दिवस ही न राहण्याबद्दल शेजारच्या एक दोन वृद्ध ब्राह्मणांनीं उपदेश केला. बाप्पाला हें सर्व ऐकून फार वाईट वाटलें. त्याला सुशर्म्याबद्दल व त्याच्या त्या प्रेमळ पत्नीबद्दल अत्यंत गहिंवर आला. त्याच्या डोळ्यांतून पाण्याच्या धारा लागल्या. आजपर्यंत त्याला आपण या जगावर निराधार आहें असें कधींही वाटलें नव्हतें. आज मात्र मातृपितृवियोगाचें खरें दुःख त्याच्या वांट्यास आलें. कारण त्याला हींच दोन माणसें काय तीं प्रत्यक्ष पितृप्रे-माची आठवण देणारीं होतीं. बाप व आई दोघेंही तो फार लहान असतांच त्याला सोडून गेलीं. शेवटीं फिरून फिरून त्या आपल्या अत्यंत सुखप्रद अशा घराकडे पहात तो तेथून परतला. त्याच्या सोबत्यांपैकींही पुष्कळ इसम त्याला भेटले. प्रत्येकाला तो सुशर्मा गुरुजी कोठें गेले ह्मणून विचारी. ते तरी त्याला काय सांगतात ! कारण हा गडावर गेल्यावर त्यांचा सुशर्म्याच्या घराकडे येण्याचा रापताच मोडला होता. शिवाय त्या मुलांच्या आईबापां-नींही धरण्याच्या भीतीनें बाप्पाशीं विशेष लगट न करण्याबद्दल त्यांस ताकीद दिली असल्यानें तीं याच्याशीं विशेष प्रेमानें बोलेनात. तेव्हां निराश होऊन तो आपल्या या नवीन सोबत्यांबरोबर परत त्यांच्या रानांत आला.

इकडे गडावरच्या लोकांच्या आपसांतील गोष्टी ऐकून

ईडरच्या हेरांनीं या लोकांचा व आपल्या राजास. हवा असलेल्या राजपुत्राचा कांहीं संबंध आहे असें. जाणून त्यांनीं ती बातमी आपल्या धन्यास दिली. त्यांत पदरचें ही कांहीं तिखट मीठ लावून त्यांनीं त्यास असें भासविलें कीं ईडरवर त्या राजपुत्राच्या वतीनें जंगी स्वारी होणार आहे. त्यावरून अधिकारमदांध अशा त्या भिल्लराजानेंही युद्धाची तयारी केली. आणि निवडक शंभर शंभर दीड दीडशें भिल्लांच्या अशा अनेक टोळ्या करून भंडेरगडक-रांस सांपडतील तेथें जेर करण्याचा त्यानें निश्चय केला. खासा ठाकूर स्वारीबरोबर आपण स्वतः दोन तीन हजार भिल्लांनिशीं लढाई देण्याकरितां सिद्धता करून तो ईडरच्या बाहेर पडला. अष्टमीच्या दिवशीं देवीस उत्तम पुरुषाचा बळी द्यावयाचा असा संकल्प करून त्याच दिवशीं खाशांशीं लढाईचा घाट आणावयाचा असा ईडरपतीचा विचार होता.

ठाकूरजीच्या हेरांनींही ही सर्व इकडची हकीकत आपल्या धन्यास कळविली. त्यांत त्यांचेंही कांहीं बुद्धिपु-रस्सर तिखट मीठ होतेंच. शिवाय अवश्य गोष्टींची नेहमीं च असणारी उणीव हीही त्यांत होतीच. परिणाम काय कीं खरा प्रकार जशाचा तसा यांचा त्यांना अथवा त्यांचा यांना न कळतां निष्कारण दोघेही युद्धार्थ धडपडूं लागले. हेरांच्या व कंड्या पिकविणारांच्या अर्धवटपणानें अशा कितीएक लढाया आजपर्यंत झाल्या आहेत व होतही आहेत

याचें कांहीं गणित तरी! खोटा समज, अविश्वास, फुकटची चुरस, यांनीं केलेल्या रक्तपातानें कित्येक देशचे देश व खंडेंच्या खंडें उध्वस्त झालीं आहेत. त्यांतलाच प्रकार हा आतांही व्हावयाचा असेल.

एक दिवस सकाळच्याच प्रहरीं एक भिल्लांची टोळी व एक भंडेरकरांची टोळी अशा अकस्मात् एकमेकांसमोर आल्या. प्रथम नुसते डोळे वटारून एकमेकांकडे पाहणें, नंतर कांहीं जणांनीं जास्त जवळ जाऊन एकमेकांच्या धन्यांचीं उणीं काढणें, असें होतां होतां काम हिरडीवर जाऊन चकाचकीचा प्रसंग आला. गडकऱ्यांनीं हे चोर दरवडेखोर भिल्ल आपली ईडरची हद्द सोडून इकडे कां आले ह्मणून त्यांच्याशीं धक्का बुक्की सुरू केली. त्यांनीं ही लगेच उलट दरडावण्या दाखविण्यास व दंडेली करण्यास प्रारंभ केला. पुढचीं चार दोन माणसें याप्रमाणें भांडूं लागतांच मागच्यांनीं आपल्या धनुष्यांच्या दोऱ्या ओढल्या आणि एकमेकांचे बाण एकमेकांस भेट देऊं लागले. धक्का बुक्की करणारे कुरापतपटाइत इसम आपापल्या लोकांत येऊन मिसळले व फिरून लढाई सुरू झाली. भंडेरगडवाल्यांना भिल्लांचा मारा सहन होईना. भिल्ल जास्त होते. हे लोक कमी होते. एक एक पाऊल मागें हटतें घेण्याची भंडेरगडकऱ्यांस पाळी आली. ते लोक दुप्पट जोरानें पुढें येऊं लागले. परंतु एकानेंही पाठ न फिरवितां भंडेरगडकर अगदीं निकरानें लढत होते. शेवटीं त्यांच्या सुदैवानें

अशी एक गोष्ट घडून आली कीं तिच्या योगानें हें सर्व गाडें एका क्षणांत अगदीं उलटें झालें.

**सुशर्म्याच्या** घरचा पाहुणा याच सुमारास अचानक ह्या स्थळीं येऊन पोंचला. त्यानें दुरूनच हा सर्व प्रकार पाहिला. तेव्हां प्रथम त्याला असें वाटलें कीं आपण आल्या मार्गानें चालतें व्हावें. परंतु फिरून त्याचा क्षात्रधर्म त्याला सांगूं लागला कीं या वेळेस अशक्तांचें सहाय्य करावें. ह्मणून त्यानें नीट न्याहाळून पाहिलें तों त्याची अशी खात्री झाली कीं आपणांस **सुशर्म्याच्या** घरीं जे कांहीं भिल्ललोक पहावयास सांपडले होते तेच हे असून त्यांचा पुढारी ही त्यावेळचाच तो उमट भिल्ल होता. असें त्यांच्या लक्षांत येतांच त्याला ही मोठा त्वेष चढला आणि तो एकदम ओरडून ह्मणाला ‘ क्षत्रिय सैनिक हो ! पाहतां काय ? ह्या चोरट्या भिल्लांनीं तुह्मांस मागें सारावें ? छेः ! हें कांहीं चांगलें नाहीं. सरका पुढें, ध्या जगदंबेचें नांव आणि शत्रूचे छातीवर पाय देऊन त्यांनीं केलेल्या आगळिकीचें उसनें फेडा. हा पहा मी आहें येथें तुमचा कैवार घेऊन आपले प्राण ही ह्या समरभूमीस अर्पण करण्यास तयार ” असें ह्मणून तो जो बाणावर बाण सोडूं लागला व त्याच्या त्या आवेशयुक्त भाषणानें उत्तेजन मिळालेले ते गडकरीही अशा नेटानें पुढें सरकले कीं त्या भिल्लांची पण तेव्हांच खात्री झाली कीं आपणांस हे गडकरी आतां आटपत नाहींत. त्यांचें धैर्य खचलें व ते पुढें पाऊल टाकण्यास

धजेनात. उलट, पाऊल अर्ध पाऊल मागें मागेंच सरण्याचा त्यांच्यापैकीं कांहींनीं क्रम ठेविला. आपल्या हुलीचा असा उत्तम परिणाम झालेला पाहतांच विशेष स्फुरण चढून हा नवीन गृहस्थ शत्रूच्या अगदीं अंगाशीं जाऊन भिडला. त्याच्या उदाहरणानें गडकरीही सर्व एकदम त्याच्या मागोमाग शत्रूला येऊन भिडले व ह्या क्षात्रवीरानें आपलें धनुष्य खांद्यावर ठेऊन आपल्या कराल करवालेचा प्रयोग सुरू केला. सळासळ इतरांनीं ही आपआपलीं खड्गें काढिलीं आणि समरदेवीस नररुंडांनीं तर्पिण्याचा सपाटा चालविला. मोठ्या कुशलतेनें या नवीन आलेल्या वीरानें भिल्लांच्या पुढाऱ्याशींच गांठ घातली आणि भीमानें दुःशासनाची तीच वाट त्यानें त्याची लावली. पुढारी पडतांच इतर सर्व भिल्ल दशादिशांस उधळले. क्षत्रिय गडकऱ्यांचा जय झाला. 'प्रथमग्रासे मक्षिकापातः' या न्यायानें अत्यंत उत्साहभंजक असा हा कडू अनुभव मिळतांच भिल्लांची पुढची सर्व आशा जागच्या जागीं जिरली.

या नवख्या क्षत्रियवीराचे गडकऱ्यांनीं किती तरी आभार मानले आणि त्याला त्यांनीं आपल्या धन्यास भेटण्याविषयीं अत्याग्रह केला हें सांगण्याची जरूरच नाहीं. परंतु तो गृहस्थ त्यांच्या धन्याकडे जाऊं इच्छित नव्हता. आपण केलेल्या सहाय्याबद्दल त्यास कांहीं एक पारितोषिकाची इच्छा नव्हती. त्यानें आपणास अत्यंत जरूरीच्या कामासाठीं एका ठिकाणीं जावयाचें असल्याचा बहाणा

केला. परंतु सहज त्यानें ह्या छोट्या लढाईचें मूळ कारण काय व आपण ज्या पक्षाकडून लढलों ते कोणत्या क्षत्रिय राजाचे सैनिक याची चौकशी केल्यावरून त्यास जेव्हां त्या लोकांनीं इत्थंभूत हकीगत सांगितली तेव्हां त्याच्या मनांत नाना तरंग येऊं लागले. त्यानें आपले सर्व मनोविकार आंतल्याआंत दाबले. तथापि त्या लोकांपैकीं काहींना ही त्याची चलबिचल थोडीशी ओळखली. परंतु त्यांच्यानें त्यास विशेष खोल प्रश्न करवेनात. शेवटीं 'आतां आपले महाराज कोठें आहेत ? जवळच असतील तर तुमचा आग्रह मी मोडीत नाहीं. त्यांना भेटून जाईन' असें ह्मणतांच त्या सर्व लोकांचा आनंद गगनांत मावेना. त्यांनीं सर्वांनीं मोठा जयजयकार केला व या आपल्या अनोळखी परंतु अत्यंत विश्वासाच्या पुढाऱ्यास घेऊन ते ठाकुर **वीरसी**कडे चालले. परंतु थोडक्याच अवकाशांत त्यांस असें कळलें कीं ठाकुर **वीरसी**ची स्वारी गडावर नसून त्रिकूटपर्वतावर जाण्याकरितां ठरल्या प्रमाणें उत्तरेच्या मार्गानें निघून गेली. तेव्हां त्या सर्वांचा विरस झाला. तथापि तेथपर्यंत ही आपल्या या संकटसमयीं सहाय्य कर्त्यानें यावें अशी गडकऱ्यांची फार इच्छा होती. या नवख्या वीरास ती पुरी करितां येईना. कारण त्याला असें झालें होतें कीं 'मी एकदां **बाप्पा**-वरील संकटाची खरी बातमी **सुशर्म्या**स केव्हां देईन.' आणि आपली ही आतुरता त्या लोकांस तर कळतांच

कामा नव्हती. शेवटीं दसरा झाल्यावर आपल्या ठाकुरजींस अवश्य भेटेन असें वचन देऊन त्यानें आपली सुटका करून घेतली. त्या लोकांस हें त्याचें करणें फार वाईट वाटलें. परंतु करतात काय ? मोठ्या कष्टानें त्यांनीं त्यास ' खचित खचित याल ना पण ' या हो आल्यावांचून राहूं नका. आमचे प्राण आणि लज्जा हीं आपण आज जशीं रक्षण केलींत तशींच तीं इतउत्तर ही करणें आपल्याच स्वाधीन आहे. कारण आपण जर न याल तर ठाकुरजी आह्मांवर फार रागावतील.' असें वरचेवर ह्मणत व त्याचीं फिरून फिरून " येईन. खचित येईन." अशीं आश्वासनें घेत त्यास निरोप दिला. उपकृत व उपकारकर्ता यांचे मार्ग भिन्न झाले.

---

## प्रकरण ११ वें.

शरदृऋतूंतील नवरात्राचे दिवस. सृष्टिसौंदर्यास पूर्ण भरती आलेली. त्यांतही त्रिकूट पर्वत व त्याचे आसमंताद्भाग यांवर तर तें विशेषच खुलत होतें. कारण येथें पर्वतशिखरें व वृक्ष यांची जणूं आकाशास जाऊन भिडतो कोण अशी सारखी स्पर्धा लागली होती. पावसाळा संपून हिंवाळ्याचा पूर्व हंगाम असल्यानें थंडी ही बेताबाताचीच. दिवस व रात्र साधारण सम असावयाचीं. मनुष्यमात्र पावसाळ्यांतील चिकचिकीला व इतर श्रमाला कंटाळून

आलेल्या हिंवाळ्याचें कौतुक करण्यास अतिशय उत्सुक असलेला. त्यांतून भूमातेनें लता फुलें व फळें यांची अगदीं रेलचेल करून सोडलेली. एखादी नवयौवना जशी तशीच जगूं अत्यंत चित्रविचित्र व नयनमनोहर वस्त्र परिधान करून ही पृथ्वीही या दिवसांत आपल्या रंगीबेरंगी पुष्पफलालंकारांनीं व सतेज कांतीनें स्वर्गस्थांसही मोह उत्पन्न करीत असते. मग मानवांची तर गोष्टच सोडा. या त्रिकूटाचलाचे खोऱ्यांत पर्वतशिखरावरून निघालेले अनेक ओढे घोषें करीत आपलें अमृतासारखें स्वच्छ व मधुर जल सारखें ओतीत असत. त्यामुळें हरएक प्रकारची वनस्पति, धान्य व पुष्पफलें यांची अगदीं रेलचेल असे. मयुरादि पक्षी, हरिण, वानरें वगैरे जनावरें, वनगाई, गवे त्याचप्रमाणें व्याघ्र सिंहादिक हिंस्रपशू या सर्वांची येथें सारखी वस्ती होती. येथें मृगया व वनक्रीडेकरितां भोंवतालच्या क्षत्रिय राजपुत्रांची नेहमीं वर्दळ असावयाचीच. अशाप्रकारचें हें रमणीय स्थान आणि वेळही अशीच शुभ होती. पंचपंच उषःकालचा समय असून रात्रीच्या सुखनिद्रेनें प्राणिमात्रास आपल्या दिवसाच्या नित्यक्रमास लागण्यास अत्यंत उत्साह प्राप्त झालेला होता. आपल्या दिनव्यवहारांत आपला मुख्य मार्गदर्शक जो सूर्य त्याच्या दर्शनाकरितां प्राणिमात्र अत्यंत उत्सुक झालेला होता. आणि आपापल्या घरीं सर्वांनीं या जगन्मित्राच्या स्वागतार्थ आपापल्या

भाषेंत मंजुळध्वनींनीं भूपाळ्या आळविण्यास सुरवात केली होती. आपल्या पृष्ठ भागावरील सर्वजणांस अत्यंत हर्ष झाला आहे असें पाहून पृथ्वीही समाधान पावून उदया-चलावर व वृक्षांच्या अग्रांवर पडलेल्या बालरवीच्या कोमल किरणांच्या मिषानें स्मित हास्यच करीत आहे कीं काय असें वाटत होतें. अशा समयास दोन स्त्रिया ह्या खोऱ्यांतून चालल्या होत्या. त्यांच्या एकंदर चिन्हां-वरून त्या अनाथ असाव्यात आणि या प्रदेशांत अगदीं अनोळखी असाव्यात असें वाटत होतें. त्या दोघींपैकीं एक प्रौढ असून उच्चवर्णांतील नसावी असें दिसे. परंतु दुसरी मात्र अगदीं नवयौवना व उच्चवर्णांतील, उच्चकुळां-तील व गर्भश्रीमंतींत वाढलेली असावी असा तर्क होत असे. वर सांगितल्याप्रमाणें जगांत सगळीकडे आनंदी आनंद झाला होता तरी त्या आनंदाचा वांटा या प्रवाशी स्त्रि-यांच्या चेहेऱ्यावरून त्यांस मुळींच मिळाला नसावा. अगर ' सुरतच तशी ' ह्मणजे रडक्या या वर्गांतील तरी त्या असाव्या; अथवा कित्येक एकापेक्षां एक भयंकर असल्या संकटांनीं त्यांस आज कित्येक दिवस सारखें छळलेलें तरी असावें. हा शेवटचाच तर्क जर खरा असेल तर खरोखर त्यांची कींवच करणें रास्त होय. अशा रीतीनें या दोघी स्त्रिया हळू हळू आपला मार्ग क्रमीत होत्या. आजचा दिवस अष्टमीचा असल्यामुळें त्रिकूटाचळावरील देवीच्या दर्शनार्थ जाणाऱ्या बहुतेक लोकांचा जो रस्ता

त्याच रस्त्यानें याही चालल्या होत्या. परंतु ह्यांना त्रिकूटाचलावरच जावयाचें होतें असें दिसत नव्हतें. कारण यांची दिशा अगदीं तिसरीच होती. निरनिराळ्या भागांतून येणारे अनेक पायरस्ते यांच्या मार्गाला येऊन मिळत होते. आणि अशा प्रत्येक तिवाठ्या चवाठ्याच्या जागीं पुढें आपण कोणत्या रस्त्यानें जावें ह्याबद्दल त्यांना मोठें गूढ पडे; व त्या ईश्वरावर हवाला ठेवून कोणता तरी एक रस्ता पकडीत असत.

असल्या ह्या जंगलांत या दोन स्त्रिया पुरुष माणूस कोणीच बरोबर नसतांना मार्ग क्रमीत होत्या हेंच विशेष हृदयभेदक होय. आतां ह्या कुठल्या कोण हें कसें समजावयाचें ? ह्यांच्या पेहेरावावरून ह्यांना ओळखण्याचें कांहीं साधन दिसत नाहीं. कारण तो राजस्थानांतील स्त्रियांसारखाच आहे. परंतु ह्या राजस्थानांतील खास नव्हेत हें त्यांच्या कावऱ्याबावऱ्या मुद्रेवरून व प्रत्येक ठिकाणच्या देखाव्यास आपण अगदीं अपरिचित आहों असें त्यांच्या नजरेवरून व इतर सर्व चालचलणुकीवरून व्यक्त होत होतें. असो. त्या अशा चालल्या असतांना त्या दोघींच्या संवादावरून जर कांहीं त्यांची माहिती मिळाली तर पाहावी.

"कायगे ! आपणांस आपली नगरी सोडून जवळ जवळ सहा महिने झाले नाहीं गे, हो ! आपण वैशाखांत निघालों नाहींका ?" "होय राजकुवरबाई. सहा महिने झाले खरे

पण अजूनही ईश्वरास आपली करुणा येत नाहीं." "अगे ईश्वराकडे काय बोल आहे त्याचा ? आपलें प्राक्तनच असें. त्याला कोण काय करणार ? पण हें बघ गिरिजे त्या मेल्या दैत्यांनीं, नकोग बाई, त्यांची आठवण सुद्धां माझ्या मनाला भीति देते, आपला किती पाठलाग केला बरें ? परंतु जगदंबेच्या कृपेनें आपण दोघीही त्यांच्या हातून सुटलों. नाहींतर आज ह्या शुद्ध शरीराची काय दुर्दशा झाली असती बरें ? " राजकुवरबाई ह्या असल्या कल्पना उगच पुन्हां पुन्हां कां मनांत येऊं देत्येस ? त्या उगच शीण मात्र करितात. आणि आतां आपल्याला त्या मेल्या दुष्टांची कांडी इतकीही भीति नाहीं. आपण आतां इतक्या लांब आलों आहों कीं त्यांना त्याची कल्पना सुद्धां येणार नाहीं. 'जरा कांहीं आठवण्यासारखें करून' हो खरें पण कुवरबाई आज किनई अष्टमी असेल. मंगळवार मंगळवार आठ, आपल्याला मागच्या मंगळवारींच नाहीं कां घट बसल्याचें कळलें ?"
" खरेंच गडे, पण आपण आज या रानांत कुठें बरें जगदंबेची पूजा करणार ? माझा किनई नवस फेडावयाचा होता. मी त्या दिवशीं बोलल्यें होत्यें कीं जर आईमातेनें आह्माला तिच्या पूजेचा दिवस दाखविला तर मी त्या दिवशीं तिची जिथें असेन तिथें यथासांग पूजा करीन ह्मणून. मग बाई आतां तूंच कांहीं तरी युक्ति सांग मला त्या नवसांतून पार पडण्याची. कारण जगदंबेनें आपलें

गाऱ्हाणें ऐकून आपल्याला येथपर्यंत सुरक्षित आणून सोडलें आहे." अशा प्रकारें बोलत चालत त्या जात असतां एका सरोवराजवळ येऊन ठेपल्या हें सरोवर फार मोठें नव्हतें. तथापि त्यांतील पाणी स्वच्छ असून अत्यंत मधुर होतें. त्याच्या भोंवतीं पुष्कळ पुष्पलता व फळझाडें होतीं. जागा मोठी रमणीय असून शान्त होती. कोणीं महात्म्यानें त्या सरोवरास चांगल्या पायऱ्या बांधल्या होत्या. वरती फारसा रुंद नाहीं परंतु दोन तीन माणसें सुखानें बसूं शकतील असा फरस बांधलेला होता. आणि त्याच्या एका कोपऱ्यांत एक लहानसें पण सुंदर असें कोणा तरी पण देवीचेंच देवालय होतें.

त्या देवालयावर कांहीं कोरींव लेख असून काळानें त्यांतील अक्षरवटिका बरीच अस्पष्ट केली होती. तरी त्यावरील युधिष्ठिर शकाचा आंकडा आणि एक दोन विशेष नांवें अगदीं स्पष्ट दिसत होतीं. त्या लेखाचा जो कांहीं भाग अशा प्रकारें अवशिष्ट होता त्यावरून इतका भावार्थ स्पष्ट दिसत होता कीं सुधर्मापत्नी सुशीला ही तेथें परचक्रांत पराभव पावलेल्या आपल्या पतीच्या शत्रूबरोबर लढून त्या शत्रूचा पुरता पराजय करून आपल्या पतीच्या शवा बरोबर सती गेली होती. तिच्या स्मरणार्थ व तिच्या इच्छे-वरून तिची आराध्य देवता जी श्रीपार्वती तिचें हें देऊळ बांधलें होतें; व भोंवतालचा घाट वगैरे हीं सर्व त्याच वेळेस बांधलेलीं होतीं या गोष्टीस आमच्या ह्या दोन

प्रवाशी स्त्रिया तेथें येऊन पोंचल्या त्या वेळेस सुमारें हजार वर्षे तरी झालेलीं असावीं असा त्या शिलालेखांतील युधिष्ठिर शकाच्या आंकड्यावरून अंदाज निघत होता. वरील सर्व प्रकार जेव्हां आमच्या राजकुंवरबाईच्या नजरेस आला तेव्हां तिला किती आनंद झाला ह्मणून सांगावें? आजपर्यंत देवा अमुक व्हावें ह्मणून तिनें मनांत आणावें पण लगेच अगदींच भलता प्रकार पुढें दत्त ह्मणून उभा असे जें चाललें होतें त्यांत हा आजचा पहिलाच पालट होता. त्यामुळें तिच्या मनाला खरें खुरें असें समाधान कांहीं होईना. तिला वाटे कीं, आपल्यावर ह्या ठिकाणीं पूर्वीपेक्षांही एखादें भयंकर संकट तर येणार नाहींना? दुर्दैवानें हें एक केवळ अमिष तर आपल्यापुढें ठेवलें नसेल ना, ह्मणच आहे कीं 'एकदां तोंड पोळलेला माणूस ताकही फुंकून खातो' मग आमच्या या बालिकेची तर आज सहा महिनें सारखी पोळणीच चालली होती. असो! या ठिकाणीं आपला नवस पुरा करावयाचा व नंतर सावकाश दुसरीकडे जावयाचें असें ठरवून त्या दोघीही सरोवराच्या तीरावर जरा विश्रांति घेत बसल्या. कारण आतां जवळ जवळ दहा घटका दिवस आला होता. त्यांना चांगली ४—५ कोसांची मजल झालेली होती. तेव्हां थोडी विश्रांति घेऊन त्यांची पूजेची तयारी होई तोंपर्यंत आपण मध्यंतरीं जरा दुसरीकडे फेरफटका करूं.

बाप्पाची खरी स्थिति ह्मणजे त्याचें अस्तित्वच संश-यांत असल्याबद्दलचा आपला तर्क सुशर्म्यास कळविण्या-करितां ह्मणून शिष्टाचारास झुगारून देऊनही आपला साहसी प्रवासी जो गडकऱ्यांची विनंति अमान्य करून फिरून माघारा वळला तो सुशर्म्याची भेट न होतां व अमक्याच ठिकाणीं तो गेला आहे अशा बद्दलही कांहीं माहिती न लागतांच तेथून फिरून मनःपूत भ्रमंती करीत राहिला. बाप्पाही आपले नवीन झालेले गवळी मित्र सांगत त्याप्रमाणें त्यांच्या बराबर त्यांच्या लहान मोठ्या साहसांचा वांटेकरी बनून फिरत असे. तरी त्यास सुशर्मा व ठाकुरजी यांची वरचेवर आठवण होऊन तो अत्यंत दुःखी होत असे. आपल्या साहसी प्रवाशाच्या चौकशींत त्याला असें कळलें होतें कीं जवळच असणाऱ्या त्रिकूट पर्वताच्या शिखरावर देवीचा मोठा उत्सव या नवरात्रांत नऊ दिवस असून तेथील अष्टमीच्या होमास व दशमीच्या सीमोल्लंघन समारंभास भोंवतालच्या सर्व प्रांतांतील व लांब लांबचेही हजारों गरीब श्रीमंत, विद्वान्, अविद्वान्, बायका, पुरूष, पोरें थोरें अशीं जमत असतात. तेथें मोठी पेठ भरते आणि लाखों रुपयांचा व्यापार चालतो. हिरे, माणकें, हत्यारेंपात्यारें, घोडे, बैल, शेले दुपेटे, फळफळावळ, मेवामिठाई वगैरे जिन्नस हवे तसे स्वस्ते महाग तेथें वि-कत मिळतात. त्याच प्रमाणें भक्तांचे नवस तेथें रोजचे हजारांवर फिटत असतात. हा सर्व देखावा, देवीच्या

महापुजेचा थाट, रथाची मिरवणूक व बळीचा थाट वगैरे गोष्टी पाहाण्यासारख्या असतात. ही सर्व माहिती लागतांच आपणही होमाच्या दिवशीं पूर्णाहुतीच्या वेळेपर्यंत तरी तेथें जाऊन पोंचावें असा संकल्प करून आपला साहसी प्रवाशी निघाला होता. बाप्पा, बाळो आणि देव यांच्याही मनांत ह्या अष्टमीच्या दिवशीं त्रिकूट पर्वतावर जगन्मातेच्या दर्शनास जावें असें आलें आणि तें त्रिकूट रमतेराम निघालेंही. त्याचा व आपल्या साहश्यांचा मार्ग प्रथम अगदीं विरुद्ध दिशेनें असून आपल्या प्रवाशी स्त्रिया जेथें उतरल्या होत्या तेथें जवळच एका ठिकाणीं मिळत होता व तेथून तो मग सरळ एकाच दिशेनें पर्वतशिखराकडे जात होता.

आपल्याला ठाऊकच आहे कीं बाप्पा हा स्वभावतः अत्यंत दृढ आणि छांदिष्ट होता. त्यानें हे नवे मित्र त्याच्यापेक्षां सवाई तसे. ह्मणच आहे ‘ समानशीलव्यसनेषु सख्यं ’ त्याच न्यायानें बाळो आणि देव व त्यांचे अनुयायी तेही यांच्याच सारखे. हा एकंदर मेळा चांगला वीस पंचवीस असामींचा होता. सगळे तरुण बांड. पाठीवर भाता, खांद्यावर धनुष्य, कमरेला तरवार, एखाद्याजवळ ढालही, केस ठेवलेले, पायांत सांबराच्या किंवा काळविटाच्या कातड्याचे चढाऊ जोडे. डोक्यास फेटे अथवा मंदीळ. अंगांत त्या वेळच्या पद्धतीचे छातीशीं अगदीं घट्ट व खालीं घोळदार असे अंगरखे, कमरेस शेला कसलेला आणि खालीं मांडचोळणा,

कित्येकांचा किनखापी, कित्येकांचा साधा अशा थाटांत सण ह्मणून अगदीं सजून ही सर्व मंडळी छात्या वर काढून हत्तीच्या छाव्यांप्रमाणें डुलत डुलत चालली होती. बाप्पा हा त्या सर्वांत वयानें लहान परंतु त्याच्या तोंडावरील विलक्षण तेजानें त्या सर्व मंडळींत नक्षत्रांत जसा चंद्र तसा शोभत होता. त्याचीं वस्त्रेंही अत्यंत उंची होतीं. वाचकांस माहीतच आहे हीं त्यास केव्हां आणि कोणीं दिलीं होतीं तीं. असो. या मंडळाच्या मार्गांत एक कोसभर, दाट व हिंस्रपशूंनीं भरलेलें असें जंगल होतें. तें टाळतांही येण्यासारखें होतें. परंतु ह्यांचा वात्रटपणा त्यांस तसें थोडेंच करूं देणार होता ? प्रहर दिवसाच्या सुमारास ही सर्व मंडळी त्या जंगलांत येऊन दाखल झाली. परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं ह्या जंगलांत अजून रात्रच होती. कारण सूर्यकिरणास त्या जंगलांतील दाट झाडीशीं झगडून आंत प्रवेश करण्याच्या त्यांच्या अव्याहत चाललेल्या प्रयत्नांस अजून जय आला नव्हता. क्वचित् एखाद्याचा येवढा तेवढा प्रवेश कोठें कोनाकोपऱ्यांत मात्र झालेला दृष्टीस पडत होता. ह्या जंगलांत फळांमुळांची रेलचेल होती; आणि ह्या मंडळीस त्यांची उत्तम माहितीही होती. माकडेंच तीं रमलीं सर्व तेथें. कोणी ह्या झाडावर चढ तर कोणी त्यावर चढ. कांहीं खालूनच "ए ए मला टाक कांहीं खालीं. हलव हलव जोरानें. हें बघ अं, तूं खालीं नाहीं टाकणार तर मी

तुला घोडे मारीन अं, मग बघ आपला विचार कसा तो." वरला इसम एखादवेळेस ऐके, एखादवेळेस खालच्यांस वेडावणें दाखवी. असा धुमाकूळ त्यांनीं तेथें चालविला होता. "अडुडत, ओरडत, उगच एकमेकांस 'ए तो बघ हरीण. टीप टीप बघतोस काय? हात तुझें, घालविलास. मी टिपतों बघ आतां कसा तो' असें ह्मणून फसवीत, तर कधीं स्वतःच फसत. त्यांत कांहींना तर खरोखरच एखादी हरिणाची वगैरे त्याचप्रमाणें वाघा सिंहाचीही शिकार सांपडावी अशी इच्छा असल्यानें ते त्या मागावर होते. "हं ही कसची घाण बरें? अरे हें वाघाचेंच लेंडूक अं. अगदीं ताजें आहे बघ. हीं पाहिलींस त्याचीं पावलें उमटलीं आहेत इथें. तो असा इकडून गेला असेल. छे रे! असा नाहीं गेला. तसा गेला असला पाहिजे. हें, हें पाहिलेंत का त्या राजश्रींचें कर्म. लेंकानें ह्या पाचोळ्याखालीं बच कसें हें धूडच्या धूड लपवून ठेविलें आहे. स्वारी आतां हें शिळें मांस खायला येईल अं." याप्रमाणें प्रत्येकाचा कांहींना कांहीं अवाडाव, कुणाची नुसतीच चांभार चौकशी चालली होती. बाकी खरोखरच पंचाननाची स्वारी आल्यावर टिकणारा त्या मानानें थोडाच. ह्यांच्या ह्या आरड ओरडीनें आणि धुडधुडीनें तें जंगल ज्या ज्या भागांत हे असत तेवढ्या पुरतें तरी अगदीं दणाणून जाऊं लागलें. ससे, भेकरें वगैरेची शिकार पुष्कळच झाली.

पाव्या, वाळो आणि देव हे तिघे एका गावाच्या मार्गावर होते. त्यांनीं तो गाम शोधीत शोधीत शेवटीं मुळाशीं नेला. तेव्हां एका जाळींत स्वस्थ बसलेली ती स्वारी त्यांच्या दृष्टीस पडली. मग कसेंही त्याला तेथून हुसकून जरा खुल्या जागेंत आणण्याचा त्यांचा संकल्प झाला आणि त्याप्रमाणें बेतानें व मोठ्या सावधगिरीनें त्यांनीं तें काम करण्याचा घाट घातला. सर्व मंडळी गोळा करून त्यांना योग्य ती कामगिरी सांगून हे तिघे व आणखी तीन तीन असामींच्या तीन टोळ्या असे चारी बाजूंनीं त्या वाघाला घेरण्याकरितां चार विभाग झाले. उरलेली मंडळी त्याला हुसकण्याकरितां तयार झाली. हें इतकें होत आहे तों त्या मंचाननानेंही जागे होऊन एक मोठी आरोळी ठोकली व तो तडक जो तेथून निघाला तो डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या अवकाशांत ह्यांच्या सर्वांच्या नजरे आड झाला. तितक्यांतल्या तितक्यांतही तीन चार तीर त्याच्या अंगावर गेले पण ते त्याला लागले किंवा नाहीं कोण जाणें. अशाप्रकारें खेळून खेळून दुपारच्या सुमारास हें सर्व मंडळ जंगलांतून बाहेर पडण्याच्या विचारास लागलें. इतक्यांत एक रान डुकर आणि त्याच्या मागें लागलेला एक घोडेस्वार त्यांच्या नजरेस पडला. मग काय विचारतां. फिरून त्या रान डुकराच्या मागें हा तांडा चालला. व चार दोन हुली खाऊन तें रान डुकर एकाएकीं खालीं पडलें. तों त्याच्या अंगांत

दोन बाजूनें दोन बाण एकदम लागलेले होते. त्यांपैकीं एक बाप्पाचा होता. व दुसरा त्या घोडेस्वाराचा होता. बाप्पाकडची मंडळी शिकार आमची ह्मणून ह्मणावयास लागली व तो दुसरा गृहस्थ ती आपली ह्मणून शेपटी व कान कापून मी घेईन असें ह्मणूं लागला. हा त्यांचा घोंटाळा चालला आहे तोंच त्यांच्यावर एका प्रचंड वाघानें झडप घातली व त्यानें त्यांच्यांतील एक असामी पाठुंगळीस मारला. झालें कोण त्रेधा न तिरपिट मग! परंतु एकंदर आठ दहा इसम त्याचा पाटलाग करण्यास क्षणाचाही विलंब न करितां लागले. त्यांत बाप्पा, बाळो, देव आणि हा नवीन गृहस्थ हे तर सर्वांच्याही पुढें होते. बाणामागें बाण सोडून त्यांनीं वाघास अगदीं जेर केलें व त्याला तो मनुष्य टाकून द्यावा लागला इतकेंच नव्हे तर त्याच्या बरोबर स्वतःचें शरीरही सोडावें लागलें. हें पाहतांच सर्वांस मोठा आनंद झाला. त्या मनुष्यास बरीच दुखापत झाली होती. त्यालाही एक दोन यांचे बाण लागले होते. तेव्हां आतां याच्या जखमा धुवाव्या कोठें बांधाव्या कशा वगैरे विचारास ते लागले. बाप्पानें आपला शेला फाडून तातडतोब त्याच्या जखमा बांधण्याची तजवीज केली. बाळो व देव यांना या प्रदेशांतील खडान् खडा माहीत होता. त्यांनीं दुपारचा मुक्काम जवळच असलेल्या एका सरोवरावर करण्याचा विचार ठरविला. व त्या जखमी मनुष्यास चार पांच असामींनीं उचलून

मोठ्या काळजीनें इच्छित स्थळीं नेण्याची तजवीज केली. देव त्यांच्या बरोबर चालला. इकडे डुकराची शिकार कोणाची याचें भांडण पुन्हां सुरू झालें. त्याचप्रमाणें त्या वाघाचीही वाट लावावयाची होती. कारण वाघ फारच मोठा होता. शेवटीं त्यांनीं त्या डुकराचे दोन्ही बाण काढून ते कोणाचे आहेत हें पाहतां पाहतां एक त्या नव्या गृहस्थानें आपला असा ओळखला व दुसरा बाप्पाचा ठरला. वाघाच्या आंगांत चार सहा बाण शिरलेले सांपडले. त्यांतही बाप्पाचा एक व ह्या नवख्या गृहस्थाचा एक असे बाण ओळखून काढले. बाकीचे दोन बाळा आणि देव यांचे होते. शेवटीं तोड अशी ठरली कीं डुकर सबंध घोडेस्वाराचें व वाघ बाप्पाच्या मंडळीचा.

ह्या सर्व प्रकारांत बाप्पाचें वय, त्याची चलाखी आणि इतर सर्व गोष्टी, शरीराचा बांधा, डोळ्यांचें पाणी, अंगावरील कपडे आणि बोलण्या चालण्याची ऐट, ह्यांपासून घोडेस्वारास फारच कौतुक वाटूं लागलें होतें. त्याला त्याची संगति कांहीं वेळ तरी करून हा कोण काय ही माहिती मिळविण्याची उत्कंठा लागून राहिली होती. त्यामुळें तोही ह्या मंडळाबरोबर सळमिसळून वागूं लागला, आणि त्यांच्याच मुक्कामाच्या ठिकाणीं आपणही दुपारच्या मुक्कामास गेला.

बाप्पानें आपल्या सोबत्यांस अगदीं ताकीद देऊन ठेवली होती कीं त्यांनीं बाप्पा हा कोण कोठला वगैरे कांहींएक

माहिती कोणालाही कळवूं नये. त्यामुळें त्या नव्या गृहस्थाच्या चौकशीचें कांहींएक सार्थक न होतां तो विशेषच बुचकळ्यांत पडला. कारण त्यांच्या सांगण्यावरून त्याचा एकही तर्क जुळेना आणि संशय तर दुणावूं लागला. ही सर्व मंडळी त्या सरोवराच्या एका बाजूस उतरली आणि त्यांनीं त्या घायाळाच्या जखमा वगैरे धुऊन त्याला कांहीं झाडपाल्यांचीं औषधें लावली व त्या बांधून टाकल्या. हें कृत्य आटोपतांच सर्वांनीं त्या सरोवरांत उड्या टाकून पोहण्याचा सपाटा चालविला. त्यांतही त्यांचे बुडाबुडीची शिवाशिवी, सुरुंग धरण्याची चढाओढ वगैरे खेळ चाललेच होते. त्यांतही हा नवा गृहस्थ मिसळला, व अगदीं सलगीनें वागूं लागला. त्यांत एकदां शिवाशिवीचा डाव चालला असतांना बाप्पावर चोरपण आलें व तो या नव्या गृहस्थाच्या पाठीमागें लागला. दोघांचीही अगदीं वनचक्कर चालली होती. असें होतां होतां बाप्पाची दमछाक पुरी होऊन त्याच्यानें त्या गृहस्थाचा पाठलाग करवेना. तेव्हां तो उताणा पडून विश्रांति घ्यावयास पाहूं लागला. इकडे हा नवा गृहस्थ हा संधींत बुडूनच त्याच्या जवळ जवळ आला आणि 'कां जिरली' म्हणून त्याला चिडवूं लागला. बाप्पाला तें सहन न होऊन त्यानें जी सुरकांडी देऊन बुडी दिली ती त्याला पकडून तो बाहेर पडला. परंतु यापुढें मात्र त्याच्यानें एक हातही टाकवेना. तेव्हां 'भलेरे बहाद्दर मात केलीस' असें म्हणत

तो नवा गृहस्थ त्यांच्या जवळ आला व त्यानें त्यास आपल्या बरोबर कडेला नेलें. बाप्पा कडेवर जाऊन अगदीं निपचित् पडला. फरशी रखरखीत तापली होती. प्रथम त्याच्या सोबत्यांना वाटलें कीं हा आंग टाकतो आहे. परंतु कांहीं वेळानें जों पहातात तों खरोखरच तो अगदीं निर्जीव झाला असून तापानें फणफणला आहे असें त्यांस आढळून आलें. तेव्हां सगळ्यांच्या तोंडचें पाणी पळालें. त्यांनीं त्याला सावलींत निवाऱ्याच्या जागीं नेऊन ठेविलें. त्यांना कोणालाही खाणें सुचेना कीं पिणें सुचेना. बरें त्या रानांत औषधोपचार तरी कसला करणार? शेवटीं एका तासानें तो मळमळां ओकूं लागला व कांहीं वेळानें त्याला सपाटून वांति झाली. यामुळें त्याचा ताप निवाला. केवळ अशक्तता मात्र राहिली होती. तेव्हां मग सगळ्यांनीं थोडें फार खाणें पिणें केलें आणि त्यालाही त्यांनीं मोठ्या ममतेनें थोडेंसें खाऊं पिऊं घातलें व निजविलें. त्याला झोंप लागली; व तो चार घटकांनीं चांगला सावध झाला.

आतां तिसरा प्रहर उलटून गेला होता. ऊन कमी होत चाललें होतें. तेव्हां हा सर्व तरुणांचा मेळा आपल्या मार्गास लागण्याच्या तयारीस लागला.

इकडे यावेळीं आपल्या प्रवासी शिपाही जगदेवानें त्या लक्ष्मीमंदिरांतील पूजासाहित्यानें पूजन करून व फळादिकांचा नैवेद्य समर्पण करून उरलेला प्रसाद भक्षण

करून आपल्याशींच कांहीं विचार करीत बसल्या होत्या. तों ‘ आधीं पोटोबा आणि मग विठोबा ’ या न्यायानें ह्या देवीची आठवण होऊन **बाळो, देव, बाप्पा** आणि **साहसी** यांच्या स्वाऱ्याही माताजीचें दर्शन करण्यास इकडे वळल्या.

चित्रविचित्र रंगांचीं फुलें व पानें यांचे अनेक तऱ्हेचे वस्त्रालंकार करून आपल्या तरुण प्रवाशी स्त्रीनें माताजीस असें शोभविलें होतें कीं त्या पाषाणमूर्तीस जीवंत जगदेक-सुंदरीचें स्वरूप प्राप्त झालें होतें. ही तरुण मंडळी दर्शनाला येतांच प्रवाशी स्त्रिया जरा बाजूला सरल्या व अगदीं लपल्या. ज्याप्रमाणें निबिड अंधःकारांत सौदामिनी क्षणेक चमकून एकदम नाहींशी व्हावी त्याप्रमाणें ती सुंदरी साहश्याचे नजरेस ओझरती पडल्यामुळें त्याचें मन अगदीं चंचल होऊन गेलें. त्याचे सोबती सर्व या जंगलांत माताजीची अशी लोकोत्तर पूजा कोणी बांधली असेल ती असो, धन्य आहे एकंदरींत त्याच्या कुशलतेची, अशी तारीफ करीत त्या ध्यानाशीं तन्मय होऊन गेली. त्यांच्या लक्षांत वरील प्रकार मुळींच आला नाहीं.

शेवटीं कांहीं वेळानें मंडळी परत निघाली. तेव्हां ‘गडे हो माताजीस चार प्रदक्षिणा तर घालूंया’ असें ह्मणून आणिक कांहीं वेळ तेथेंच काढण्याचा आपल्या साहश्यानें बूट काढला. मंडळी प्रदक्षिणा घालावयास लागली. परंतु याचा हेतु सिद्धीस जाईना. तेव्हां निराश होऊन

तो मंडळी बरोबर परतही फिरला. परंतु त्यानें जें कांहीं पाहिलें होतें तें त्याच्या मनांतून नाहींसें होईना. तो शरीरानें मात्र मंडळी बरोबर होता. मनानें त्याचा वास या देवीजवळच झाला.

राजकुवरीनेंही या आमच्या साहश्यास चांगलेंच पाहिलें होतें; व तिच्या मनानेंही तिच्या शरीराशीं फारच झगडा चालविला होता असें दिसतें. मंडळी जातांच ती व तिची सहचरी ती प्रौढा अशा दोघीही बाहेर आल्या आणि आपापसांत कांहीं हलकेंच कुजबुजून त्यांनीं ही आपलें चंबू गबाळें आटोपलें. मंडळीच्या मार्गावर लक्ष देऊनच ह्या दोघीही चालल्या. तथापि कुंवर या वेळीं बुद्धिपुरस्सर गिरिजेच्या मागें लपत लपत चालत होती.

आपण आतां ह्यांनां सोडून मनोवेगानें त्रिकूटाचलावर जाऊन बसूं. कारण हीं सर्व आपणास तेथें भेटतीलच.

## प्रकरण १२ वें.

---

अरे, आतां काय रात्र आहे का दिवस ? दिवस ह्मणावा तर आकाशांत चंद्र आहे. रात्र ह्मणावी तर उकडतें आहे किती ! ह्या दीपप्रकाशामुळेंच का हा इतका उष्मा होत असावा ? आपले तर डोळेच दिपतात बुवा हें पाहून. कोण ही गर्दी झाली आहे इथें ! हा केवढा नरनारी समूह. आंत रिघाव तरी कसा होणार ? बरें ह्या बाजारांत तरी फिरूं जरा. छे हो, येथेंही कांहीं सोय नाहीं.

दिसत. मुंगीलाही फिरकण्यास वाव नाहीं येथें. काय विक्रय कसा झपाट्यानें चालला आहे ! ह्या पर्वतशिखरावर हें एक रम्य नगरच जणूं झालें आहे आज. हीं सोन्या रुप्याचीं, तांब्या पितळेचीं भांडीं, हे इकडे मोतीं, पोवळीं, हिरे, माणकें वगैरेचे दागदागिने तर ते तिकडे पाहिलेत कां रेशमी जरीकांठी वस्त्रांचे शालींचे ढीगच्या ढीग लागले आहेत. त्याचप्रमाणें उत्तम उत्तम घोडे आहेत; ढाला, तरवारी, खड्ग, परशू वगैरे हत्यारेंही येथें विकावयास आहेत. सर्व कांहीं आहे, नाहीं काय हाच प्रश्न. हे पाहिलेत का फुलांचे पोषाख माताजीस चढविण्या-करितां किती तऱ्हे तऱ्हेचे केले आहेत ते ! ही मेवा मिठाईचीं व पक्वान्नांचीं ताटेंच्या ताटें भरलेलीं दिसताहेत. काय पहावें आणि काय न पहावें असें होऊन जात आहे ! चला पुढें सभामंडपांत जाऊं व होमाची मौज पाहूं. ओ हो ! ह्या होमाग्निज्वाला किती सुंदर दिसताहेत. वेदघोष कसा त्रितीय सवनांत चालला आहे. कान व डोळे पवित्र झाले. तें तिकडे पाहिलेंत का पण क्षत्रिय वैश्य वगैरेंच्या त्याच प्रमाणें क्वचित् ब्राह्मणांच्याही लहान मोठ्या स्त्रिया माताजीस रिझविण्याकारितां गाणीं ह्मणताहेत. कोणी हळदीकुंकूं वांटताहेत. कोणी होमास बसलेल्या ब्राह्मणांस दक्षिणा देताहेत. कोणी होमकुंडाची पूजा करीत आहेत. कोणी नारळ फोडताहेत. कोणी गाभाऱ्यांत देवीची ओटी भरताहेत. कोणी देवीस साडी चोळी नेसवीत आहेत.

पुजारी या इतक्यांच्या मानगडीकडे लक्ष देतां देतां अगदीं टेकीस आल्यासारखा दिसत आहे. पण इकडे या दक्षिण दरवाज्याकडे लक्ष दिलें का ? हें इकडे बलिस्थान आहे अं. अरेरे कोण हा रक्ताचा डोह. ही किती तरी पशूंची मुंडकीं. छे, छे, हा देखावा पाहण्यास फारच भयंकर. आपण तो सोडूनच देऊं. अरे पण ही एकदम वाद्यांची गडबड कां बरें सुरू झाली ? हं ही पूर्णाहुतीची वेळ आली अं. हा दुंदुभिध्वनि आणि इतर वाद्यांचा गजर खचित गगन फोडून स्वर्गांत जाईल.

हें सगळें खरें. पण या सर्व गडबडींत आपली ओळखीचीं माणसें कोणीच दिसत नाहींत हें कसें ? काय, त्यांपैकीं कोणी नाहींच कीं काय येथें आलेला. असें कसें होईल पण ? सुशर्मा तर होमस्थळीं सांपडलाच पाहिजे. जरा नीट पाहूं या ह्मणजे सांपडेल. अरे पण ही वैदिक मंडळी तर एक एक उठावयास लागली. तो पहा त्यांत सुशर्मा सगळ्यांच्या अग्रस्थानीं कसा शोभतो आहे ! अरे पण हा इतक्यांत सुशर्म्याचे पाय घट्ट धरून त्याची विनंती कोण करितो आहे ? हो, हा वीरसीच. हा बहुतकरून बाप्पाची हकीकत सांगण्यास व सुशर्म्याची क्षमा मागण्यास इच्छितो आहे. त्यानें पायावर डोकें ठेवितांच " हं हं हें काय ? उठा उठा " असें ह्मणून सुशर्मा वीरसीस हातांनीं उठवूं लागला तों " भगवन् मी महान् अपराधी आहें. आपण अभय द्याल तर मी विनंति करूं-

वीनें." असें वीरसीचें बोलणें ऐकून सुशर्म्यानें त्याला 'अभय आहे' ह्मणून वचन दिलें. नंतर वीरसीनें सर्व हकीकत सुशर्म्यास कळविली. ती ऐकून त्याला फार वाईट वाटलें. तथापि त्या ब्राह्मणानें आपलें क्षमाव्रत ढळूं दिलें नाहीं. त्यानें तोंडांतून एकही वाईट शब्द काढला नाहीं. पुढें मंडळी अवभृथ स्नानास मोठ्या समारंभानें गेली. सुशर्म्यानें आपल्या मनांतील व्यथा यत्किंचित्‌ही बाहेर न दाखवितां तो मंडळीबरोबर चालला होता. तथापि त्याचें अन्तर्याम दुःखानें अगदीं करपून गेलें होतें. हा-माची मंडळी अवभृथ स्नानास गेल्यावर हळू हळू सभा मंडपांतील सर्व गर्दी कमी झाली. अवभृथस्नानाचा समारंभ एका सरोवरावर होता. हें सरोवर विस्तृत असून चारी बाजू चांगल्या बांधलेल्या होत्या. त्याचप्र-माणें त्यास पुरुषभर पाण्यापर्यंत पायऱ्याही होत्या. अवभृथस्नानाची मौज पाहण्यास देवळांतील सर्व गर्दी इकडे लोटली असून शिवाय आतां अपरात्र झाली असल्यानें बाजारांतील देवघेवही मंदावून तिकडलीही माणसें हा समारंभ पाहण्यासच लोटली होतीं. एकंदरीत सरोवराच्या चौफेर सर्व पायऱ्या वगैरे सुद्धां चांगली दहावीस हात माणसांचीच भित झाली होती. छबिना मिरवत मिरवत सरोवरावर येऊन पोंचला तों पहाटेची प्रहर रात्र उरली होती. तेथें येऊन पोंचतांच तेथील तीर्थ पूजादि विधि होऊन संकल्प पूर्वक अध्वर्यु पुरोहित वगैरे मंडळी

एक एक स्नानास उतरूं लागली. तों चारी बाजूंनी इतर ही शेंकडों हजारों लोक स्नानार्थ आंत उतरूं लागले. चारीबाजूस संकल्प सांगणाऱ्या ब्राह्मणांची अगदीं त्रेधा उडून राहिली होती. तरुण क्षत्रिय बांडांची उड्या टाकण्यांत च-ढाओढ सुरू झाली होती. पण या मंडळींत आमचे ओळ-खीचे इसम कोणीच दिसत नव्हते. अशी जिकडे तिकडे स्ना-नाची एकच एक गर्दी उसळली आहे तों एकाएकीं रणशिंगा-चा भयंकर आवाज झाला व जिकडे तिकडे अगदीं सामसूम झालें. मात्र वैदिक मंडळींत 'हं पाहतां काय, पंडितजी गेले त्यांना वर काढा ! अहो आतां होते कीं हो. अहो हो पण त्यांचा पाय घसरला हो. छे छे हें मोठेंच विघ्न. कांहीं तरी ईश्वरी कोपच हा यज्ञांत चूक तर नाहीं झाली." असा सारखा कल्होळ सुरू झाला. तोंच दहा पांच मल्ल एकदम तेथें आले व त्यांनीं धडाधड पाण्यांत उड्या टाकल्या. तेव्हां 'तिथें नव्हे हो इथें. छे छे या या इथें. छे इथेंच घसरले ते' असें ओरडत वैदिक मंडळी प्रत्येक आपापल्या परी निरनिराळी जागा दाखवीत असत. अशा प्रकारें चांगली अर्ध घटका गेली तरी पंडितजींचा शोध लागेना. प्रत्येकजण एक दोन बुड्या देऊन दम पुरा होऊन बाहेर निघाला. एकासही त्यांचा कांहीं एक सुगावा लागला नाहीं हें पाहतांच लोकांत एकच गडबड सुरू झाली. जिकडे तिकडे मोठमोठ्यानें ओरड सुरू झाली. तोंच एका कोपऱ्यांतून पांच सहा तरुण बांड लंगोट बंद

णोनें. असें वीरसीचें बोलणें ऐकून सुशर्म्यानें त्याला 'अभय आहे' ह्मणून वचन दिलें. नंतर वीरसीनें सर्व हकीकत सुशर्म्यास कळविली. ती ऐकून त्याला फार वाईट वाटलें. तथापि त्या ब्राह्मणानें आपलें क्षमाव्रत ढळूं दिलें नाहीं. त्यानें तोंडांतून एकही वाईट शब्द काढला नाहीं. पुढें मंडळी अवभृथ स्नानास मोठ्या समारंभानें गेली. सुशर्म्यानें आपल्या मनांतील व्यथा यत्किंचित्‌ही बाहेर न दाखवितां तो मंडळीबरोबर चालला होता. तथापि त्याचें अन्तर्याम दुःखानें अगदीं करपून गेलें होतें. होमाची मंडळी अवभृथ स्नानास गेल्यावर हळू हळू सभा मंडपांतील सर्व गर्दी कमी झाली. अवभृथस्नानाचा समारंभ एका सरोवरावर होता. हें सरोवर विस्तृत असून चारी बाजू चांगल्या बांधलेल्या होत्या. त्याचप्रमाणें त्यास पुरुषभर पाण्यापर्यंत पायऱ्याही होत्या. अवभृथस्नानाची मौज पाहण्यास देवळांतील सर्व गर्दी इकडे लोटली असून शिवाय आतां अपरात्र झाली असल्यानें बाजारांतील देवघेवही मंदावून तिकडलीही माणसें हा समारंभ पाहण्यासच लोटलीं होतीं. एकंदरींत सरोवराच्या चौफेर सर्व पायऱ्या वगैरे सुद्धां चांगली दहावीस हात माणसांचीच भिंत झाली होती. छबिना मिरवत मिरवत सरोवरावर येऊन पोंचला तों पहाटेची प्रहर रात्र उरली होती. तेथें येऊन पोंचतांच तेथील तीर्थ पूजादि विधि होऊन संकल्प पूर्वक अध्वर्यु पुरोहित वगैरे मंडळी

एक एक स्नानास उतरूं लागली. तों सारी मागूनी इतर ही शेंकडों हजारों लोक स्नानार्थ आंतें उतरूं लागले. चारीबाजूस संकल्प सांगणाऱ्या ब्राह्मणांची अगदीं त्रेधा उडून राहिली होती. तरुण क्षत्रिय व्रांडांची उड्या टाकण्यांत चढाओढ सुरू झाली होती. पण या मंडळींत आमचे ओळखीचे इसम कोणीच दिसत नव्हते. अशी जिकडे तिकडे स्नानाची एकच एक गर्दी उसळली आहे तों एकाएकीं रणशिंगाचा भयंकर आवाज झाला व जिकडे तिकडे अगदीं सामसूम झालें. मात्र वैदिक मंडळींत 'हं पाहतां काय, पंडितजी गेले त्यांना वर काढा! अहो आतां होते कीं हो. अहो हो पण त्यांचा पाय घसरला हो. छे छे हें मोठेंच विघ्न. कांहीं तरी ईश्वरी कोपच हा यज्ञांत चूक तर नाहीं झाली." असा सारखा कल्होळ सुरू झाला. तोंच दहा पांच मल्ल एकदम तेथें आले व त्यांनीं धडाधड पाण्यांत उड्या टाकल्या. तेव्हां 'तिथें नव्हे हो इथें. छे छे या या इथें. छे इथेंच घसरले ते' असें ओरडत वैदिक मंडळी प्रत्येक आपापल्या परी निरनिराळी जागा दाखवीत असत. अशा प्रकारें चांगली अर्ध घटका गेली तरी पंडितजींचा शोध लागेना. प्रत्येकजण एक दोन बुड्या देऊन दम पुरा होऊन बाहेर निघाला. एकासही त्यांचा कांहीं एक सुगावा लागला नाहीं हें पाहतांच लोकांत एकच गडबड सुरू झाली. जिकडे तिकडे मोठमोठ्यानें ओरड सुरू झाली. तोंच एका कोपऱ्यांतुन पांच सहा तरुण व्रांड लंगोट बंद

' बाजू बाजू " म्हणून ओरडत व दोहीं हातांनीं गर्दी हटवीत पुढें सरकले व सर्व लोकांच्या संप्रोत्साहमांत त्यांनीं आंत उड्या टाकल्या. त्यांतील शेवटी ज्यानें उडी टाकली तो तर अगदींच कोंवळा पोर दिसत होता. परंतु त्याची उडी पुढल्यांच्याही पुढें गेली. सर्व लोकांचे डोळे या नवीन तरुणांकडे लागून राहिले. एक चकार शब्दही कुणी तोंडावाटे काढीना. थोडक्या वेळांत पांचही इसम जवळ जवळच परंतु पांच बाजूस वर मुंडक्ीं काढून एकमेकांस कांहीं संकेत करूं लागले. त्यांचे संकेत पुरे होतांच फिरून त्यांनीं एकाच मध्य बिंदुकडे लक्ष देऊन बुड्या दिल्या व फिरून बराच वेळ कोणीच वर येईना. लोकांचा धीर सुटत चालला. फिरून कुजबूज सुरू झाली. होतां होतां " बुडले हो बुडले तेही बुडले ' असे अथवा अशा अर्थाचे निरनिराळे उद्गार निराशेच्या भयप्रद सवमांत चहूंकडून निघूं लागले. सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. जो तो आपापल्या परी देवीस नवस करूं लागला. वैदिक मंडळी ' हें संकट निभावल्यास देवताकोपशान्त्यर्थ लगेंच दुसरा यज्ञ करूं ' म्हणुन करुणा भाकूं लागली. कोणी लाख मृत्युंजय जपाचीं उदकें सोडूं लागले तर कोणी लघुरुद्र, महारुद्र, शतचंडी, सहस्रचंडी इत्यादिकांचीं उदकें सोडूं लागले. इतक्यांत एकदम " जय असो ! अंबाभवानीचा जय असो ! भले ! मात केलीत ! खरे वीर आहांत ! सिंहाचे छावे

आहांत ? असे उद्गार चहूंकडून सुरू झाले. कारण सर्वांत लहानगा मध्यें व चारी बाजूंला चार इतर अशा पांचांनींही उचललेली अशी पंडितजींची स्वारी पाण्यावर दिसूं लागली. जिकडे तिकडे आनंदी आनंद झाला. त्यांतच कित्येक तळ्याच्या अगदीं कांठावरील जवळच्या लोकांनीं खुणांनीं 'पंडितजी कुशल–जीवंत–आहेत ना' म्हणून शोध चालविला, तों त्यांनींही उलट स्वस्तिक्षेम दर्शक चिन्हें केलीं. थोडक्याच वेळांत पंडितजी वर आले. जिकडे तिकडे जयजयकार झाला. मंगल वाद्यें सुरू झालीं. पंडितजींस कांहींएक इजा झालेली नसून किंचित् मूर्च्छा आली होती. तीही थोडक्यांतच योग्य उपचारानीं दूर झाली व ते डोळे उघडून आपल्या भोंवती पाहूं लागले. तों लगेच त्यांचे पाय घट्ट धरून एका दहा अकरा वर्षांच्या मुलानें 'गुरूजी, हा आपला कृतक पुत्र व शिष्य आपणांस प्रणिपात करीत आहे. आशीर्वाद असावा' असें म्हटलें. मग त्यांच्या त्या आनंदास पारावारच नाहीं. 'वत्सा ऊठ! फार श्रमलास! मजकरितां तूं आपलेही प्राण संकटांत घातलेस ना!' असें म्हणून त्यांनीं त्याला उठविलें. त्याच्या डोक्याचें अवघ्राण करून व मुखाचें चुंबन घेऊन त्यांनीं त्याला पोटाशीं धरलें. बाप्पासही फारच आनंद झाला होता. आपण ज्याच्याकरितां हें येवढें साहस आपल्या सोबत्यांसह केलें ते आपले धर्मपिते व गुरूजीच होत हें त्यालाही आतांच कळलें होतें. त्याच्या मित्रांत **बाळो, देव** आणि **साहसी** हे तिघेही होतेच.

आतां विशेष पाल्हाळ कांहीं लावीत नाहीं. वाचकांना इतकेंच सांगून ठेवितों कीं **सामरसी**, **वीरसी**, **सुशर्मापंडित**, **साहसी**, **बाप्पा**, **बाळो** आणि **देव** इतकी सर्व मंडळी याप्रसंगीं एकवटली व **बाप्पाच्या** जीवावर आलेल्या प्रसंगांतून निभावलेला **बाप्पा** फिरून विशेष सुस्थळीं राहील अशी तजवीज निघाली. तो भाग आतां पुढील प्रकरणांत येईलच. दसऱ्याच्या दिवशीं विजयोत्सवदर्शक देवीच्या रथाची मिरवणूक व सीमोल्लंघनाचा समारंभ यंदां विशेषच आनंदानें, उत्साहानें, व कळकळीनें झाला हें सांगावयास नकोच. तथापि इतकें येथें सांगून ठेवलेंच पाहिजे कीं **राजकुवरीची** व आमच्या साहसी मित्राची याच विजयादशमीच्या दिवशीं आकस्मिक भेट झाली; व हीं एकमेकांचीं प्रेमपात्रें एका ठिकाणीं झाल्यानें त्यांच्या ओळखीच्या सर्व मंडळींत विशेषच आनंद झाला हें सांगितलें पाहिजे असें नाहीं. आपला **साहसी** हा सिंधच्या राजाचा पुत्र होय. आणि **राजकुवरबाई** ही सिंध देशांतीलच एका संस्थानिकाची कन्या असून एके दिवशीं शिकारीच्या प्रसंगांत दाहिरपुत्र मार्ग चुकून अकस्मात् ह्या क्षात्र कन्येच्या उद्यानांत विश्रामार्थ आला होता. तेथें राजपुत्राचें आदरातिथ्य **राजकुवरीसच** करण्याचा प्रसंग आला. आणि त्या प्रसंगीं जरी विशेष सलगीचीं भाषणें वगैरे प्रकार झाला नाहीं तथापि कांहीं दिवसांनीं **राजकुवरीस** असें आढळून

आलें कीं आपलें मन दाहिरपुत्रानें आपल्या बरोबर नेलें असून तें आतां परत आपलें आपणास मिळणें कठीण आहे. तात्पर्य तिनें त्यास मनानें वरिलें. परंतु पुढें परचक्राच्या सपाट्यांत सर्वच पांगापांग झाल्यामुळें तिजवर हा प्रसंग आला होता. राजपुत्राचेंही मन तिनें हरण केलें होतें व राजपुत्रासही तसा प्रकार झाल्याचें स्मरत होतें. तथापि राज्यक्रान्तीच्या वणव्यांत त्याची असल्या गोष्टींबद्दलची आठण जळून खाक झाली होती. तिला फिरून त्या सुंदरीच्या सरोवरावरील देवीच्या देवळांत घडलेल्या प्रत्यक्ष दर्शनामृत संजीवनीनें जागृत केल्यामुळें त्याची चित्तवृत्ति अशी बावरी झाली होती. अस्तु ! आज फिरून तीं परस्परदर्शनकामुक अशीं ब्रह्मदेवाचीं लेकरें एकमेकांस भेटलीं. आतां पुढें काय प्रकार होतो तो पाहतां येईल.

---

## प्रकरण १३ वें

मागील प्रकरणांत सांगितलेल्या गोष्टी घडल्यास आतां बरेच दिवस झाले आहेत. **सुशर्मागुरुजींच्या** संमतीनेंच **बाप्पा** आपल्या **बाळो** वगैरे मित्रांबरोबर पाराशर वनांत राहत होता. हें वन साकुंब्रचाच्या हद्दींत असून त्यांतील वनश्री अत्यंत रमणीय होती. साकुंब्रचाचा राजा चितोडचा सामंत याची व **बाप्पाची** ओळख झालेली होती. त्यानें आपल्या गोशाळेंत **बाप्पास** बराच

अधिकार दिला होता. त्याच्याच गोशाळेवरील **बाळो** वगैरे हेही गोवारी असत. ह्या गाईचें दूध सामंतजींच्या हुकमाप्रमाणें कांहीं राजवाड्यांत तर कांहीं अमुक तमुक अशा देवस्थानांकडे अथवा त्याच्या हद्दींतील सदावर्तें व धर्मशाळादिकांकडे पोंचतें करावयाचें असे. हीं सर्व कामें **बाप्पा, बाळो, देव** वगैरेंनीं स्वतःच करावीत असें नसून त्यांनीं तीं आपल्या हाताखालील इतर गोवाऱ्यांकडून करविलीं तरी चालत. अशा स्थितींत हा राजगवळी दिवस काढीत असतां त्याच्या अंगांतील साहस चापल्यादिक कौतुकास्पद गुणांनीं तो राजवाड्यांत वगैरे जास्त प्रिय होत चालला. हरएक प्रसंगीं **बाप्पाच्या** प्रसंगावधानादिकांबद्दल त्याला सामंतजींकडून पारितोषिकें मिळावयास लागलीं. मल्लविद्येंत तर **बाप्पा** अलीकडे अलीकडे अगदीं अद्वितीय होत चालला होता. त्याचप्रमाणें त्याच्या बरोबर घोडा फेंकण्यास सामंतजींच्या अनुयायांत क्वचित्च कोणी सांपडे. बाण सोडण्याची चढाओढ लागली तरी आपली त्यांतही याचीच सरशी व्हावयास लागली. अशाप्रकारें दिवस चालले असतां एक दिवस **बाप्पास** एक विलक्षण लाभ झाला. आणि हा लाभच त्याच्या सर्व भावी उत्कर्षाचें मूळ कारण होय. तो प्रकार असाः—गुणाची चहा झालेली जशी कित्येकांस आवडते तशीच ती कित्येकांच्या मनांत गुणी मनुष्याबद्दल द्वेषभावनाही उत्पन्न करिते.

**बाप्पाच्या** खेळगड्यांतही असाच प्रकार झाला. गोशाळेंतील एक कपिला गाय व्याली होती. तिची कांस फारच मोठी व पुष्ट दिसे. गाय सर्व सुलक्षणसंपन्न असल्यामुळें तिच्या दुधावर राजवाड्यांतील पुष्कळ लोकांचा डोळा होता. पुरोहितजींनीं त्या कपिला गाईच्या दुधाचा राजानें आपल्या उपास्य देवतेस अभिषेक करवावा अशी सूचना केली होती. राजास पुत्रसंतति नसल्यानें तत्प्राप्त्यर्थ त्याचे अनेक देवधर्म चालले असत. राजपत्नीचेही पुत्रवती सुवासिनींस त्यांच्या तान्ह्या मुलांकरितां गाईचें दुध वगैरे स्वतः देणें अथवा सुमुहूर्तानें आपल्या हातानें त्यांस दूध पाजणें वगैरे नियम असत. सांगावयाचें तात्पर्य इतकेंच कीं विशेषलक्षणयुक्त गाईच्या विण्यावर, तिच्या दुधावर, वासरावर वगैरे राजपुरुषांचें विशेष लक्ष असे. त्यामुळें या नूतन प्रसूत कपिला गाईचें दूध निराळेंच काढून आणण्याचा राजाचा हुकूम होता. परंतु गाय कांहीं दूध देत नसे. ही गाय **बाप्पाच्या** ताब्यांत असे. वासरूं पुष्ट दिसे; गाईची कांस चांगली भरलेली दिसे; आणि दोहनसमयीं मात्र ती पान्हवतच नसे. होतां होतां **बाप्पा** तिचें दूध चोरून पितो असा त्याच्या द्वेष्ट्यांनीं बूट काढला. **बाप्पाला** मान खालीं घालावी लागली. तथापि त्याच्या मनानें हें काय गौडबंगाल आहे तें शोधून काढण्याचें घेतलें. आणि त्याप्रमाणें प्रतिज्ञापूर्वक तो त्या कामाकरितां स्वतः त्या गाईच्या पाळतीवर

राहिला. त्यानें आपले सर्व खेळ सोडून दिले. अशारीतीनें तो तिची पाळत राखीत असतां दहा दिवस लोटले. तरी त्याला कांहीं थांग लागेना. त्याच्या अन्तर्गत मानी स्वभावाला त्याच्यावर केलेला चोरीचा आरोप फारच झों-बला होता. त्याच्या मनांत आपणास फिरून त्या मुनि-वर्यांचें दर्शन झालें तर बरें. आपण त्यांच्याच सेवेंत दिवस घालवूं असेंही आलें. ह्या दहा दिवसांत मनाच्या व्यग्रतेमुळें, गाईमागें रानांतच हिंडत असल्यानें व शि-कारी वगैरेकडे लक्ष नसल्यानें तो सहजच कंदमूळाहारी बनला होता व त्याला निरशनच घडत होतें ह्मटलें तरी चालेल. **हारीत**ऋषींची वरचेवर आठवण होऊन कित्येक वेळां त्यानें त्यांच्याच ध्यानांत तल्लीन व्हावें. कित्येक-वेळां **सुशर्म्या**चीही पूज्यभावानें त्याला आठवण होई. शेवटीं शेवटीं तर कंदमूळादिकांच्या आहाराकडेही त्याचें लक्ष लागेना. एकदोन दिवसांत तर त्यानें पाणीही चाखलें नव्हतें. असें होतां होतां ह्मणजे ही एक प्रकारची ईश्वराच्या घरची कसोटीच चालली असतां सोमप्रदोषाच्या दिवशीं ह्मणजे अकराव्या दिवशीं अचानक **बाप्पास** त्याच्या प्रयत्नांत यश आलें. ती गाय एकाएकीं एका खाड्यांत गेली. हा खाडा फारसा खोल नव्हता. त्यांत झुडपें मात्र पुष्कळच वाढलेलीं होतीं. भोंवताली चांगली गर्द माजलेली हरळी होती व दहाबारा बेलाचीं झाडें होतीं. त्यांच्या झाकोऱ्यांत हा खाडा असल्यानें तिथें खाडा आहे असें सुद्धां भासत

नसे. कारण आंत त्या गुंतागुंतींत जातो कोण? बाप्पा गाईच्या मागोमाग त्या वेलांच्या फांद्या दूर करून कांट्या-कुट्यांतून शिरला. तों त्याच्या असें नजरेस आलें कीं एका विशेष स्थानीं ती गाय आपला पान्हा सोडते; व सर्व कास रिकामी झाली ह्मणजे तेथून हालते. यापूर्वी ही एकदोन प्रसंगीं त्यानें गाय त्या कांट्यांत जाऊन बराच वेळ उभी राहतांना पाहिली होती. पण ती सहज उभी राहत असेल अशा समजुतीवर त्याचा तिकडे काना-डोळा झाला. परंतु आज हा प्रकार पाहून खात्री होतांच बाप्पाचा आनंद गगनांत मावेना. त्यानें लगेच हा प्रकार आपल्या इतर खेळगड्यांस दाखवावा अथवा स्वतः गो-शाळाधिपतीस दाखवावा असें मनांत आणिलें. परंतु कांहीं वेळानें त्याला असें वाटलें कीं गाईनें प्रत्येक दिवशीं याच ठिकाणीं येऊन आपला पान्हा सोडून सर्व कास रिकामी करणें यांत कांहीं तरी ईश्वरी चमत्कार असला पाहिजे. ही कल्पना मनांत येतांच त्यानें तो प्रकार काय आहे तें शोधून काढल्यावांचून त्या जागेवरून हालावयाचें नाहीं, असा निश्चय केला. आणि त्यांत त्याला यशही आलें. दुसरे दिवशीं शिवरात्र होती. ह्या ठिकाणीं एक स्वयंभू शिवलिंग होतें. त्याची माहिती एकट्या हारित-मुनींस मात्र होती. इतरांस नव्हती. तें लिंग बरेंच खोल होतें. भोंवती थोडासा खडकाळ भाग होता; व त्याच्या मध्यांत एक पुरुष दीड पुरुष सुळक्यासारखा खडा होता.

भोंवतालच्या कातळावर पाणी पुष्कळ असून त्यांत दाट हरळी रुजलेली होती. खाड्याच्या तोंडावर वेलाच्या फांद्या व पानें, फळें वगैरे पडून तें बहुतेक झांकलेलेंच होतें. या गाईच्या दुधाची धार मात्र नेमकी अभिषेक पात्रांतील पाण्याच्या धारेप्रमाणें त्या तळांतील शिवलिंगावर पडत असे. हें सर्व बाप्पाच्या दीर्घ प्रयत्नांनीं व पूर्वपुण्याईच्या जोरानें प्रत्यक्षास आल्यावर त्याला जो आनंद झाला तो त्याला एखादा परीस सांपडला असतांही झाला नसता. त्याच्या चित्तवृत्ति एकदम श्रद्धेनें व भक्तिभावानें उचंबळूं लागल्या; व त्यानें तेथल्यातेथें त्या शिवलिंगाचें त्या मंगलप्रद प्रदोषसमयीं तेथीलच सहस्र बिल्वपत्रपुष्पांनीं पूजन केलें आणि शेवटीं खालीं लिहिल्या प्रमाणें स्तोत्र केलें. तें मी यथामति मराठी भाषेंत आर्यावृत्तांत देतों.

माता न तात मातें जन्मापासून देवदेवाजी।
तूं मायबाप माझा पाठीराखा हि तूंच या प्रभुजी॥१॥
पडलों आकाशांतून धरणीनें मजसि तेंवि सांवरिलें।
वरिलें आपत्तीनें ह्मणुनि तुझे पाय आजि मी धरिले॥२॥
शरणास मरण देणें यापरि दुसरें न दुःख थोरातें।
हें मज ठावें झालें तुझ्या कृपेनें अनाथ पोरातें॥ ३ ॥
दीन दयाघन दुसरा नाहीं तुज सम जगांत या देवा।
भोळा कुणाहि कांहीं देशीं त्वत्पादीं जो धरी भावा॥४॥
ठावा न मार्ग दुसरा देवा तुज प्रार्थिण्या विना मजला।
मन्मतिलाही प्रभुजी तोच असे फार सुगमसा गमला॥५॥
प्रभु तुजवांचुन सारे दीनचि दिसती जगांत या मातें।

ते काय, हाय! देतिल नाशी रवी काजवा न तिमिरातें।।५।।
सद्वंशीं जन्म दिला मजला त्वां शील तें कसें राहे ।
चिंता तुजसिच याची दासाची लाज ईशचीं वाहे ।।७।।
मजला न नीट समजे थोरांची रीत धीट मी वागें ।
रागें न भरें मजशीं कोण मला पोरक्यास ती सांगे ।।८।।
शिक्षा न चांगली मज वनवाशाला प्रभो मिळाली हो ।
क्षात्रा अनुचित भिक्षा वृत्तीचा उलट या घडे लाहो ।।९।।
द्विजनाम सार्थ आतां करा वरानें हरा ! हरा याची ।
यांचा प्राप्त मला हो मज्जन्मा उचित राह रायाची ।।१०।।
सत्संग लाभ होवो, सद्गुरु जोडो, कुसंग मम मोडो ।
शीलाची चाड मनीं वाढो, गत वैभवास दास चढो।।११।।
भक्ति तुझी अचल वसो मन्मानीं त्या कुमतिचा विटाळ नसो ।
कष्टार्जित धन सुख दे तत्व असें तव वरें मनांत ठसो ।।१२।।

---

याप्रमाणें स्तोत्र झाल्यावर पुनः पुनः प्रणिपात करीत **बाप्पा** परतणार तों त्या ठिकाणीं **हारीतां**ची स्वारी येऊन दाखल झाली. त्यांचें स्वरूप काय वर्णावें? साक्षात् श्रीशंकरच लीलामनुष्यावतार धारण करून आल्याप्रमाणें भासत होते. त्यांस पाहतांच **बाप्पा**नें त्यांचे घट्ट पाय धरिले. "वत्सा ऊठ! फार श्रमलास. तूं पुरता कसोटीस उतरलास. तुला आज या श्री एकलिंगाची भेट झाली तेव्हां तुझीं सर्व दुरितें नाहींशीं झालीं असेंच समज. मी हें अन्तर्ज्ञानानें समजूनच बुद्ध्या तुला आशीर्वाद देण्या करितां आलों. अस्तु! आतां मी आपली पूजा उरकतों; व मग तुला आश्रमास घेऊन जाईन." तेव्हां असें ह्मणून ते पूजा करावयास बसले. **बाप्पा**ही 'ज़शी

गुरुजींची आज्ञा' असें ह्मणून स्वस्थ राहिला. यात्र रात्रीं बाप्पास गुरुप्रसादाची प्राप्ति झाली. हा गुरुप्रसाद ह्मणजे एक विजयी खड्ग होय. व नंतर योग्य दिवशीं योग्य वेळीं यात्र हारीतऋषींनीं बाप्पास विध्युक्त गायत्र्युपदेश केला आणि नंतर त्यास त्यांनीं संध्यावंदनादि द्विजकर्मे शिकविलीं. त्याचप्रमाणें बाप्पास तुझें आतां आजन्म उपास्य दैवत श्रीं एकलिंगजी होय असें सांगून श्री एकलिंगाच्या अत्यंत श्रेयस्कर उपासनेचा मार्ग लावून दिला. या दिवसापासून श्रीएकलिंगाच्या दर्शनपूजनावांचून बाप्पा पंचक्रोशींत कुठेंही असला तर अन्न घेत नसे. व लांब असल्यास हारीतऋषींनीं त्यास पार्थिव पूजेचा विधि सांगून ठेवलाच होता त्याप्रमाणें श्रीच्या नांवें पार्थिव पुजून नंतर काय करणें तें तो करूं लागला.

---

## प्रकरण १४ वें.

ईडर प्रकरण जरी कांहीं काळ विझल्यासारखें झालें होतें तथापि अलीकडे त्यानें फिरून पेट घेतल्यासारखें केलें होतें. त्या दीर्घद्वेषी भिल्लांनीं ठाकूरजीच्या प्रजेस हरतऱ्हेनें त्रास देण्याचा सपाटा चालविला होता. तेव्हां हें प्रकरण एकदां शेवटास नेण्याचा ठाकूरजींचा विचार चालला होता. आपला साहसी दाहिरपुत्र यावेळीं भंडेर-गडावर पाहुणचारास होता. त्यानें तर मी एकटाच चार

पांचशें लोकांनिशीं जाऊन त्या प्रमत्त मिहिरराजास पकडून आणतों ह्मणून आग्रह धरला. ठाकुरपुत्र **सामरसा** दाहिरपुत्रास तसें करूं देईना. तो ह्मणे 'आपणांसारख्या पाहुण्यास आह्मीं असल्या संकटांत घालणें ह्मणजे तें आह्मांस लांछन होय.' ठाकुरजींचाही आपल्या मुलाच्या ह्मणण्यास रुकार पडे. शिवाय **राजकुवर**बाईचीही आपल्या नवऱ्यानें असल्या साहसांत शिरूं नये अशीच त्यास रोज रोज विनवणी असे. आणि आपल्या निस्सीम सात्विक प्रेमाची विजय पताकाच कीं काय अशी गर्भप्रभा यावेळीं **राजकुवर**बाईच्या सुंदर शरीरावर स्पष्ट झळकूं लागलेली पाहून तिची विनवणी नाकारणें त्यास कठीण झालें होतें. इकडे **बाळो** व **देव** आणि त्यांचे साथीदार यांच्याही उलाढाली चालल्याच होत्या. **बाप्पा**च्या संगतीनें त्या सर्वांच्या महत्वाकांक्षाही वाढल्या होत्या. **बाप्पानें** तर आपल्या भोंवती या आपल्या साथीदारांचीं मनें वळवून दिवसें दिवस जास्त जास्तच लोक गोळा होतील अशी व्यवस्था चालविली होती. कित्येक प्रसंगीं सहज लीलेकरितांच त्यानें हजारों लोक अर्थात् तरुण आपल्या भोंवती जमवावेत व त्यांच्या समवेत निरनिराळे पौरुष खेळ खेळावेत. मारे राजकारस्थानें चालवावींत. ह्या किल्ल्यांतील बातमी आण, त्यांतील चोरवाटा शोधून काढ, कोठें कांहीं कसरतीच्याच मिषानें आंत शीर, तर कोठें कांहीं इतर समारंभांत सामील हो, असे

यां मंडळीचे डावपेंच सारखे चालत असत. मुसलमानांच्या पुंडाव्यांच्याही बातम्या हें मंडळ चांगल्याच राखीत असे. आपल्या साहशानें त्यांना या नवीन आडदांड धर्ममदांध अविंधांची चांगलीच ओळख पटविली होती. **बाप्पा**च्या तीव्र बुद्धीनें पुढें मागें हे मुसलमानच आपणांस ह्मणजे हिंदूंस—भारतवर्षीय आर्यांस—किती व कसे जाचक होतील हें चांगलेंच ताडलें होतें. शिवाय कधींकाळीं ह्या नवीन टोळधाडीचे अघाडीचे दूतही आर्यावर्तांत फिरतानां दिसत असत. **बाप्पा** व त्याचें मंडळ बहुतकरून या हेरांस ते दिसतील तेथें अल्लाच्या सान्निध्यास पाठवीत असत. त्याचप्रमाणें या शिखानष्ट हेरांचा पाठलाग करितां करितां कधीं कधीं ते ईडरच्या सरहद्दीपर्यंत सुद्धां जात असत. आमचा साहसीही मधून मधून **बाप्पा**ची चौकशी राखीत असे. **सामरसी**लाही अजून **बाप्पा**चा विसर पडला नव्हता. तोही त्याची विचारपूस करीत असे. तात्पर्य काय कीं भंडेरगडावरील वित्तं बातमी **बाप्पा**स असे. ईडरच्या भिल्लांकडची बातमी तर तो स्वतःही काळजीपूर्वक राखी. कारण कंस जसा श्रीकृष्णास तसाच हा आपणास धरून मारण्याच्या खटपटींत आहे हें आतां **बाप्पा**ला चांगलेंच माहीत झालें होतें. शिवाय अलीकडे अलीकडे आपल्या बापाबद्दलचा सूड उगविल्यावांचून जर आपण राहूं तर व्यर्थ आपलें जिणें असेंही **बाप्पा**स वाटूं लागलें होतें.

त्यामुळें भिल्लेशास कसें शरण आणतां येईल हाच विचार त्याच्या मनांत अहर्निश प्रधानपणें घोळत असे. तात्पर्य काय कीं मेंडेरगडावरील विचार बाप्पास कळतांच "भिल्लेशाचा सूड माझा मीच उगवीन, आपण त्या कामांत मुळींच हात घालूं नये, आपला केवळ आशीर्वाद मात्र मला असावा" अशी बाप्पानें बाळोकरवीं ठाकुरजींस विनंति केली. व ठाकुरजींनीं "तो आमच्या प्रदेशास फार त्रास देतो तेव्हां त्याच्या पारिपत्याचा विचार लवकरच केला पाहिजे. आपणांस एव्हांशींच तें काम होणें कठीण आहे" वगैरे उलट बुद्धिवाद करितांच "आपला आशीर्वाद असल्यावर विलंब काय ह्मणून? सहा महिन्यांच्या आंत मी स्वहस्तें त्याला शिक्षा करणार आणि हें जर मजकडून न होईल तर फिरून आपलें कृष्णमुख जगास दाखविणार नाहीं" अशी आपली दुर्धर प्रतिज्ञा त्यानें ठाकुरजींस कळविली. ठाकुरजींनीं ती मान्य करून वेळेवर बाप्पाची पाठराखण्याकरितां तयार असण्याबद्दल सामरसीस ताकीद केली.

बाप्पाचें लोकोत्तर सौंदर्य, त्याच्या आंगचें भाषणचातुर्य, आवाजांतील माधुर्ययुक्त तेजस्विता, चापल्य, समयसूचकता, त्याचे कमळाप्रमाणें विशाल, वाटोळे, गरगरीत व अत्यंत पाणीदार डोळे, त्याची चालण्याची ढब, सिंहाच्या छाव्याप्रमाणें अत्यंत धीर गंभीर अशी दृष्टि व त्याच्या एकंदर सर्व चेष्टा हीं अशीं कांहीं मोहक

असत कीं वाटेल त्याच्या मनांत त्याजबद्दल आदर व स्नेह उत्पन्न झाल्यावांचून राहूं नये. त्याच्या याच गुणांनीं व विशेषतः त्याच्या वयाच्या मानानें अत्यंत आश्चर्यकारक असे त्याचे क्षात्रगुणदर्शक विविध खेळ यांच्या योगानें साळुंब्रयाच्या सामंताच्या प्रासादांत तो सर्व लहानमोठ्या नरनारींस अत्यंत प्रिय झाला होता. स्वतः सामंतजी त्यास कित्येक वेळां आपल्या शेजारीं बसवीत असत. त्याला केव्हांही कोठेंही अगम्य असें स्थानच नव्हतें. जणूं काय तो एक सामंतजींच्या कुटुंबांतीलच कोणी आहे.

सामंतजींस पुत्रसंतान मुळींच नसून एक अत्यंत लावण्यवती कन्या मात्र होती. तिचें वय सरासरी दहा वर्षांचें. तिला नेहमीं पुरुषांसारखे खेळ खेळण्याची हौस. एकुलती एक अतिशय लाडकी कन्या, मग तिचें कौतुक काय विचारतां? ती क्षात्रबाला महातेजस्वी, मोठी मानी असे. दहा वर्षांचीच परंतु नेहमी मर्दानी खेळांत रुळलेली असल्यामुळें अगदीं उपवर नवरी प्रमाणें दिसे. तथापि अल्लड. मन केवळ गंगाजळाप्रमाणें स्वच्छ व निष्पाप. बाप्पाच्या कक्षेंत ही ही सांपडली. बाप्पा बरोबर खेळण्याची तर तिला फारच हौस. बापानें तिच्या समवयस्क अशा पांच पंचवीस क्षत्रिय भिल्ल सुंदरी तिच्या दासीगणांत ठेवल्या होत्या. तिच्या करितां आधींच अत्यंत सुंदर अशा त्या पाराशर वनांत इंद्राच्या

नंदनवनासही लाजवील असा विस्तीर्ण बाग तयार केला होता. या बागांत ती आपल्या त्या एकापेक्षां एक सुंदर चतुर, विनोदी आणि चंचल अशा दासी व समवयस्क तरुण मुलगे यांसह खेळत असे. या बागेंत सुद्धां बाप्पाचा प्रवेश होताच. आणि कधीं कधीं तर साहजीकच परंतु ती सामंतकन्या बाप्पाचा शोध करून आणवीत असे. घोड्यावर बसणें, तीर मारणें, तरवारीचे हात करणें पोहणें, झाडावर चढणें इत्यादि सर्व पौरुषक्रीडा सामंत कन्येच्या अत्यंत आवडीच्या. आणि बाप्पाची तर त्यांत अत्यंत लोकोत्तर करामत. शिवाय आपला मान जाऊं न देतां दुसऱ्याचें मन वेधण्यापुरती आर्जव कशाही बाप्पाच्या अंगांत असल्यानें सामंत कन्येस बाप्पा ह्मणजे केवळ गळ्यांतला ताईत असें वाटत असे. त्याच्या वांचून तिला कोणताही खेळ गोड लागूं नये. त्याला दिल्यावांचून कोणताही कसलाही पदार्थ तिला उपभोगण्यास रुचूं नये. कोणतेंही सुवासिक सुंदर फूल, कसलेंही मधुर स्वादिष्ट फळ, एखादें कळाकुसरीचें चित्र, बाहुलें, आवडीसारखें नव्या नवाळीचें एखादें वस्त्र, कांहींही असो तें आपलें बाप्पाला दिल्या दाखविल्या वांचून व त्यानें पसंत केल्या वांचून तिला रुचलेंच नाहीं. आणि हा सर्व पोरवयांतील नैसर्गिक निर्हेतुक प्रेमाचा प्रकार. त्याच्या खेळगड्यांपैकींही नऊ दहा वर्षांच्या वयाचे कांहीं गरीब विनोदी व चतुर खेळगडी त्याच्या बरोबर ह्या बागेंत

कधीं कधीं येत व त्या मुलींत त्याच्या बरोबर खेळत. यांच्या खेळांत आणि पुष्पफळांच्या अथवा इतर मिष्टान्नाच्या वांटणींत वगैरे सामंतकन्येनें बाप्पाबद्दल सहजगत्या दाखविलेल्या पक्षपातानें प्रेमाचीं भांडणें होत. थट्टा होई. चुरस वाढे. कधीं कधीं हुमरीतुमरीवरही येत असे. त्यामुळें बाप्पाचें व सामंतकन्येचें प्रेम जास्त जास्तच वाढत गेलें. तों तों त्याची थट्टा मस्करी जास्तच होऊं लागली. बाप्पा जरी यावेळीं सरासरी अकरा वर्षांचाच असेल तथापि त्याचें शरीर चांगलेंच कसलेलें, पिळदार व पुष्ट दिसत असून तो चांगला षोडशीच्या बाहेरच्या तरुणाप्रमाणें दिसत असे.

एके दिवशीं या मंडळाचे बालिश खेळ इथपर्यंत जाऊन पोंचले कीं बाप्पाच्या खेळगड्यांनीं व सामंतकन्येच्या दासीगणांनीं या दोघांचें लुटेपुटीनें लग्न लावलें; त्यांच्या वस्त्रास गांठी दिल्या आणि त्यांजकडून आम्र वृक्षास पांच प्रदक्षिणा करविल्या. नंतर सर्वांनीं त्या दिवशींच उपहार फलाहार वगैरे आटोपला. असो! हा प्रकार होत आहे तों इकडे बाळो वगैरेंची ईडरच्या भिल्लराजावर स्वारी करण्याची मसलत बरीच पूर्णत्वास आली होती ह्मणून बाप्पानें लक्ष आपल्या त्या जन्म शत्रूस शरण आणण्याचें कार्य उरकण्याकडे वेधलें. त्यानें त्याप्रमाणें सर्व तयारी केली आणि सामंतकन्येच्या स्नेहाचा या कामीं आपणांस फारच उपयोग होईल असें

जाणून त्यानें तिच्याकडून बरेच घोडे व कांहीं द्रव्य संपादन केलें. इकडे आपल्या साहशानेंही चांगलीच तयारी केली होती. त्यानेंही ठाकूरपुत्र **सामरसीस** भर देऊन चांगलें पांच हजार सैन्य घेऊन **बाप्पाची** पाठ राखण्याची सिद्धता करविली. **बाळो**, देव व **बाप्पा** यांनीं सुमारें पांचशें तरुण बांड गडी तयार केले होते. याप्रमाणें तयारी होतांच **बाप्पानें** आपलें उपास्य दैवत श्रीएकलिंग व गुरुजी **हारीत** ऋषि यांनीं सांगितलेल्या सुमुहूर्तावर आपल्या शत्रूवर स्वारी करण्यासाठीं प्रयाण केलें.

---

## प्रकरण १५ वें.

याकाळीं सार्वभौमपदाचा मान उज्जन येथील **प्रमार** वंशाकडे होता. या प्रमारांची सत्ता विशेष विस्तृत नव्हती. तथापि बरीच होती. उज्जन व चितोर या दोन ठिकाणीं त्यांची राजधानी असे. राजाधिराज कधीं उज्जनीस तर कधीं चितोडास राहात असत. सध्यांचा प्रमाराधिपति उतार वयाचा असून त्यास औरस पुत्र नव्हता. **बाप्पाची** आई ही या प्रमारकुळांतीलच होती. आर्यावर्तांतील सर्व राजे या प्रमाराधिपतीस सार्वभौमत्वाच्या मानाबद्दल नियमित नाहीं तरी कधींकधीं थोडी फार खंडणी देत असत.

**बाप्पा** व **बाळो** वगैरेंनीं ईडरपतीस जिंकण्याचें कारस्थान रचण्याच्या कामांत ज्या कांहीं अनेक गोष्टींची

अनुकूलता करून घेतली होती त्यांतच साधेल तर प्रमाराधिपतीकडून त्यास शह देण्याचीही क्लृप्ति योजून ठेविली होती. व त्या कार्याच्या साधनास स्वतः बाप्पाच लागला होता. त्याच्या सुदैवानें त्याला विशेष खटपट न पडतांच काम झालें. प्रमाराधिप या प्रसंगीं उज्जनीहून चितोडास चालला होता. त्यास अर्थातच मृगयादिकांचा छंद फार होता. राजे लोकांस आपलें राज्य राखण्याकरितां नेहमीं अत्यंत तत्पर असण्याची जरूरी भासेनाशी वाटली ह्मणजे त्यांचे हे छंद फारच वाढत असतात. शिवाय त्यांच्या सभेंत राज्यकारभारापेक्षां, कारस्थानादिकांच्या विचारापेक्षां क्षुल्लक बाबतींचाच खल होत राहतो. साहसी, चपल, समयसूचक अथवा विनोदी असल्या तरुणांस तेथें जाऊन आपली वाटेल तशी छाप बसवितां येते. नेहमीं त्यांच्या सभेंतून मनोरंजक, चमत्कारिक क्रीडा विक्रम करणाऱ्यांचेच पोंवाडे चाललेले असतात. अशा स्थितींत बाप्पाच्या मंडळास प्रमाराधिपतीस वश करतां येण्यास फारसे आयास करण्याची जरूर नसावयाचीच. ईडरच्या सरहद्दीवरून प्रमाराधिपतीची स्वारी चालली असतां त्यांनीं त्या शिकारीमंडळीचा स्नेह संपादिला. त्यामुळें त्यांस आपले दिवस चैनींत घालवितां आले. प्रमाराधिपतीसही या नव्या मंडळींचें साहस आणि चमत्कार पाहून व ऐकून मोठी करमणूक होऊं लागली.

असें चाललें असतां एक दिवस असा चमत्कार झाला. शिकारीच्या नादांत एका हरिणाच्या मागें लागून प्रमोराधिप आपलीं माणसें सोडून बराच लांब गेला. बाप्पा वगैरेस असलीच संधि पाहिजे होती. त्यांनीं त्याची पाठ राखिली होती. परंतु ती मंडळी त्याच्या पासून अशा अंतरानें आणि लपत छपत चालत असे कीं आपल्या पाठीवर कोणी आहे असें त्यास मुळींच भासूं नये. त्या हरिणानें राजास फारच खेळविलें. व संध्याकाळच्या सुमारास राजा एका अत्यंत बिकट जागीं अगदीं अडकल्या सारखा झाला. त्याचीं माणसें फारच लांब होतीं. त्यांना आपले महाराज कोणत्या दिशेला आहेत ह्याचाही अंदाच नव्हता. आपल्याकडून ते त्रिखंड शोधीत होते. परंतु उपयोग काय? अस्तु! अशी स्थिति झाली असतां बाप्पा मंडळानें एक पडकें झोंपडें पाहून त्यांत मोठ्या लीनतेनें राजास विश्राम घेण्यास विनंति केली. त्या झोंपड्यांत त्यांनीं त्याची खाण्यापिण्याची वगैरे उत्तम व्यवस्था केली.

या कामावर देवाची नेमणूक करण्यांत आली होती. त्यानें शुद्ध धनगरी वेषानें हें काम पार पाडावें असें पूर्वीच ठरलें होतें. बाप्पा व वाळो हे तेथून कांहीं अंतरावर डोंगराच्या दरींत राहिले होते.

इकडे दाहिरपुत्र व सामरसी यांचा बाप्पामंडळाचा माग सुटून ते अगदीं चिन्ताक्रान्त झाले होते. कारण

आज आठ दहा दिवसांत त्यांच्या हेरांस बाप्पाकडील कांहींच बातमी नव्हती. तेव्हां त्यांना असें वाटलें कीं न जाणों कदाचित् अविचारानें या अल्लड व द्वाड मुलांनीं ईडरच्या हद्दींत जाऊन कांहीं आवाडाव केली असून तीं सर्व त्या भिल्लांच्या तर हातीं सांपडलीं नसतील ना? असा विचार येतांच त्यांनीं कांहींही होवो ईडरावर स्वारी करून या गोष्टीचा छडा लावण्याचा निश्चय केला आणि ते त्या कृत्यास पुढें झटकले.

इकडे सकाळ होतांच बाप्पामंडळानें एक सिंह हुसकून राजाधिराज जों बाहेर पडतात तों थेट वनराजाची स्वारी त्यांच्या पुढें यावी अशी तजवीज मोठ्या हिकमतीनें करून राजाधिराजांस त्या सिंहाच्या शिकारींत गुंतविलें. राजाधिराजाचे सैनिकही रानोमाळ त्यास शोधीत असलेले हळूहळू या भागांत संचारूं लागले व आपले महाराज फिरून आजही सिंहाच्या महा बिकट शिकारींत मग्न झालेले पाहून जरा जास्तच हिरमुसले. बाप्पामंडळानें प्रमाराधिपास वनराजाच्या शिकारीबद्दल चांगलाच पीळ भरला असल्यानें सैनिकांस आपल्या यजमानास त्या कृत्यापासून परावृत्त करतां न येऊन त्या कामीं त्यांना उलट त्याची इतराजी मात्र संपादावी लागली. बाप्पा व बाळो यांनीं राजाची चांगलीच पाठ राखून प्रसंगीं आज त्याची पूर्ण प्रीति संपादावयाची असा निश्चय

केला होता. ते बुद्धिपुरस्सरच त्या सिंहामागें वृद्ध महाराजांस बिकट स्थानीं घेऊन जात होते.

याच भागांत आदिगोरखनाथांचा मठ होता. बाळोवगैरेस त्याची चांगली माहिती होती. ह्या मठाच्या आसपासचा प्रदेश फारच विलक्षण असून हिंस्र पशूंनीं भरलेला असे. नाथ व त्यांचे योगनिष्ठ शिष्य यांच्या वांचून त्या प्रदेशांत कोणाही मनुष्याचा कधींही संचार होत नसे. तें स्थान अत्यंत भयंकर व योगसिद्धीनें भारलेलें आहे अशी सर्वत्र समजूत असे. तात्पर्य काय कीं, वनराजाच्या पाठशालांत प्रमाराधिप व त्याचे कांहीं सैनिक आणि त्याचे हे साहसी अनुचर बाप्पा, बाळो वगैरे ह्या योगवाटिकेंत येऊन दाखल होताच व्याघ्रादिकांनीं चहूंकडून आपलीं भयंकर दर्शनें देऊन या मंडळीस भिवडावयाचा क्रम सुरू केला. वनराजास हें स्थान फारच आवडलें व आपण आतां खास ह्यास चित करूं असें प्रमाराधिपासही वाटलें. त्यानें त्याची लगट केली. इतका वेळ आपल्या शिकारीच्या इच्छेनें आपला पाठलाग होत आहे ह्याची त्यास ओळखही पटली नव्हती. परंतु आतां ती पटतांच त्यानें आपलें उग्र स्वरूप दाखवून राजाधिराजावर झडप घातली. राजाधिराजांनीं आपलें शरसंधान पुष्कळ जोरानें व जलद चालविलें तथापि तिकडे मुळींच लक्ष न देतां सिंहानें आपल्या शत्रूस भिडण्याची लगट केली. प्रमाराधिपाचें अवसान सुटत चाललें. त्यास

आपला मृत्यु दिसूं लागला. इतक्यांत बाप्पानें स्वतां त्या सिंहास अशा सफाईनें आणि तडफेनें एक वार केला कीं त्यासरसा तो क्षणैक अगदीं शक्तिहीन झाला, परंतु लगेच त्यानें बाप्पावर लगट केली. बाप्पानेंही त्याला चांगला अंगावर येऊं देऊन एखाद्या मल्लाप्रमाणें त्याशीं द्वंद्व चालविलें व त्याला आजूबाजूंनीं मोठ्या कुशलतेनें घायाळ करून जिवंत पकडण्याची तजवीज केली. हा बाप्पाचा पराक्रम पाहून प्रमाराधिपास फारच कौतुक वाटलें. बाप्पासारखें रत्न आपल्या पदरीं असावें असें वाटून आपली तशी इच्छा त्यानें बाप्पास कळविली. परंतु बाप्पानें त्या गोष्टीबद्दल विशेष आतुरता न दाखवितां उडवा उडव करून संभाषणाचा ओघ भलतीचकडे न्यावा. होतां होतां बाळो वगैरेकडून बाप्पाची सर्व हकीगत प्रमाराधिपास कळल्यावर सहजगत्या बाप्पा हा ईडरपति आपला मांडलिक व दोस्त असून आज पदच्युत झाला असल्याचें ऐकून प्रमारास फारच वाईट वाटलें. शिवाय बाप्पाची आई ही आपल्याच प्रमारकुलांतील राजकन्या असल्याचेंही त्यास स्मरतांच तो बाप्पास विशेषच प्रेमानें वागवूं लागला. शेवटीं "तुझ्या बापाच्या शत्रूस पादाक्रांत करण्याच्या कामीं तुला जें सहाय्य लागेल तें आह्मीं मोठ्या आनंदानें करतों, माग किती सैन्य व द्रव्य तुला पाहिजे तें" असा अगदीं उघडा उघडा सवाल प्रमाराधिपानें बाप्पास केला व बाप्पानेंही

ही संधी फुकट न दवडतां 'पांच हजार सैन्यानिशीं आपल्या सेनाधिपतींनी माझी केवळ पाठ मात्र राखावी' प्रत्यक्ष युद्ध वगैरे सर्व आपण स्वतांच करणार व स्वतांच ईडरपतीस शृंखलाबद्ध करून आणणार' असें सांगून व हें काम उरकल्यावर 'आपण चितोडास आनंदानें राजसेवा पतकरण्यास येऊं' असें वचन त्यानें प्रमराधिपास दिलें. प्रमारानेंही आपल्या सेनापतीस योग्य तो हुकूम दिला आणि सर्व मंडळी आपापल्या मार्गास लागली.

---

## प्रकरण १६ वें.

सोळंखी कन्या प्रभावती व **बाप्पा** यांचा विनोदाचा लग्नसोहळा वाचकांस आठवतच असला पाहिजे. त्यानंतर आतां मध्यें बराच काळ गेला आहे. मुलींच्या वाढींत व एकंदर मनःस्थितींत दहा वर्षांपासून पुढील चार पांच वर्षांत फारच फेरबदल होत जातो. त्यांच्या अल्लडपणाला हळू हळू आळा बसून विनय, मर्यादा इत्यादिकांची झांक त्यांच्या स्वभावांत मारूं लागण्याचा आरंभ दहा वर्षांच्या पुढें कितीही लवकर झाला तरी तें सृष्टिक्रमास उचितच होय. संसारसंबंधीं विचार या वयापुढें वाटेल तेव्हां आणि अगदीं क्षुल्लक कारणांवरून किंबहुना निष्कारण सुद्धां त्यांच्या मनांत शिरूं लागतात व त्यांच्या उल्हासांत

चिन्तेची मिसळ करतात. आपणांस लवकरच येणारी परतंत्रता सुखावह कोणत्या रीतीनें होईल याबद्दलचे विचार मुलींच्या मनास बारा वर्षांच्या आंतही डाचूं लागल्यास कांहींएक नवल नाहीं. कारण आपल्यास पुरुषाच्या स्वाधीन होऊन अनन्य भावानें त्याची सेवा करून राहावयाचें आहे असें त्यांस साधारण समजूं लागतांच कळलेलें असतें. त्यांचें तें कळणें पुस्तकी विद्येप्रमाणें अळणी असतें. त्या कळण्यानें त्यांस आपल्या जबाबदारीची ओळख पटलेली थोडीच असणार आहे? परंतु कळलेलें असतें हें खास आणि आपणांस जन्मभर ज्याच्या आश्रयानें राहावयाचें तो चांगला सुस्वरूप असावा, आपणांस सुख देणारा असावा, आपणांशीं समवयस्क असावा, उगाच पाहतांच भेडावणारा, फाजील, पोक्त वगैरे नसावा अशा प्रकारें कांहीं कांहीं अर्धवट विचार मुलींच्या मनांत दहाव्या वर्षापासूनच चालतात. **प्रभावती** आतां दहा वर्षे उलटलेली होती. विशेष उफाड्याची व तीव्र असल्यानें तिला जगांतील गोष्टींबद्दल एक प्रकारचा चौकसपणा प्राप्त झाला होता. तथापि ती अत्यंत अल्लड आणि उल्हासी असल्यानें वरील प्रकारचे मनसारामाच्या किंचित् आड येणारे विचार आजपर्यंत तिच्या मनास कसेही शिवले नव्हते. शिवाय ती का गरीब आईबापाची मुलगी होती? चांगल्या मांडलिक राजाची एकुलती एक अत्यंत लाडकी अशी ती होती. इतकें सर्व खरें परंतु

**बाप्पा** व ती यांची भेट होईनाशी झाल्यापासून हा सर्व रंग पालटला होता. **बाप्पास नागडा** सोडून आतां चांगले तीन चार महिने झाले होते. **बाळो देव्या** वगैरे सर्व मंडळी त्याजबरोबर होती. इकडे **प्रभावतीला** आपल्या मर्दानी खेळांत वरचेवर नवा रंग व नवीन उत्साह भरविणारा समवयस्क असा कोणीच खेळगडी मिळेनासा झाला. तिच्या दासींपैकींही कांहींच्या चित्तवृत्ति या **बाप्पा**मंडळीनें आपल्या बरोबरच हिरावून नेल्या असल्यानें त्यांच्यानेंही **प्रभावतीचें** मनोरंजन करवेना. तिच्या दासींत एक **रोहिणी** नांवाची मुख्य दासी होती. ती तर स्वरूपानें प्रभावतीस सुद्धां लाजवील अशी असून तिच्यापेक्षां दोन वर्षांनीं वडील ह्मणजे आतां तिला तेरावें वर्ष होतें. मोठी चतुर, अत्यंत विनोदी आणि चलाख. केवळ सुतानें स्वर्गास जाणाऱ्या त्या रोहिणीनें **बाप्पा** वगैरेंसही हां हां ह्मणतां चकवावें; आणि त्याचा हशा पिकवावा. **बाप्पाशीं** तर ती इतकी लडिवाळपणानें वागत असे कीं कांहीं पुसूंच नये. कधीं कधीं तिच्या त्या तशा वागण्याचा **प्रभावतीस** हेवा वाटे. ती तिला त्यावरून टाकूनही बोलत असे. पण ही **रोहिणी** असली समयसूचक आणि गोडबोलणारी असे कीं तिनें एकच शब्दासरसें **प्रभावतीचें** तोंड बंद करावें इतकेंच नव्हे तर त्याजबद्दल तिला एक समयावच्छेदानें लाज व कौतुक वाटून तिनें खुद्कन् हसावें आणि मान खालीं

घालावी, कीं लगेच या रोहिणीनें इकडे बाप्पाची थट्टा सुरू करावी व त्या भरांत त्याला फिरून आपल्यास वाटेल तसे चाळे करण्यास लावावें. हा तिचा क्रम-असल्यामुळें **प्रभावती** व **बाप्पा** हीं दोघेंही तिच्या हातां-तील केवळ खेळणीं झालेलीं असत. तरी **प्रभावतीस** तिच्या भडभड्या स्वभावानें यांत कांहींच विचारणीय असेल असें वाटूं दिलें नव्हतें. शिवाय **रोहिणीही बाप्पा** असतांना जशी खुलत असे आणि कौतुकास्पद विनोदादि करून कधीं त्यास हंसविणें किंवा कधीं प्रेमकलहास आणणें अथवा आपणच दोघांवरही रुसून त्यांना भिवविणें वगैरे गोष्टी करीत असे तशा ती अलीकडे अगदींच करीनाशी झाली होती. तिच्या मुखावरील टवटवी सर्व थिजली होती. तिची विनोदशैली तिला सोडून कुठें लांब गेली होती. एकंदरींत ती आपल्या सर्वांचें ह्मणजे **प्रभावतीचें** मनोरंजन करण्यास अगदींच असमर्थ झाली होती. इतर दासी बोलून चालूनच इजपेक्षां व **प्रभावती**-पेक्षां कितीतरी मद्द आणि अगदीं सामान्यापैकीं अस-ल्यानें त्यांची मुळीं ताकदच नव्हती प्रभावतीची करमणूक करण्याची. सारांश काय **प्रभावतीस बाप्पामंडळ** नाहींसें झाल्यापासून प्रत्येक दिवशीं वाढतें एकलकोंडेपण अनु-भवण्यास लागून तिच्या मनास **बाप्पाचें** अदर्शन फारच जाचूं लागलें. कोणत्याही खेळाकडे, खाण्यापिण्याच्या वगैरे हरएक उपभोगाच्या वस्तूकडे तिचें लक्ष वेधेनासें

झालें. ती चिरचिरी आणि तिरसट बनूं लागली. याचा परिणाम चाकर माणसांवर, विनाकारण तोंड टाकणें, वडीलधाऱ्या माणसांशीं मनमोकळें करून न बोलणें, कोणाचेंच कांहींही केलेलें न आवडणें असा होत जाऊन ती दासदासींच्या व चाकरमाणसांच्या भीतीस आणि मातापितरांच्या चिंतेस कारण झाली. आईबापांनीं इला कांहीं अंगरोगाची अथवा इतर कसली बाधा तर झाली नसेलना ह्मणून वैद्य, जोशी, सामुद्रिक जाणणारे, त्याचप्रमाणें पंचाक्षरी, मांत्रिक वगैरेंस दाखवून तिच्या असुखाचें कारण शोधून त्याचा प्रतिकार करण्याचे उपाय अनेक योजिले. परंतु कोणताही गुणावह होईना. त्यांतच तिच्या लग्नाचेही विचार कधीं कधीं चालूं लागले. या सर्वांचा परिणाम तिची बिघडलेली घडी जास्तच बिघडविण्यास कारण होऊन ती विशेषच त्रासिक बनली. विशेषेंकरून आपल्या लग्नाचे विचार चालल्याची बातमी तर तिला फारच दुःख देत असे. कारण ते विचार चालल्याचें ऐकतांच तिला त्या विषयाचा परिचय होऊन तिची कल्पना व तज्जन्य विचार चालू झाले आणि त्या बरोबरच बाप्पाशिवाय इतराच्या संगतींत आपणांस सुख होणार नाहीं हा तिचा ग्रह दृढ होत गेला व शेवटीं तिला असें आढळून आलें कीं आपलें मन कधींच आपल्या ताब्यांतून पार गेलें असून तें बाप्पाचें झालें आहे व त्या बरोबरच त्या मनाचें वसतिस्थान जें आपलें शरीर तेंही

बाप्पावाचून इतराचें कधींही होणार नाहीं. अशीच हुबेहूब स्थीति तिच्या मुख्य दासीची ह्मणजे रोहिणीचीही झालेली होती. आणि हें बिंग त्या दोघीही जों जों एकमेकीपासून लपविण्याचा प्रयत्न करीत तों तों तें एकमेकींस जास्तच उघड होत जाऊन त्यांच्यांत परस्पर प्रीति अथवा सेव्यसेवक भाव यास रजा मिळून मात्सर्याचा उगम झाल्यामुळें त्या एकमेकींस विशेषच अप्रिय होत चालल्या. तों एक दिवस आपली आई आपल्यास सुख लागावें ह्मणून अनेक तऱ्हेनें मोठ्या वत्सलभावानें आपला वाटेल तो आळ आपण मन मोकळें करून सांगतांच पुरविण्यास अगदीं तयार आहे असें पाहून हळूच प्रभावतीनें तिज जवळ आपणांस अंबाभवानीच्या दर्शनास जाण्याची फार हौस आहे ह्मणून कळविलें; आणि तिच्याकडून बापाचें मन वळवून तिनें आपली प्रवासास निघण्याची सिद्धता करविली. उद्देश इतकाच कीं हरएक प्रकारें बाप्पाची गांठ घ्यावी.

इकडे सामरसी व दाहिरपुत्र यांनीं ईडरपतीबरोबर बुद्धिपुरस्सर कटकट सुरू केली होती. त्याच्या यांच्या लोकांच्या रोज चकमकी झडूं लागल्या. कधीं सामरसी तर कधीं दाहिरपुत्र याप्रमाणें सेनाधिपत्य स्वीकारून मोठ्या शर्तीनें ईडरवर चालून जात. परंतु त्यांस यावें तसें यश न येऊन फिरून फिरून विश्रांति करितां आणि अन्नादिसामुग्री करितां माघार घ्यावी लागत असे. असें चाललें आहे तों इकडे

बाप्पामंडळ पांच हजार प्रमार सैन्यानिशीं ईडरच्या मैदा-नांत येऊन धडकलें. बाप्पानें आपण महाराजाधिराज सार्वभौम प्रमारकुलेशाकडून कांहीं राजकारणी मसलतीस आलों आहों ह्मणून कळविण्याकरितां एक ब्राह्मणसचिव ईडरेशाकडे आधींच पाठवून दिला होता. त्यामुळें घावरून जाऊन येणाऱ्या सार्वभौम सेनापतीचा आदर करण्याकरितां ईडरपति सिद्धच होता. बाप्पानें आपल्या सैन्यापैकीं एक हजार सैन्य बाळोच्या हातीं व एक हजार सैन्य देवाच्या हातीं देऊन त्यांस मुख्य वेशीच्या दोन बाजूं-कडे असण्याबद्दल व आपण इशारा करतांच हल्ला चढविण्याबद्दल ताकीद केली होती. ईडरच्या समीप येतांच सामरसी व दाहिरपुत्र हे तेथें असून यांची व ईडरपतीची दिसा दो दिसां सारखी झडत असल्याचें वर्तमान बाप्पास कळतांच त्या दोघांसही तो भेटला आणि अत्यंत आदरानें आणि नम्रतापूर्वक त्यांनीं उरलेल्या चवथ्या बाजूस युद्धाच्या तयारीनें असावें असें ठरवून आपण स्वतः निवडक लोकांनिशीं महाराजाधिराजाचा एक सरदार अशा थाटानें मुख्य वेशींतून आंत शिरण्याच्य इराद्यानें चालला. तों इतक्यांत कोणी भेद्यानें ईडर पतीच्या मनांत दगा असल्याचा संशय उत्पन्न करून त्याजकरवीं बाप्पाच्या पुढें गेलेल्या सचिवास चतुर्भुज करविलें. ही बातमी मोठ्या चपळाईनें निसटून आलेल्या त्या सचिवाच्या एका चाकरानें बाप्पास देतांच त्यानें

एकलिंगाचें स्मरण करून एकदम चारी बाजूंनीं निकरानें हल्ला चढविण्याची तयारी केली आणि घटका अर्ध घटकेंत अघाडीच्या तुकड्या ईडरांत दाखल झाल्या. भिल्लांनीं नगरांत व वेशीवरही आपली लढण्याची कमाल केली. परंतु कांहीं इलाज चालेना. जेथें तेथें त्यांस मार खावा लागून त्यांचे शेंकडों हजारों मुडदे पडूं लागले. **बाप्पा, बाळो**, देव आणि **सामरसी** व **दाहिरपुत्र** हें पंचक अगदीं राजवाड्याजवळ येऊन ठेपलें. भिल्लाधिप आपल्या पुत्रबांधवांसुद्धां केशरी पोषाख करून वाड्यास आग लाऊन यांच्याशीं लढण्यास बाहेर पडला. हे सर्व वीर घे घे मार करीत एकमेकांवर शस्त्रास्त्रांचे घाय करूं लागले. तुंबळ रण माजून राहिलें. कोणी कोणासच आवरेना. मेघाप्रमाणें बाणांची वृष्टि होत होती. **बाप्पास** अनेक जखमा लागल्या होत्या. त्याचप्रमाणें इतरांचींही शरीरें रक्तबंबाळ झालीं होतीं. धुळीनें सर्व प्रदेश व्याप्त होऊन शत्रु, मित्र ओळखण्याची सुद्धां पंचाइत पडत असे. पायां खालीं हाडामांसाचा चिखल तुडवावा लागूं लागला. याप्रमाणें घनघोर हातघाईचें युद्ध सुरू झाल्यावर थोडक्यांतच पर्णें वगैरे गळून पडून असंख्य रक्तवर्ण पुष्पांनीं युक्त झालेल्या पळसाच्या झाडाप्रमाणें **बाप्पादि** वीरांचे देह शोभूं लागले. **बाप्पानें** महत्प्रयासानें थेट ईडरपतीस अगदीं निकट व समोरा समोर गांठून धनुष्यास आराम देऊन खड्ग पडताळला. त्यानेंही सावधानें

बाप्पाशीं चार हात करण्याची सिद्धता केली. दोघांचे परस्परांवर खड्गप्रहार होऊं लागले. दोघेही आपल्या चपळाईची कमाल करून परस्परांचे घाय चुकवीत असत. असें चाललें असतां ईडरपतीच्या दोघां पुत्रांनीं बाप्पावर दोन बाजूंनीं लगट केली. बाप्पा या तिघांसही दाद न देतां सुदर्शन चक्राप्रमाणें आपलें खड्ग फिरवून स्वताचें संरक्षण करीत होता. तों इतक्यांत बाळो व दाहिरपुत्र हे दोघे दोन बाजूंनीं ईडरपतीच्या पुत्रांवर चालून आले; व असामीस असामी असा सामना चालू झाला. थोड्याच वेळांत दुःशासनाच्या छातीवर जसा भीम तसा ईडरपतीस त्याचें शस्त्र पाडून एकदम बिलगून बाप्पानें जमिनीवर उताणा घातला व आपण त्याच्या छातीवर पाय देऊन उभा राहिला. हें पहातांच अतिशय संतापून आपल्या सामनेवाल्यास सोडून त्या भिल्लाच्या दोन्हीं पोरांनीं बाप्पावर जीवावर उदार होऊन हल्ला केला. पण व्यर्थ.

त्या तिघांसही बाप्पा व बाळो वगैरेनीं जिवंत पकडलें व ईडरवर बाप्पानें आपलें निशाण फडकाविलें; आणि तो पितृऋणांतून मुक्त झाला.

---

## प्रकरण १७ वें.

बाप्पाची भेट घेण्याचे उद्देशानें अंबाभवानीच्या दर्शनाचें मिष करून प्रवासास निघणाऱ्या प्रभावतीचा संकेत

सिद्धिस जाण्यास आकस्मिक एक अडचण उत्पन्न झाली; आणि त्या अडचणीनें तिला फारच चिन्ता व क्लेश सोसावे लागले. तिची मुख्य दासी रोहिणीही आयत्या वेळीं कोठें नाहींशी झाली. शिवाय त्याच दिवशीं तिच्या बापाकडे एक नामांकित सामुद्रिकवेत्ता कांहीं संभावनेच्या आशेनें आला होता. त्याचे विद्याचमत्कार पाहण्यासाठीं आपल्या मुलीचाच हात त्याला दाखविण्याचें सोळंखीनें मनांत आणलें. त्याप्रमाणें तो प्रयोग चालला असतां त्या जोशानें प्रथमच ' या मुलीचें लग्न झालेलें असलें पाहिजे ' असें सांगितलें. तें वाक्य ऐकतांच प्रभावतीचा चेहरा खाडकन् उतरला; व तिच्या मनांत अनेक परस्पर विरुद्ध कल्पनांनीं काहूर करून सोडला. सोळंखीला तर पंडितजी कांहीं तरी बरळताहेत असें वाटलें. परंतु पंडितजींनीं आपण या गोष्टीची चांगली चौकशी करावी. मी सांगतों ही गोष्ट कालत्रयीं खोटी ठरणार नाहीं' असें फिरून सांगितलें. तेव्हां तर प्रभावतीनें रागाचा झटका दाखवून तेथून पायच काढला. परंतु तिच्या बापानें तिला ' परत फीर ' ह्मणून दरडावून सांगितल्यामुळें तिचा नाइलाज झाला. तों पंडितजींनीं ' आपल्या या कन्येचा नवरा महाभाग्यशाली चक्रवर्ती होईल ' असेंही सांगून टाकिलें; आणि ' महाराजांनीं या कामीं रागाच्या आधीन न होतां ज्याच्या त्याच्या कलाप्रमाणेंच चौकशी करावी. गोष्ट फार वेळ गुप्त राहणार नाहीं. आपल्या

नांवालौकिकास अनुचित असें कांहीं नाहीं.' याप्रमाणें नरा धीराचीं वाक्यें उच्चारून पंडितजी स्तब्ध बसले. पुढें विशेष श्रमावांचून सर्व कांहीं दासी व खेळगड्यां-कडून बाहेर पडलें. रोहिणीचा बराच शोध झाला परंतु ती कोठें सांपडली नाहीं. सोळंखीरावास बाप्पाच्या कृतीचा प्रथम फार राग आला व त्या झटक्यांत त्यानें बाप्पास धरून आणण्याचा हुकूम केला. दासीजनास राजवाडा बंद झाला हें उघडच आहे. परंतु बाप्पा कसला त्याच्या हातीं लागतो. त्याचे हेर मना चतुर होते. त्यांनीं त्यास सर्व बातमी दिली. इकडे रोहि-णीही जी नागड्याहून नाहींशी झाली ती मोठ्या प्रयासानें ईडरास जाऊन पोंचली. तों बाप्पामंडळ ईडरची सर्व व्यवस्था करून तेथील भिल्लराजास प्रतिबंधांत ठेऊन त्या प्रांताचा अधिकार तूर्त बाळोकडे सोंपवून आपल्या इतर साथीदारांसह निघून चितोडास गेलें होतें. तेव्हां रोहिणीची अत्यंत निराशा झाली. तथापि तिच्या वि-नंतीवरून व पूर्वींचा स्नेह मनांत आणून बाळोनें तिला मोठ्या इतमामानें चितोडास पोंचविण्याची तजवीज केली.

इकडे बाप्पालाही ईडरचें कारस्थान उरकून मनाला जरा स्वस्थता मिळतांच प्रभावतीच्या क्रीडोद्यानांतील सुखाची व एकंदर सर्व चेष्टांची आठवण होऊन त्याचें मन विकार पावूं लागलें. त्याला कधींच न अनुभवलेले असे कांहीं चमत्कारिक भास होऊं लागले, त्याला आतां राजाधि

राजाच्या उजव्या हाताकडे बसण्याचा मोठा मान मिळाला होता. पांच हजार सुवर्णमुद्रा प्रतिमासास त्याला वेतन मिळत होतें. प्रमारराज या आपल्या तरुण हस्तकावर इतका सुप्रसन्न होता कीं कोणतीही गोष्ट याच्या विचारावांचून तो करीत नसे इतकेंच नव्हे तर इतर सर्व सचिव आणि सामंत जनांच्या विचारा विरुद्ध जरी एखादी गोष्ट बाप्पानें सुचविली तरी ती राजाधिराज ऐकत असत. सारांश काय बाप्पा 'करील तें कारण आणि बांधील तें तारण' अशी स्थिति एक सहा महिन्याचे आंत चितोडास झाली. ही इतकी बाप्पाची तेथें छाप पडण्यास कारण बाप्पाच्या अंगचे लोकोत्तर गुण होत. ईडरच्या विजयाचें सर्व श्रेय बाप्पानें चितोडाधिपास अर्पण केलें होतें. शिवाय सिंहाच्या शिकारीच्या वेळचें बाप्पाचें धाडस आणि आपणावरील संकट त्या वृद्ध चितोडाधिपतीच्या ध्यानांतून नाहींसें झालें नव्हतें. या प्रमाणें बाप्पाच्या महत्वाकांक्षेस सारखें उत्तेजनच मिळत होतें. ह्मटलें ह्मणजे अशा स्थितींत त्याला कोणत्याही गोष्टीची चिन्ता किंवा दुःख असूं नये. परंतु प्रभावतीचें स्मरण त्याला अलीकडे अलीकडे फार दुःख देऊं लागलें होतें. तो मृगये करितां चितोड सोडून बराच लांबवर येत असे. त्या प्रत्येक प्रसंगीं आपण नागह्रदास जाऊन एकदां तरी आपल्या मैत्रिणीची भेट घ्यावी असें त्यास वाटे. परंतु प्रभावतीच्या दासींपैकीं

कोणीना कोणी तरी त्याला भेटून त्याचें मन त्या भाडसापासून परावृत्त करीत. या दासी प्रभावतीची जी हकीकत त्याला सांगत त्यावरून तर त्याचें मन विशेषच आतुर होत असे. कारण सोळखी-रावानें प्रभावतीस बहुतेक कारागृहांतच ठेविलें होतें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारागृहांत तरी तिला आपल्या मनाप्रमाणें वाटेल ते विचार करण्यास अथवा स्वस्थ निर्वेध पडून राहण्यास सांपडत होतें काय? छे. तेथें रोज नव्या नव्या राजपुत्रांच्या तसबिरी तिला दाखविण्यासाठीं पाठवीत असत आणि तिनें त्यांतील अमुक नको तर अमुक तरी पसंत करावा असा अनेक प्रौढ बायांकडून व कित्येक प्रसंगीं-वृद्ध सचिवांकडून तर कधीं कधीं स्वतः सोळखी-रावाकडून उपदेश चाले. जों जों हे असे तिचे छळवाद वाढत चालले तों तों तिचें मन बाप्पाबद्दल विशेषच कामुक आणि दृढसंलग्न होऊं लागलें. बाप्पाचा विरह तिला फार पीडा करूं लागला. ती देवाजवळ 'मला एकदा त्या प्राणमित्राचें दर्शन करीव मग लगेच आपल्या पायांशीं नेलेंस तरी चालेल' अशी प्रार्थना प्रतिक्षणीं करूं लागली. तथापि आपला प्राणमित्र येथें येऊन आपल्या पित्याच्या क्रोधाग्नीस बळी पडावा असें तिला एक क्षणभरही वाटलें नाहीं. या प्रमाणें आपणाकरितां आपली प्राणसखी झुरणीस लागल्याचें वृत्त ऐकून बाप्पाच्या मनाला महत्संताप होत असे. तो त्या संतापाच्या

भरांत 'काय वाटेल तें होवो. आपण हे असे जाऊन त्या प्राणसखीचें दर्शन घेणार व तिला बंदींतून मुक्त करणार' असें ह्मणून आपला घोडा सिद्ध करवी. परंतु त्यावरील हकीगत सांगणाऱ्या दासीजनांकडूनच लगेच त्याच्या प्राणसखीची विनंति—शपथपूर्वक मागणी—ह्मणून अशीं वाक्यें उच्चारिलीं जात कीं 'या अभागिनीकारितां आपण कोणतेंही साहस करूं नये. कारण जर कारितां आपण कांहीं साहस करण्यास सिद्ध व्हाल आणि तें मला कळेल तर त्या साहसापासून आपली पुढें होणारी दुर्दशा मला पाहण्यास लागूं नये ह्मणून मी पूर्वीच हें शरीर सोडून चालती झालेली आपणांस आढळेन.' हीं कराराचीं वाक्यें ऐकतांच त्याला फार उद्वेग होत असे. त्याचें मन द्विधा होऊन जाई. पण करितो काय? तोही परत 'तूं आपला हा हट्ट सोड, मी तुला कारागृहांतून सोडवीन. त्याविषयीं यत्किंचितूही भीति धरूं नकोस' वगैरे वगैरे आश्वासनाचा निरोप त्या दासींनीं आपल्या प्राणसखीस पोंचवावा ह्मणन त्यांची विनवणी करी. परंतु आपणास उलट निरोप पोंचवितां येणार नाहीं. असें त्या सांगत. तेव्हां तर त्याच्या दुःखास सीमाच नाहींशी व्हावी. आणि याचें कारण त्या असें सांगत कीं आह्मी एकदां ज्या इकडे आलों त्या फिरून नागड्याच्या हद्दींत पाऊलही टाकण्यास समर्थ नाहीं. सोळंखीरावानें आह्मांला आढळूं तेथें धरून

अंधार कोठडींत टाकण्याची आज्ञा सोडिली आहे. आपणामुळेंच आमच्यावर हा असा कहर गुजरला आहे. आपणच आमचें संरक्षण केलें पाहिजे. आपल्या यजमाननीच्या सेवेला तर अंतरलोंच. पण आतां त्या आमच्या जिव कीं प्राण **प्रभावती** बाईचे प्राणमित्र जे आपण त्यांची तरी सेवा आमच्या हातून घडावी हीच आमची या चरणाजवळ विनंति आहे' अशा प्रकारें त्याच उलट याच्या गळ्यांत पडत. तेव्हां त्यांचें सांत्वन करण्याचा व त्यांना द्रव्य वगैरे देऊन थोडी फार स्वस्थता करण्याचा बोजा त्याजवर पडूं लागला. याप्रमाणें दर खेपेला निरनिराळ्या दासी भेटत आणि त्या वरील प्रमाणें **बाप्पाच्या** गळ्यांत पडत असत.

**रोहिणीनें** चितोडास पोंचतांच तेथें एक सुंदर परंतु गांवच्या एका अंगाला असणारा असा बगीचा पाहून आपला तळ दिला; व हळू हळू तिनें तेथें आपली चांगली छाप बसवून ती **बाप्पाच्या** शोधास लागली. **बाप्पा** राहतो कुठें' करितो काय, जातो कुठें, कोणत्या नादांत आहे, लोक त्याला चाहतात किंवा त्याजवर रुष्ट आहेत, वगैरे इथ्थंभूत बातमी ती काढूं लागली. आपली व **बाप्पाची** भेट होऊन त्याजवर आपली चांगलीच छाप बसली पाहिजे तरच आपला हेतु सिद्धीस जाईल, नाहीं तर सर्वच फसेल अशी तिला फारच भीति वाटत असे. एवढ्या करितां होतां होईल तों आपली पूर्वीची ओळख

ज्यायोगानें त्याला एकदम पटणार नाहीं अशा तऱ्हेचें कांहीं तरी लोकोत्तर वेषान्तर करण्याच्या नादास ती लागली. त्याचप्रमाणें गाणें नाचणें वगैरे कलांचाही उत्तम परिचय करण्यानें आपणांस फारच उपयोग होईल असें वाटून ती त्यांचाही मनापासून अभ्यास करूं लागली. तिच्या सुदैवानें तिला त्या बगीच्यांतच एक अप्रतिम गुरुजीचा लाभ झाला. तिचा आवाज तर केवळ गंधर्व कन्येप्रमाणें प्रेमळ आणि मधुर होताच. शिवाय ती आतां बाल्यामधून निघून भर तारुण्यांत येत होती. त्यामुळें सहजच प्रतिदिवस तिच्या चेहेऱ्यामोहऱ्यांत फरक होत होता. तिचे सर्व अवयव नवीन तेज व नवीन वळण घेत होते. कांहीं अजून मुळींच गुप्त असलेले अवयव भाग आतां वर डोकावूं लागले होते. याप्रमाणें ही तारुण्यानें मुसमुसलेली, मदनानें शिकवून तयार केलेली क्षात्रभिल्लबाला किराती वेषांतील गिरिजेप्रमाणें दिसत असे. याप्रमाणें तिची सर्व तयारी झाल्यावर तिनें बाप्पाला म्हणजे आपल्या मनानें वरलेल्या प्रियकरास तो मृगये करितां भटकत असतां ऐन जंगलांत गांठण्याचा निश्चय करून ती तयारीस लागली. बाप्पालाही राजनगरवास घडूं लागल्यापासून सहजच गायननर्तन वगैरे ललित कलांपासून करमणूक करून घेण्याची चव लागली होती. त्याला गाण्याची तर चांगलीच आवड होती. तो स्वतांही गायनकलेचा आभ्यास कधीं कधीं करीत

असे. कारण आपणास हरएक कला आलीच पाहिजे असा त्याचा हट्ट असे.

**बाप्पा** बरोबर आपला साहसी **दाहिरपुत्र** चितोडास आला होता. **सामरसी** मात्र भंडेरगडावर परत गेला. देव ही **बाप्पाबरोबर** होताच. दाहिरपुत्रास सुद्धां **प्रमारराजानें** बराच मोठा अधिकार दिला होता, व **बा-प्पाच्या** विनंति वरून **बाप्पाच्या** पांचहजार घोडदळा-वरील **बाप्पाच्या** खालोखालचा मुख्य सेनापतीच त्याला बनविलें होतें. **देव्यास** एक हजारी बारनाईकी दिली होती. **बाप्पाचे** राजसभेंतील सर्व काम **दाहिर** व **देव्या** हेच करीत असत. याप्रमाणें क्रम चालला असतां दि-वसें दिवस **बाप्पा, प्रभावती** व **रोहिणी** या तीन त-रुणांची एकमेकांच्या प्रीतीबद्दलची उत्कंठा सारखी वाढत चालली आणि त्याबरोबरच **प्रभावतीचा** शारीरिक त्रासही वाढत चालला; व ती निराशेच्या मार्गांत प्रवास करूं लागली. **रोहिणीला** मात्र आपली मनःकामना पूर्ण होईल अशी वाढती आशा लागली; आणि **बाप्पाचा** उल्हासी स्वभाव अगदीं नाहींसा होत जाऊन तो चिंता-तुर, त्रासिक आणि चिरचिऱ्या व तिरसट होऊं लागला. याप्रमाणें एक संवत्सर पुरा लोटला असतां अकस्मात् एका गोष्टीनें फिरून तिसराच रंग या सर्व प्रकरणास दिला तो भाग आतां पुढील प्रकरणांत वर्णूं.

## प्रकरण १८ वें.

हिंदुस्थानांत आपला धर्म व आपली सत्ता स्थापित करण्याची मुसलमानी खलीफांची वाढती महत्वाकांक्षा आजपर्यंतच्या येवढ्या तेवढ्या पराभवांनीं कमी न होतां सारखी वाढतच होती. त्यांचे गुप्त हेर सर्व उत्तरहिंदुस्थानांत फिरत असत. शेंपांचशें, हजार दोन हजार अशा सैन्यानिशीं त्यांचे कांहीं धाडसी सरदार लूट मारही चालवीत असत. 'गाजराची पुंगी वाजली तर वाजली नाहीं तर मोडून खाल्ली' या नीतीचें अवलंबन करून सांपडेल तर देश नाहीं तर नुसतीच लूट असा प्रकार त्यांनीं चालू ठेविला होता. त्यांचीं लष्करें सिंध प्रांतांत चांगलींच पोसलीं जात व पंजाबांतही त्यांस निर्वेध वागावयास सांपडे. या दोन प्रांतांत त्यांची सत्ता बरीच दृढ झाली होती. तेथून हिंदूराजांच्या दरबारीं ते कित्येक प्रसंगीं जेठी, कसरती, चाबूक स्वार, घोड्याचे व्यापारी अशा अनेक तऱ्हांनीं भेद काढण्यास येत असत. हा ह्या लोकांच्या सुळसुळाटदर दिवशीं वाढतच होता. स्त्रियांच्या अब्रूवर हल्ला करणें ही तर ह्या जेठी वगैरेंची केवळ लीलाच असे. ते प्राणावर उदार असत. शिवाय अफगाणिस्थान, सिंध वगैरे कडील कांहीं बाटलेले क्षत्रियही त्यांस या कुचालीच्या कामांत व विश्वासानें भेद काढण्याच्या कामांत चांगलेच उपयोगीं पडत.

या लोकांचा एक तांडा ईडरपासून चितोडपर्यंतच्या हद्दींत आपलें काम चालवीत असे. ईडरच्या क्रान्तीची

खातमी कळतांच तेथील भिल्लराजाच्या लोकांस वश करून त्यांस त्यांचा राजा बंधमुक्त करण्यास सहाय्य करण्याचें मिष दाखवून तेथें भोंक पाडण्याची एका रस्तम नांवाच्या मुसलमानाची खटपट चालली होती. ह्याच्या जोडीस एक बाटलेला क्षत्रियही होता. हा क्षत्रिय **दाहिरच्या** प्रजे-पैकीं असून त्याचा डोळा **दाहिर**पुत्राच्या स्त्रीवर असे. त्याला **दाहिर**पुत्राची व त्याच्या स्त्रीची हकीगत कळली होती. शिवाय **बाप्पाचें** पराक्रमही या मंडळीस चांग-लेच कळले होते. तेव्हां हें मंडळ जरा थिजल्यासारखें झालें होतें. परंतु अलीकडे **बाप्पाच्या** मनः-स्थितीचा भेद कळून ह्मणा किंवा कसेंही ह्मणा, त्यांस पुनः हुरूप उत्पन्न झाला होता. **प्रभावतीचें** व **बाप्पाचें** प्रेमही यांस माहित होतें. तेव्हां त्या गौ-प्याचा उपयोग करून घेऊन **बाप्पास**, त्याचप्रमाणें भिल्लराजाची एक अत्यंत सुंदर उपवर कन्या होती तिच्या साहाय्यानें **बाळोस** व **दाहिर**पुत्राच्या स्त्रीवर संकट आणून त्यास, याप्रमाणें तिघांस गोत्यांत घालून साधल्यास **ईडर**पासून चितोडपर्यंतचा सर्व मुलूख आयत्या वेळीं सैन्य मागवून काबीज करण्याचा यांचा इरादा होता. यावेळीं खलीफाचा मुख्य सरदार महंमद नांवाचा होता. हा कनोजच्या हरचंदास जिंकण्याच्या इराद्यानें अगदीं जय्यत तयारीनें होता. रजपूत स्त्रिया बाटविण्याचें ह्याला वेडच असे. त्याला वाटे कीं क्षत्रिय स्त्रिया जि-

वचन दिलें होतें त्यामुळें त्यांचें मन त्यापासून परावृत्त होत असे. शिवाय त्याला नुकताच **प्रभावती**कडूनही 'मी आपली पराकाष्ठा करून स्वतांच कांहीं युक्ति काढून आपल्या चरणांच्या भेटीस येईन. आपण आपला जीव मात्र धोक्यांत घालूं नये' असा शेवटचा आश्वासनाचा निरोप आला होता.

इकडे **रोहिणी**ही आतां अगदीं अधीर झाली होती. तिला अजून आपल्या प्रारब्धाची कसोटी पहाण्याची संधिच मिळाली नाहीं. तिनें भगीरथ प्रयत्न चालविलें. आपल्या पूर्वीच्या मैत्रिणींपैकीं चार पांच जणींस तिनें आपल्या संगतीस आणविलें होतें; व त्यांच्या सहाय्यानें **बाप्पा**ची एकंदर दिनचर्या ती मिळवीत असे. तिनें शेवटीं एक दिवस आपण ज्या उद्यानांत राहत असे त्याची स्वामिनी एक वृद्धा असे तिची भेट घेऊन तिला आपली इत्थंभूत हकीगत कळविली. आणि तिच्या मनांत आपल्या भाषणांनीं मोह व प्रीति उत्पन्न करून तिच्याकडून तिनें कधीं तरी **बाप्पास** आपल्या घरीं बोलाविण्याची व्यवस्था करण्याचें वचन घेतलें व तो तेथें आला असतां त्याचा सर्व सत्कार व पाहुणचार त्या म्हातारीनें आपली अविवाहित एकुलती एक कन्या अशा नात्यानें **रोहिणी**च्या हातून करवावयाचा, व शेवटीं ही कन्या मी आपणांस अर्पण करितें, हिचा आपण स्वीकार करावा' म्हणून विनंति करावयाची. झालें, ठरल्याप्रमाणें म्हाता-

रीनें तो योग मोठ्या सावधगिरीनें जमवून आणला. वस्तुतः रोहिणीनेंच जमवून आणला. कारण बाप्पास केवळ एक बोलकी बाहुली मात्र होती. त्यावेळीं बाप्पाचें मन आकर्षण करण्याकरितां रोहिणीनें आपल्या चातुर्याची कमाल केली. आपल्या गायनानें व इतर सर्व चेष्टांनीं तिनें त्यास आपण केवळ स्वर्गांतच आहों कीं काय असाच भास केला. परंतु व्यर्थ. त्याचें मन रोहिणीबद्दल यत्किंचितही कामुक होईना. प्रभावतीनें त्याचें सर्व हृदय व्यापिलें होतें. त्यांत इतर स्त्रियेस जागा मिळण्यास स्थलच उरलें नव्हतें अशी रोहिणीची वालंबाल खात्री झाली. शेवटीं 'आपण अत्यंत प्रसन्न आहों. परंतु लग्ना संबंधानें आपणास सध्या कांहींच कर्तव्य नाहीं.' असें सांगून बाप्पानें रजा मागितली. बाकी रोहिणीच्या एकंदर चेष्टांनीं बाप्पाच्या हृदयाचा जरी भेद झाला नाहीं तरी त्यांनीं आपला थोडासा तरी संस्कार त्यावर केलाच. रोहिणीबद्दल एक नेत्रकर्णानंददायक तरुणी ह्मणून बाप्पाच्या मनानें शेरा मारलाच व तिच्या गायन कलेचा लाभ वरचेवर झाल्यास कांहीं वावगा नाहीं असेंही त्यानें आपल्याशीं ह्मटलें. रोहिणीची मात्र निराशा झाली. तथापि आपणांबद्दल आदर नसला तरी अनादर तरी खात्रीनें उत्पन्न झाला नाहीं हें त्या चाणाक्षीच्या लक्षांत आलें व आपण जर कांहीं युक्तीनें फसवून कां होईना बाप्पास वश करून घेऊं

तर पुढें त्याच्या संगतींत आपणास असुख लागण्याची भीति खास नाहीं इतका तिला भरंवसा पटला. आणि तिनें त्याप्रमाणें अन्य युक्तीनें त्याची वंचना करण्याचा विचार चालविला.

**रोहिणी**च्या घरच्या समारंभापासून **बाप्पाची** वृत्ति फारच अधीर झाली व आतां त्याच्यानें **प्रभावतीला** सोडविल्यावांचून राहणें अशक्य होतें. ह्मणून तो आपल्या मित्रांसह संकेत ठरवून तें कृत्य उरकण्याच्या तयारीस लागला. तों चितोडास खलीफाचा मुख्य सरदार महमद हा गुप्तपणें टेहेळणी करण्यास आलेला असल्याची बातमी त्याला लागल्यामुळें तिकडे त्याचें लक्ष वेधलें. या महमदानें आपले बहुरूपी साथीदार पांच पंचवीस त्या किल्यांत पसरून दिले होते. व ते निरनिराळ्या सोंगांनीं खेळांनीं आपणांकडे जन वेधीत असत. तों त्यांच्या टेहळणींत एक दिवस **दाहिर**-पुत्राची बायको आली व त्यांतील एका बाट्या रजपुताची ती लहानपणच्या ओळखीची असून त्याचा तिला वरण्याचा निश्चय झाला होता. तेव्हां तिला कसेंही करून पळविण्याचा विचार त्यांनीं चालविला. इकडे **बाप्पा** मंडळानें त्या टोळीपैकीं पांच चार इसमांस पकडून त्यांची चौकशी करून झाडे घेऊन त्यांस हेर ठरवून चांगल्याच शिक्षा ठोठावल्या व आपण आपल्या संकेताप्रमाणें नागड्यास जाण्याची सिद्धता केली. नागड्यास जा-

ण्याकरितां ते रात्रीचे निघाले होते. मध्यरात्रीच्या सुमारास त्यांच्यावर एकदम मुसलमानांचा हल्ला झाला. अंधेरां-तून शत्रू कोठें आहे याचाही उमज पडेना. शेवटीं मोठ्या शौर्यानें व धाडसानें त्यांनीं शत्रूंशीं लगट केली व त्यापैकीं पंधरा वीस असामी जीवंत पकडले व तितकेच इसमांचे मुडदे पाडले आणि इतकें होई तोंपर्यंत सकाळ झाल्यामुळें आणि कैद्यांची व्यवस्था करावयाची असल्यामुळें **बाप्पा**मंडळास चितोडास परतावें लागलें.

## प्रकरण १९ वें.

दिवाळीचे दिवस होते. **बाप्पा**च्या घरीं त्याच्या मोठेपणास योग्य अशा थाटाचा समारंभ होता. गाण्या नाचण्याकरितां अनेक नामांकित गवयी व वारवधू यांस आमंत्रणें होतीं. राजाधिराज **प्रमारेशा**सही समारंभास येण्याची विनंति केली होती. **प्रमारेशास** आणण्यास **बाप्पा** मोठ्या थाटानें सामोरा गेला. हत्ती, घोडे, मेणे, पालख्या, डंका, निशाणें, नौबती, मंगलवाद्यें वगैरे सर्व थाट फारच प्रेक्षणीय होता. **प्रमारेशा**ची स्वारीही आपल्या सार्वभौमत्वास साजे अशाच प्रकारची निघाली होती. भाट जनांची पाप लागून राहिली होती. भा-लदार, चोपदार ( वेत्रधारी लोक ) ललकारत होते. अशा प्रकारें दोन्ही स्वऱ्या समोरासमोर येऊन **बाप्पानें**

**प्रमारेशास** आपल्या वाड्यांत आणलें. सभामंटप फारच उत्तम शृंगारला होता. मजनीच्या पडद्यांनीं व किनखापी गाद्यांनीं आणि काश्मिरी उंची गालीच्यांनीं युक्त असें तें सभास्थान पाहून **प्रमारेश** सुप्रसन्न झाला. सर्व समारंभ आटोपल्यावर स्वारी परत चालली त्यावेळीं राजरस्त्यावर अनंत दीपावळी लाविल्या होत्या व तऱ्हतऱ्हेचें दारूकाम सोडण्यांत येत होतें. **बाप्पानें** या दारूकामांतील चिनी व्यापारी व ईतरही दूरदूरच्या प्रदेशच्या व्यापाऱ्यांकडून फारच चमत्कारिक चिजा पैदा केल्या होत्या. तारे, बाण निरनिराळ्या रंगाचे सुटत होते. ह्या धांदलींत **प्रमारेशाचा** मस्त हत्ती बुझून सैरावैरा धांवूं लागला. **बाप्पानें** लगेच मोठ्या प्रसंगावधानानें **प्रमारेशास** त्याच्या अंबारीमधून अचानक उचलून दुसऱ्या अंबारींत बसविण्याची तजवीज केली. स्वारीचा जरासा बेरंग झाला. तथापि **प्रमारेशास बाप्पाच्या** प्रसंगावधानाबद्दल व धैर्याबद्दल फारच आश्चर्य वाटलें. ईकडे तो मस्त हत्ती राजमार्गावर कोणासही फिरकूं देईना. अनेकांनीं अनेक यत्न केले. परंतु कांहीं इलाज चालेना. **साहसी व देव** यानींही हात टेंकले. वेळ काळचा गूण, मोठ मोठ्या धुरंधरांसही त्यांची मति गुंग होऊन त्याकामीं यश येईना. इतक्यांत एक सरासरी सोळा वर्षांचा अत्यंत सुंदर तरूण केवळ सुकुमारपणाची खाणच असा पाठीवर बाणभाता टाकलेला व हातांत धनुष्य धारण केलेला त्या जागीं आला

आणि त्यानें प्रथम मोठ्या आवाजांत एक अप्रतीम गाणें सुरू केलें. त्याच्या गाण्यानें त्या हत्तीस पकडण्याकरितां झटपटत असलेले सर्व लोक आपण कोणत्या कामास आलों आहों, तें काम तसेंच टाकलें तर न जाणों काय घातपात होतील, हें सर्व विसरून जाऊन **अर्जुना**च्या मोहनास्त्रानें स्तंभित झालेल्या कौरवसेनेप्रमाणें अगदीं चित्राप्रमाणें हालचाल विरहित झाले. ह्याहीपेक्षां विशेष आश्चर्याची गोष्ट ही कीं तो मस्त हत्तीही आपली मस्ती विसरून हळू हळू स्तंभित होऊं लागला. थोडक्यांतच तो अगदीं चित्रासारखा शान्त व स्तब्ध झाला आणि मग त्या तरुणानें त्या हत्तीवर मोठ्या धैर्यानें स्वारी केली आणि गातगातच तो त्यास घेऊन **बाप्पा**कडे गेला. **बाप्पानें** हें अचाट कर्म ऐकून व त्या तरुणास पाहून त्याचें मनापासून कौतुक केलें व ' आपण हा हत्ती राजाधिराजाकडे घेऊन चलावा हा त्यांचा आहे. ते आपणास मोठें पारितोषिक देतील. चला मीच आपणाबरोबर तुह्मास घेऊन जातों ' असें ह्मणून त्याप्रमाणें ते दोघेही तिकडे गेले. सारांश काय कीं ह्या नव्या तरुणासही त्याच्याच विनंतीवरून **बाप्पा**च्या हाताखालीं पांचशें घोड्यांच्या पागेवरील अधिकारी नेमिलें व त्यास पालखीसुद्धां मोठा सरंजाम राजानें दिला. **बाप्पास** ह्या तरुणास पाहून व त्याच्या सर्व चेष्टा लक्षांत घेतां असें वाटलें कीं ईश्वरानें आपणा करितां व हा तरुण मित्र पाठवून

दिला असावा. थोडक्याच काळांत ह्या दोघांही तरुण मित्रांचें एक हृदय होऊन बाप्पाचें सर्व गुह्य ह्या नवख्या गृहस्थास कळलें आणि प्रभावतीच्या सुटकेच्या कामीं बाप्पानें सर्व संकेत ह्या मित्रांशींच केला आणि त्याच्याच साहाय्यानें मुख्यत्वें तो बार उडविण्याचें त्यानें ठरविलें.

इकडे बाळो हा आपल्या राजवैद्याच्या तरुण कन्येवर इतका लुब्ध झाला होता कीं तिच्या प्राप्तीवांचून आपण या जगांत जगणारच नाहीं असें त्यास वाटत होतें. परंतु अनेक बयादी सांगून ती त्यास आपणांस सध्याच लग्न संबंध करितां येत नाहीं ह्मणून हुलकावण्या दाखवीत असे; व इतर सर्व चेष्टा त्याचा उल्लूपणा वाढण्यासच कारण व्हाव्यात अशा करीत असे. शेवटीं एक दिवस आपल्या अधिकाराच्या जोरावर त्या भिल्ल कन्येस दरडावून वश करावयाची इथपर्यंत बाळोची मजल येऊन ठेपली. तों तिकडे त्या धूर्तेनेंही हें त्याचें बिंग जाणून आपली कडेकोट तयारी केली होती. मुसलमान सरदार महमद ह्याच्या कांहीं गुप्त हेरांस तिनें आपल्या बाजूस वळवून घेतलें होतें; व त्यानांही तें इष्ट असल्यामुळें ते तिला लागेल तें सहाय्य देण्यास तयार होते. इकडे या विषयविषाच्या तडाक्यांत सांपडल्यामुळें बाळोकडून बाप्पास रोजची कळणारी बातमी अलीकडे आठआठ दिवसांत कळेनाशी झाली होती. ह्मणून बाप्पा फार रागावला होता. बाप्पाच्या रागाचें का-

रण त्याच्या नव्या मित्रास कळतांच तो त्यास ह्मणाला "महाराज आपली आज्ञा होईल तर मी तिकडील समाचार घेऊन येतों. अलीकडे त्या नष्ट शिखानष्ट अविंधांचे हेर आणि सैन्यें अचानक कोठें काय दगा करतील याचा नियमच नाहींसा झाला आहे. कदाचित् तसलाही कांहीं प्रकार नसेल कशावरून ?" यावर बाप्पानें 'ठीक आहे' ह्मणून उत्तर दिल्यावर बाप्पाचे विनंती करून आपल्या बरोबर साहसीस घेऊन रूपराम (हें या नव्या सरदाराचें नांव) निघाला. बाप्पाही श्रीएकलिंगजीचें देऊळ आतां पुरें होत आलें होतें त्याच्या वास्तुशान्तीच्या विचाराकरितां हारीत ऋषीकडे जावयास निघाला.

---

## प्रकरण २० वें.

**रूपराम** व **साहसी ईडरास** पोंचतात तों तेथें जंगी रण माजलेलें त्यांना दिसलें. त्यांनीं तत्काळ **बाळो**च्या लोकांपैकीं जे कांहीं लोक त्यांस बाहेर पडलेले आढळले त्यांस मोठ्या सावधगिरीनें वळवून त्यांच्या कडून कच्ची हकीगत काढून घेतली व तावडतोब **बाप्पा**कडे जास्त सैन्य पाठवून देण्याबद्दल विनंतीपत्र पाठवून आपण तेथल्या तेथें शंपन्नास लोकांची जमात बांधून ज्या वाड्यांत मुख्यतः रण माजलें होतें तेथें जाऊन त्यास वेढा

दिला. तों इकडे कोणी कैदखान्याचीं कुलुपें उघडून त्यांतील कैदी मोकळे केले व त्यांस वाळो आपल्या चांगलाच तावडींत सांपडला आहे, पाहतां काय सूड घ्या ह्मणून भर दिली. त्यामुळें चेऊन जाऊन अंगांत विशेषसें त्राण नव्हतें तरी मोठ्या तडफडीनें तो भिल्लराजा आपल्या दोन पुत्रांसह वाड्यावर चालून आला. त्यांस पहातांच साहसीनें प्रथम त्याच्याशीं सामना सुरू केला आणि रूपरामानें वाड्याचा दरवाजा राखला. वाड्याचा दरवाजा रूपरामानें बंद करून घेऊन त्याची अगदीं लहान दिंडी मात्र बुद्धिपुरःसर उघडी ठेविली होती. दरवाज्याच्या कडीकोयंड्यांतुन दोरखंडें घालून दहा वीस जवानांकडून तीं बाहेर ताणून धरविली होतीं. आंतून दरवाजा उघडून बाहेरच्या मंडळीच्या अंगावर पडण्याकरितां आंत सांपडलेल्या पांच पंचवीस मुसलमानांची सारखी धडपड चालली होती. ते एकदम सर्व जण दरवाजा उघडण्याच्या नादांत अगदीं गुंग आहेत असें पाहून रूपरामानें एकदम दोरखंडें सोडण्यास सांगून धडाडकन दरवाजा उघडला. तों ते लोक त्या हिसक्यासरसे कांहीं आंत व कांहीं बाहेर याप्रमाणें तोंडघशीं पडतांच त्यांजवर जोराचा हल्ला करून बहुतेकांस चित केलें आणि उरलेल्या दहा पांचांस चतुर्भुज करण्याची व्यवस्था करून रूपराम आंत शिरला. आपला राजा सुटल्याची बातमी कळून हळू हळू कांहीं भिल्लही सशस्त्र

होऊन दहा दहा वीस विसांच्या टोळ्यांनीं यावेळीं शहरांत शिरूं लागले होते. परंतु **साहसीनें** त्या भिल्लराजास त्याच्या पुत्रांसह फिरून पकडलें व कैदेंत टाकलें तेव्हां त्या भिल्लांचा हिरमोड होऊन ते आले तसे परत फिरले. **रूपरामानें** आंत जातांच प्रथम भिल्लकन्येस शोधण्याचा उपक्रम केला. तों ती प्रथम कोठेंच सांपडेना. शेवटीं एका उत्तम शृंगारलेल्या कोठडींत घायाळ होऊन विव्हळत पडलेली आढळली. तिच्या जवळ तिची एक दासी असून समाधानाच्या गोष्टी सांगत होती. **रूपराम** आंत शिरतांच ती भिल्लकन्या ताडकन उठली व सलज्ज अशी एका बाजूस उभी राहिली. आणि तेथून या नव्या गृहस्थाशीं बोलण्यास इशारा देऊं लागली. तेव्हां त्या दासीनें " महाराज आपण कोणीही असा. परंतु सध्या आमच्या ह्या सखीस आपण केवळ प्राणदान करण्याकरितां आलां आहां असें वाटतें. आपण कृपाकरून **बाळो**महाराजांचा शोध करून त्यांची व आमच्या या सखीची भेट करवा आणि"—ती पुढें कांहीं बोलणार तोंच **रूपरामानें** " **बाळो** महाराजांवर तुमच्या या सखीमुळेंच हा घोर प्रसंग गुजरला आणि"—तो पुढें कांहीं बोलणार इतक्यांत स्वतःच **चंपा** मोठ्या करुणस्वरानें " महाराज ही दासी त्या चरणांची अपराधी आहे खरी. तथापि त्या पायांचा लाभ जर झाला नाहीं तर खास ही दासी आत्महत्याच करून घेईल. त्या पायांच्या ठिकाणीं

निष्कपट प्रेम ठेऊन केवळ त्या शिखानष्टांच्या नादानें आपल्या आई बापांस बंधमुक्त करण्याकरितां मी हें साहस केलें. त्यामेल्यांचा खरा कावा कांहीं निराळाच होता हें मला कळलें नाहीं, त्यामुळें मी ही अशी फसलें आणि आपल्या प्राणेशाच्या जिवावर संकट ओढवून घेतलें. शिवाय आई बापांच्या सेवेसही अंतरलें. यावर **रूपरामानें** "बरें या सर्व घोटाळ्याचा निवाडा होईल तेव्हां होईल. सध्या **वाळो** महाराजांस कोठें शोधावें हें आपण मला सांगा" असें ह्मणून त्या दासीस बरोबर घेऊन तो **वाळोस** शोधण्यास निघाला. इतक्यांत अनेक जखमा लागून अगदीं अशक्त झालेला **बाळो** हातांत शस्त्र घेऊन मोठ्या आवेशानें " सटवे माझा असा घात केलास अं. थांब तुला हातीस का नव्हतीस अशी करून टाकतों. पण छे! हें सर्व थोतांड आहे, हें सर्व कपट त्या शिखानष्टांचेंच. त्यांनींच तिला भुरळ घालून कांहीं तरी थापा देऊन हा प्रसंग जुळवून आणला" याप्रमाणें बडबडत **रूपरामा**-च्याच अंगावर धांवून आला. **रूपरामानें** मोठ्या सावधगिरीनें त्याच्या हातांतील शस्त्र घेऊन त्याला धरून तो **साहसी**कडे चालला. व त्यानें आपल्या बरोबरच्या इसमांस **चंपेस** पकडून आणण्यास सांगितलं. **साहसी** व **रूपराम** यांनीं मग शहरचा बंदोबस्त केला आणि एक दोन दिवसांनीं **बाप्पाकडून** मदत पोंचतांच तेथें १००० लोक ठेऊन **बाळो** आणि **चंपा** यांस घेऊन **बाप्पाच्या**

निरोपावरून ते दोघेही **श्रीएकलिंगाच्या** अरण्यांत येऊन दाखल झाले.

**श्रीएकलिंगास** येतांच **रूपराम व बाप्पा** यांनीं नागद्यास जाऊन **प्रभावतीस** सोडविण्याची प्रतिज्ञा केली आणि पांच सहा दिवसांनीं येण्याऱ्या महाशिवरात्रीस **श्रीएकलिंग**जीच्या देवालयाच्या वास्तुशान्तीचा समारंभ व्हावयाचा असल्यानें त्या दिवशींच्या आनंदांत **प्रभावतीच्या** लाभाचाही आनंद अवश्यच व्हावा अशी **बाप्पाची** फार इच्छा असल्यानें **बाळो व चंपा** यांच्या निवाड्याचें कामही त्या वेळपर्यंत लांबणीवर पडलें. **रूपरामानें** **प्रभावतीस** सोडवून आणण्याची कामगिरी केली असतां "मागेन तें **बाप्पानें** आपणास द्यावें" असा त्यापासून वर मिळविला होता. व जर त्या कामीं त्यानें यश न संपादिलें तर **बाप्पानें रूपरामास** सुळावर देण्यापर्यंत वाटेल ती शिक्षा करावी असेंही ठरलें होतें. याप्रमाणें ठरून **रूपराम** प्रथम एक उत्तम गवय्या ह्मणून **सोळंखीकडे** गेला. **सोळंखी** त्याचें गाणें ऐकून फार खूष झाला. त्यानें त्यास आपल्या गळ्यांतील कंठा काढून दिला. अलीकडे अलीकडे **प्रभावतीनें** आपल्या बापाशीं जरा विशेष लडिवाळपणाचें वर्तन सुरू केलें होतें. ती लग्नाच्या बाबतींत आपल्यास **बाप्पाबद्दलचा** कांहीं हट्ट नाहीं परंतु दुसरा जो कोणी असेल तो आपणास पसंत पडला पाहिजे ह्मणजे आपण लग्न करूं असा बाहणा करून आपल्यावर आपल्या

बापाचा पुन्हा विश्वास बसावा असें वर्तन ठेवीत आली होती. त्यामुळें या गवय्याच्या गाण्यास तिला आई वगैरे इतर स्त्रियांत बसण्यास सांपडलें होतें. तिनें आपल्या मातोश्रीकरवीं या गवय्यास आपणांस गायन शिकविण्यास ठेवावें ह्मणून आपल्या बापास कळविलें. बापानें तिचें तें ह्मणणें मान्य केलें. त्याप्रमाणें गवई बोवा तिच्या महालांत गाणें शिकविण्याकरितां ह्मणून जातांच तिनें प्रथम त्यांजकडे फारच बारकाईनें लक्ष लाविलें व तिला त्यांत कांहीं तरी विलक्षण प्रकार असावा असा संशय आला. तथापि तो व्यक्त न करितां ती त्याजवळ गाणें शिकण्यास बसली. गवईबुवांजवळ तिनें **बाप्पा**-बद्दलच्या गोष्टी सहजगत्या काढून **बाप्पाचें** सध्या कोठें वास्तव्य आहे वगैरे इत्थंभूत बातमी काढून घेतली. गवई बुवांस ती द्यावयाचीच होती. याप्रमाणें तीन एक दिवस क्रम चालला असतां तिसरे दिवशीं मोठा हिय्या करून कोणासही नकळत **प्रभावती** रात्रीची बाहेर पडली व थेट **श्रीएकलिंगास** चालती झाली. तिनें गवई बुवांसही आपल्या संकेताचा धागादोरा लागूं दिला नाहीं. तरीं गवई बुवांची व्यवस्थाही अशी जय्यत होती कीं त्यांनीं ती वाड्याबाहेर पडून शेंपन्नास कदम गेली नाहीं तोंच तिला गांठलें आणि प्रथम तिला बरेंच घाबरवून सोडून तिजकडूनही तिचें गौप्य न फोडतां तिला **बाप्पा** जवळ नेऊन पोंचविलें असतां तिनें आपण मागूं तें बक्षीस द्यावें

असा करार करून घेतला; आणि आपल्या वचनांतून दोहींकडेही गवईबुवा पार झाले. याप्रमाणें माघ वद्य द्वादशीच्या दिवशीं रात्रीं चंद्रोदयाबरोबर **प्रभावती** व **रोहिणी** यांनीं युक्त असा हा **बाप्पा** चंद्र शोभूं लागला. त्या आनंदानें **रोहिणी**च्या कंठांतून जे अप्रतीम गायनालाप येऊं लागले त्यांनीं तर गंधर्वांसही मोहित केलें असतें मग इतरांची कथा काय? त्याच आनंदाच्या प्रसंगीं संधि साधून **चंपा** एकदम **बाप्पा**च्या पायां पडली व आश्वासन मागून आपणांस **बाळो**चा लाभ घडावा ह्मणून विनंति करूं लागली. ही व्यवस्था **साहसीस** सांगून **रूपरामा**नेंच करविली होती. त्यामुळें त्याप्रसंगीं वचनास गुंतून **बाप्पा**नें **बाळो**चा हात **चंपे**च्या हातांत घातला आणि त्या दोघांना सुखी केलें. शेवटीं या आनंदाप्रीत्यर्थ भिल्ल राजास बंधमुक्त करण्याचा व त्याला कबूल असेल तर **ईडर**ची पाटिलकी देण्याचा हुकूम झाला. त्याप्रमाणें व्यवस्था अमलांत आली.

इकडे **सोळंखीस** **बाप्पा**चाही संशय होताच. त्यानें लगेच सर्व चौकशी करून झाल्या गोष्टी त्या चांगल्याच झाल्या असें मानून मोठ्या इतमामानें **बाप्पास** भेटून लग्न समारंभ यथाविधि करण्यास परवानगी मागितली. जांवई बुवांस बरीच भूमि आंदण देऊन **सोळंखीरावा**नें लग्न मोठ्या थाटानें केलें. दास दासीही पुष्कळ अर्पण केल्या. लग्नसमारंभाबरोबर तिकडे वास्तुशान्तीचाही समारंभ मोठ्या

थाटानें चालला होता. **हारीत** ऋषींनीं आपल्या माहितींतले पुष्कळ साधूसंत या समारंभास बोलाविले होते. त्यांचा सर्वांचा **बाप्पाकडून** व **सोळंखीकडून** उत्तम परामर्ष घेववून त्या सर्वांचे आशीर्वाद **बाप्पास** मिळण्याची **हारीत**ऋषींनीं संधि साधली. **आदिगोरखनाथ**ही या वेळेस येथें आले होते. त्यांनीं आपल्या जवळील दोन मंत्रानें सिद्ध केलेलीं यशस्वी शस्त्रें **बाप्पास** अर्पण केलीं आणि दिग्विजय करून म्लेच्छांस आर्यावर्ताच्या बाहेर घालविण्याबद्दल उपदेश केला व त्यांत विजय मिळेल असा आशीर्वादही दिला. वाचकहो **रूपराम** हीच रोहिणी हें येथें सांगण्यास पाहिजे असें नाहीं. ती व **प्रभावती** या सख्या बहिणीप्रमाणें वागत असत. मूर्तिमंत श्रीन्हीच अशा! त्या दोघींसह **बाप्पा** फारच शोभत असे. असा हा आनंदी आनंद चालला असतां त्याचा कोणाला कंटाळा येणार आणि ह्या उत्सवाचे दिवस संपावेत असें तरी कोणास वाटणार? परंतु पंधरा एक दिवस या प्रमाणें हा उत्सव सोहळा चालल्यावर चितोडाहून एकदम देखत हुकूम निघून येण्याबद्दल खलीता आला. तो कसला काय हें आतां शेवटच्या प्रकरणांत सांगून या चरित्राचा उपसंहार करूं.

---

(१७९)
नं.
ता.

## प्रकरण २१ वें.

मागच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें राजाधिराजाच्या लखोट्याप्रमाणें **बाप्पा** चितोडास आल्यावर तेथील प्रकार त्याला कळला. तो असा:—चितोडावर शत्रुसैन्य उतरत असल्याची नक्की बातमी कळल्यामुळें राजसभेंत त्याशीं लढण्यास कोणी जावें, अशा बद्दल विचार निघतांच सर्व जुन्या योद्धयांनीं "आपण **बाप्पाला** लाडका करून ठेवला आहे, तेव्हां त्यालाच या वेळीं शत्रूवर जाऊंद्या असा राजाधिराजापाशीं हट्ट घेतला; त्यामुळें हा इतका निकडीचा लखोटा **बाप्पास** आला होता. **बाप्पानें** राजाधिराजाची आज्ञा शिरसा वंद्य करून आपल्या **साहसी, देवो** वगैरे मित्रांसह लढाईवर जाण्याची तयारी केली. **साहसीला** तर ह्या पासून फारच आनंद झाला. **बाप्पामंडळानें** परचक्र परतलें इतकेंच नव्हे तर शत्रूचा पुरा पाडाव करून नवीन देश काबीज करीत करीत ते गिजनी पर्यंत गेले. वाटेंत एका निकराच्या लढाईत **साहसी** ठार झाला. तथापि मुसलमानांचा मुख्य सरदार जो **महंमद** त्याला आपल्या बरोबर परलोकींही युद्ध चालविण्यास तो स्वपराक्रमानें खेंचून घेऊन गेला. **बाप्पानें** या आपल्या साहसी मित्राच्या लहानग्या मुलास सिंधप्रान्तांतील राज्यावर बसविलें, आणि **राजकुवर**बाईस त्याची कारभारीण नेमून **बाळोस** त्याचे सेनापति व संरक्षक नेमिलें. **बाप्पाच्या**

पराक्रमानें चितोडचे सर्व रुसवे योद्धे हळू हळू त्याजवर प्रसन्न झाले, आणि त्याच्या सैन्यास येऊन मिळूं लागले. मुलुख जिंकित असतां आपल्या दिग्विजयाच्या केवळ पताकाच अशा अनेक पादाक्रांत राजांच्या कन्यांशीं **बाप्पानें** विवाह केले. तो नंतर चितोडास परत आल्यावर सर्व योद्ध्यांनीं चितोडचें राज्यही त्यानेंच घ्यावें असा आपला मानस दर्शविला. वृद्ध **प्रमार** राजानेंही **बाप्पाच्या** अद्वितीय विक्रमानें प्रसन्न होऊन आपलें चितोडचें राज्य त्याच्या स्वाधीन केलें आणि आपण उज्जनीस गेला. **बाप्पाला** त्याच्या या पराक्रमानें '**हिंदू वा सूरज**' '**राजगुरु**' व '**चकवा**' (चक्रवर्ती) असें म्हणतात. **बाप्पाला संतती** पुष्कळ झाली. त्याला हिंदु व मुसलमान बायकांपासून एकंदर १३० मुलगे झाले होते. त्यांत ९८ हिंदू बायकांपासून, व ३२ मुसलमानी बायकांपासून. त्याच्या हिंदु पुत्रांस '**सूर्यवंशी अग्न्युपासक**' असें नांव असून मुसलमानांस '**नौपेर्यपठाण**' असें म्हणत. त्यानें आपल्या अनेक मुलांस अनेक देशचे राजे केलें होतें. त्यानें इराण, तुराण, इस्पहान, कंदाहार, काश्मीर, काबूल वगैरे सर्व देश काबीज केले होते. हा महान पराक्रमी सूर्यवंशी राजा पूर्ण शतायुषी झाला.

झालें. आमची गोष्ट संपली. '**हिंदू वा सूरज**' ची आह्मी आतां येथेंच शेजारती करितों.

# शारदाक्रीडन छापखाना.

या छापखान्यांत सर्व प्रकारचीं इंग्रजी, मराठी गुजराथी कामें अगदीं वेळचेवेळीं व माफक दरानें करून दिलीं जातात. तरी व्यापारी व इतर सद्गृहस्थ आपला रुकार आश्रय देतील अशी आशा आहे.

आमचेकडे सर्व प्रकारचीं इंग्रजी, मराठी, संस्कृत वगैरे शाळोपयोगी पुस्तकें विकत मिळतात. इंग्रजीशिवाय इतर पुस्तकांस टपाल हांशील पडत नाहीं.

---

## काळे आणि कंपनी.

आमचेकडे सर्व रोगांवरील होमोपाथिक औषधें ताजीं व खात्रीचीं विकत मिळतात. किंमत एक ड्रामचे बाटलीस ३ आ. दोन ड्रामचे बाटलीस ४ आ. ट. हां. निराळें पडेल. पत्रव्यवहार 'म्यानेजर शारदाक्रीडन छापखाना' गिरगांव या पत्त्यावर करावा. औषधें व्ही. पी. नें पाठवूं.

गिरगांव बॅकरोड—मुंबई.